# माणूस


विशेष:

संपनेते र.ग.कर्णिक यांची प्रदीर्घ मुलाखत

११ फेब्रुवारी १९७८
सव्वा रुपया

## निवडणूक विशेषांक
## जनता पक्ष





# साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे–अंक सवतीस

११ फेब्रुवारी १९७८

मूल्य सव्वा रुपया



संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९


# नवे सरकार, नवी नोकरशाही !

सरकारी सेवकांचा व शिक्षकांचा संप एकतर्फी माघार घेऊन मिटविण्याचा संपनेत्याचा निर्णय अचूक म्हटला पाहिजे. मुख्य मंत्री हटूनच बसलेले असतील तर उगाच वाटाघाटींचा घोळ घालत राहण्यातही अर्थ नव्हता. 'मिळमिळीत सौभाग्यापेक्षा ढळढळीत वैधव्य चांगले,' अशी आपल्याकडे एक म्हण आहे. मुख्यमंत्र्यांनी देऊ केलेले मिळमिळीत सौभाग्य सपनेत्यांनी झिडकारले यात त्यांचा आत्मविश्वासच व्यक्त झालेला आहे. शिवाय जनतेची सहानुभूती संपकऱ्यांना लाभली हाही लाभ कमी नाही. निवडणुका आणि विद्यार्थ्यांच्या परीक्षा या दोन्ही गोष्टी कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांपेक्षाही महत्त्वाच्या मानल्या, याबद्दल त्यांचे अभिनंदन कोण करणार नाही? सुरुवातीपासून संपाला धारेवर धरणारी वृत्तपत्रेही संप मिटल्यावर संपनेत्यांबद्दल चार बरी वाक्ये लिहिती झाली, ही या वृत्तपत्रांची एकतर्फी माघारच म्हटली पाहिजे. उगाच नाकाने कांदे सोलण्याच्या त्यांच्या उद्योगाला थोडाबहुत तरी आळा यापुढे बसला, तर तोही काही कमी फायदा नाही. सगळ्यांनाच या संपाने आत्मपरीक्षण करायला लावले आहे, हे नाकारून चालणार नाही. सपनेतेही याला अपवाद नाहीत. त्यांचे मनोगत जाणून घेण्याचा या अंकात थोडा प्रयत्न केला आहे. निवडणुकीनंतर नवीन सरकार येणार. या नव्या सरकारला नोकरशाहीकडून योग्य ती साथ मिळाली तर हे निवडणुकीनंतर येणारे नवीन सरकार आपली आश्वासने पूर्ण करू शकेल. शेवटी ध्येयधोरणांची, योजनांची अंमलबजावणी नोकरशाहीकडून होत असते. नोकरशाहीने पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहिले पाहिजे हे खरे; पण मंत्रिमंडळ आणि नोकरशाही यात छत्तीसचा आकडा असूनही उपयोग नाही. निदान या एका कारणासाठी तरी निवडणुकीनंतर यापुढे महाराष्ट्रात नवीन मंत्रिमंडळ अस्तित्वात येणे अगदी अगत्याचे होऊन बसले आहे. नोकरशाही व दादा–मंत्रिमंडळ यात आता प्रचंड दरी निर्माण झाली आहे. या दोन्हींचा सांधाच उखडला गेलेला आहे. अशा स्थितीत हे दोन घटक यापुढे एकत्र येण्यात लोकांचे कुठलेही हित साधणार नाही. एकत्र आले तर पुढच्या पाच वर्षात सतत ताण आणि कटकटी वाढत राहतील, एक योजना धडपणे पार पडणार नाही. विकास–कार्यक्रमांना जागोजाग खीळ बसेल. ही अनवस्था टाळायची असेल तर सत्तास्थानी नवे लोक, नव्या शक्ती आणण्यावाचून दुसरा पर्याय नाही. कॉंग्रेसची एकाधिकारशाही नाहीशी करणे, तीस वर्षांची सत्तेची मक्तेदारी मोडून काढणे या प्रमुख कारणाव्यतिरिक्त, हे एक नवेच कारण संपामुळे विचारात घेण्याची गरज आता उत्पन्न झालेली आहे. दादा मंत्रिमंडळ आणि दहा लाख सरकारी–निमसरकारी सेवक+शिक्षक यांचे यापुढे जमणे शक्य नाही. एकाने दूर होणे अवश्य आहे. नोकरशाही तर निवडणुकमार्गाने दूर करण्याची तरतूद नाही. मग दादांनीच पुन्हा संन्यास घेण्याशिवाय दुसरा पर्याय सध्या तरी दिसत नाही.

मराठवाडा, कोकण आणि विदर्भ हातातून गेल्यावर दादांवरच केवळ नाही, सगळ्या कॉंग्रेसवरच संन्यास घेण्याची तशी पाळी येऊन ठेपलेलीच आहे. कोल्हापूर ते नाशिक आणि नगर-खानदेश हाही भाग तसा बिनधास्त राहिलेला नाही. 'जनता'तील बंडखोऱ्या निवळत आलेल्या आहेत; पण कॉंग्रेसमधील इंदिरा गांधीचे बंड पसरत चालले आहे आणि 'बाईंना पाहायला लोक गर्दी करताहेत. चांगले पाहण्याची लोकांची हौस असते,' असले वाष्कळ आणि हीन अभिरुचीचे टोमणे मारण्याइतपत चव्हाणांची घसरगुंडी झालेली आहे. स. गो. बर्वे यांच्या निवडणुकीच्या वेळी चव्हाण असेच घसरले होते. त्या वेळी 'स्वस्तिक'चे

---

मुखपृष्ठावरील छायाचित्रे : श्री. एस्. एम्. जोशी, श्री. उत्तमराव पाटील

मुखपृष्ठ : बाबु उडुपी  छायाचित्रे : गौतम पाटोळे, मुंबई


वसंतराव वैद्य बर्व्यांच्या निवडणूक-मोहिमेचे प्रमुख होते. चव्हाणांनी त्यांच्या मूळच्या गरिबीचा उल्लेख शिवाजीपार्क-वरील भाषणात केला. इतका असंस्कृत उल्लेख चव्हाणांकडून व्हावा याचा अनेकांना तेव्हा धक्काही बसला होता. शेवट काय झाला ? चव्हाण हरले ! बर्वे निवडून आले. चव्हाण जेव्हा तेव्हा घसरतात तेव्हा प्रतिपक्ष विजयी होतो, असा आजवरचा अनुभव आहे. बाईंच्या झुंजारपणाचे आकर्षण सामान्यजनांना अजूनही आहे, ही एक गोष्ट चव्हाणांनी आणि इतर सर्वांनीच कायम ध्यानात घ्यायला हवी. त्या सत्तेवर येवोत न येवोत. एकाकी असूनही आज त्या चव्हाण-रेड्डी कंपनीला भारी ठरत आहेत आणि त्यामुळे या खुर्चीपटूंची त्रेधातिरपट उडाली आहे. काँग्रेसचा पराभव ' जनता 'ला फारसा करावा लागणारच नाही. तो सुरूच आहे. एकीकडून इंदिरा गांधी लचके तोडीत आहेत, दुसरीकडून रेड्डी-चव्हाणांना काही हा कोसळत चाललेला तंबू सावरता सावरत नाही. या दोन्ही काँग्रेस एकमेकांच्या उरावर छान बसलेल्या आहेत ! ' जनता ' आणि ' मित्रपक्ष ' यांना ही एक नामी संधी आहे. त्यांनी उरलेसुरले मतभेद मोडून कंबर कसली आणि योग्य उमेदवारांचा पाठपुरावा केला तर दिल्लीत जे घडले ते मुंबईत घडून येणे अवघड नाही.

**—संपादक**

---

# निवडणूक वार्तापत्र

## मुंबई



आपापल्या इच्छुकांसाठी शब्द टाकण्यास आलेल्या जिल्हा परिषदेच्या गाड्या, साखर कारखान्यांच्या जिप्स आता गावी परतल्या आहेत. आमदार निवासातल्या पाहुण्यांची पांगापांग झाली आहे. ' वर्षा ' आणि उत्तमराव पाटलांच्या बंगल्याची हिरवळ पुन्हा सुनी झालीय. आपल्या जिल्ह्यांच्या उमेदवारांच्या बऱ्यावाईट याद्या घेऊन नेतेही मुंबई सोडताहेत. एकंदरीत निवडणुकी-पूर्वीचा बराचसा धुरळा खाली बसत चाललाय ! जागोजागी प्रचाराचे नारळ फुटताहेत.

तिकिटवाटपाबाबत असलेल्या नाराजीचा वेध घेताना कार्यकर्त्यांकडून अनेक मनोरंजक गोष्टी समजल्या. काँग्रेस व जनता दोन्ही पक्षातल्या इच्छुकांनी एकमेकांचे पाय ओढण्याचे प्रयत्न कसे केले, थेट दिल्लीपर्यंत त्याचे पडसाद कसे उमटले हे बघण्यासारखे आहे.

काँग्रेसची यादी जनता पक्षाआधी दोन दिवस तयार झाली. मुंबईतल्या काँग्रेस उमेदवारांबद्दल बोलताना एक ज्येष्ठ काँग्रेस कार्यकर्ता म्हणाला, ' बहात्तरच्या निवडणुकीत मुंबईत बत्तीस जागा जिंकूनही आज येथे आमच्याकडे भारदस्त उमेदवारच नाहीत. इंदिरा—लाटेने कोणीही निवडून आले होते; पण जनता लाटेने आमच्या नेत्यांची व्यक्तिमत्त्वेच धुऊन गेलीत !' काँग्रेसच्या जुन्या व नव्या कार्यकर्त्यांची ही निराशा लगेच जाणवते. उमेदवार जाहीर होऊनसुद्धा जोमाने प्रचाराला सुरुवात न होण्याचे हे एक कारण आहे. वरळी येथे भिंत चितारणाऱ्या काही मुलांशी बोलताना हे तीव्रतेने जाणवले की, संघटन व पक्षबांधणी यापेक्षा सत्ता महत्त्वाची मानल्याने फारसे निष्ठावंत कार्यकर्ते काँग्रेसमध्ये निर्माण झाले नाहीत. उलट, विरोधी पक्ष संख्येत जरी कमी पडले तरी सतत प्रतिकूलतेमुळे त्यांच्या निष्ठा मात्र पक्क्या झाल्या. आज या गोष्टीचा जनता पक्षाला निश्चितच फायदा होणार आहे. ' जनता पक्षातले कितीही मतभेद चव्हाट्यावर आले तरी आम्ही आमच्या गतकृत्यांनी एवढे बदनाम झालो आहोत की, त्याचा फारसा फायदा आम्हाला मिळणार नाही ! ' दुसरा एक काँग्रेस समर्थक मला कळवळून सांगत होता.

' जनता ' च्या यादीवर नजर टाकली तर घटक पक्षांचे कोटावार प्रमाण फारसे बिघडलेले नसले तरी व्यक्तिशः उमेदवारांच्या-बाबतीत मात्र कार्यकर्त्यांचा अपेक्षाभंग झालाय. येथून निवडून गेलेले खासदार, मंत्री आणि उमेदवार निवडीसाठी आलेल्या निरीक्षकांनी स्वतःचेच घोडे पुढे दामटले आहे. कार्यकर्त्यांचा विचार फारसा झालेला नाही, असा सूर आढळतो. ( त्यावर नेते ' काँग्रेसला खाली खेचण्यासाठी काम करा ! ' असा ' प्रति ' सूर लावून आहेत ! ) दिल्लीत भरलेल्या केंद्रीय निवडसमितीच्या बैठकीत एका निरीक्षकाने तर ' माझ्या माणसाला तिकिट न दिल्यास मी राजीनामा देईन ! ' असा हट्ट धरला, तर मुंबईशी काहीएक संबंध नसलेल्या मंत्रिमहोदयांनी ' हमारा आदमी बंबईमें होनाही चाहिए ', अशी यशस्वी मागणी केल्याचे समजते.

अशा तऱ्हेने अनेक रुसवे–फुगवे होऊन तयार झालेल्या यादीच्या असंतोषाचे खापर मात्र फोडले गेले एस्. एम्. जोशींवर ! प्रथम शे. का. प. ला ७०–८० जागा देण्याचा त्यांचा निर्णय धुडकावला गेला.

अर्थात त्यात पुढाकार घेतला राजारामबापू आणि डी. वाय्. पाटलानी. एस्. एम् ना शह देण्याचे समाधान बापूनी कसे मिळविले तो एक धमाल किस्सा आहे. निवडणुका पार पडल्यावर बापूच्या अप्रत्यक्ष पुढाकाराने एस् एम्. चा राजीनामा मागितला जाईल असे म्हणतात. प्रत्येकाचा स्वतःच्या हित-संबंधानुसार निर्णय घेण्याचा पवित्रा पाहून एस्. एम्. सुद्धा त्रस्त न झाले तरच नवल.

या साऱ्याचा परिणाम बंडखोरीत होणे साहजिकच आहे. सर्वांत मोठे बंड उभारले आहे नारायण तावडेनी! त्यासाठी त्यांनी मुबई जनता पक्षाच्या सरचिटणीसपदाचा राजीनामा दिला आहे. 'मला तिकीट मिळाले नाही म्हणून मी बंड केलेले नाही. किंबहुना पक्षकार्यच मी महत्त्वाचे समजतो. मलबार हिल मतदारसंघातून मी तिकीट मागितलेच नव्हते. जनता पक्षाने भ्रष्ट, सधिसाधू लोकाना जी तिकिटे दिली आहेत त्याविरुद्ध हा प्रतीकात्मक निषेध आहे. मी जनता पक्षाशी निष्ठावान आहे; पण तत्त्वा-साठी मी हा झगडा करणार आहे.' तावडेंनी तळमळीने आपली भूमिका माडली. त्यानंतर तेथील कार्यकर्त्यांकडून मी 'जनता'चे अधि-कृत उमेदवार श्री. बी. अे. देसाई यांच्याविषयी जे ऐकले, ते असे—'जे. पी. ना जाहीरपणे फॅसिस्ट म्हणून त्याना गोळघा घाला, म्हण-णारा हा माणूस आणीबाणी सपेपर्यंत रजनी पटेलाबरोबर इदिरेचे समर्थन करीत होता. अनेक राजबद्यांविरुद्ध त्याने खटले चालविले,' वगैरे अनेक. अशा धोकादायक माणसाना 'जनता'ने तिकिटे द्यावीत याबद्दल सर्वत्र चीड व्यक्त होत आहे. तावडेंच्या बडाला वाढता पाठिंबा मिळण्याचे हेच कारण. याशिवाय एकनाथ खापर्डे (नेहरूनगर), विनोद गुप्ता (मुबादेवी) या महत्त्वाच्या बडखोराना कार्यकर्त्यांचा जोरदार पाठिंबा होताच.

कॉंग्रेसमध्येही बंडाळी झालीय! नगर-सेवक बी. डी. झुटे, लीलीबेन पडघा हे त्याच्या बडखोरांपैकी. सर्वांत आश्चर्य शिव-सेनेचे नगरसेवक छगन भुजबळ यांचे. बाळ ठाकरेंच्या अनुमतीविना त्यानी चिंचपोकळी-हून अर्ज भरला! दुर्दैवाने तो अवैध ठरला! वास्तविक शिवसेनेला या विधानसभा निवड-णुकीत काहीही स्थान नाही; पण प्रचारात व घोषणाबाजीत ते सर्वांत पुढे! अत्यंत सुंदर अक्षरात त्यानी भिंती रगवल्यात. (अगदी आपला उमेदवार नाही तेथे सुद्धा!) पुन्हा घोषणाही जोरदार आहेत. ही कल्पकता इतर पक्षीयात फारशी दिसत नाही. उदा.

लाटा येतील लाटा जातील,
क्षणिक जीवन लाटांचे!
विजयी करा, विजयी
उमेदवार शिवसेनेचे!!

अर्थात या घोषणाबाजीचा फारसा फायदा होणार नाही. जनतातल्या बंडखोरीमुळे व कॉंग्रेसच्या दुबळेपणामुळे त्याना एखाद्या जागी फायदा मिळाला तर गोष्ट वेगळी. कारण गिरगाव व दादर या त्याच्या बाले-किल्ल्यात 'जनता'ने जयवतीबेन मेहता व डॉ. हेमचद्र गुप्तेंसारखे भारदस्त मोहरे निवडलेत.

'या वेळी नवलकराचे जरा कठीणच दिसते. जयवंतीबेनच्या प्रचारावर सर्व अव-लबून आहे.' दोन शिवसैनिकांचे लोकलमध्ये चाललेले हे बोलणे त्याची भीती दर्शवते. पुन्हा जयवंतीबेन मेहतांनी आपली पहिली प्रचारसभा शिवसेनेच्या ऐन बालेकिल्ल्यात घेऊन सुरुवात तर चागली केली आहे.

दादरला मात्र थोडीशी नाराजी आहे. दादरच्या बदलत्या लोकसंख्येत हा भाग फक्त मध्यम वर्गीयांचा राहिलेला नाही. येथे कामगारवस्तीही वाढते आहे त्यामुळे येथे एखाद्या कामगारप्रतिनिधीला तिकिट मिळा-यला हवे होते; पण सर्वच पक्षानी हा भाग पारपारिकरीत्या मध्यमवर्गीयाचा मानलेला दिसतो. कामगारनेत्यांमधली खरी लढत होणार आहे परळला. जनतातर्फे वासू देसाई, सेनेचे दत्ताजी साळवी व कॉंग्रेसचे गजानन लोके यांच्यात. जनता पक्षातर्फे, कामगार भाग असल्याने, इथ लक्ष केंद्रित केले जाईल असे दिसते.

कार्यकर्त्यांच्या नाराजीचा प्रत्यय आला खेतवाडीत. तेथे के. ए. खानना स्वतःच्या प्रचाराला कार्यकर्ते बाहेरून आणावे लागतील असे दिसते. कारण जनता कार्यकर्त्यांनी त्याचे काम करण्यास नकार दिला आहे.

प्रत्येक पक्षाच्या यादीतले स्त्री–दलित–मुस्लिम प्रतिनिधित्व पहाण्यासारखे आहे. कॉंग्रेसने मुस्लिम प्रतिनिधित्व बनातवाला–मुस्लिम लीगला दिले आहे. जनता पक्षाने मात्र मुसलमानाना बरेचसे प्रतिनिधित्व दिले आहे. दलित व स्त्रियाबाबत मात्र दोन्ही पक्षानी निराशा केली आहे. दलितांसाठी कॉंग्रेस गवई गटाकडे तर जनता कांबळे गटाकडे वळली आहे दलित समाजाची मोठी मते असलेली वरळीची जागा 'जनता'ने सी. पी. एम्. ला दिली आहे. त्याबाबत त्या पक्षातल्या दलित कार्यकर्त्यात नाराजी दिसते स्त्रियांना कमी जागा दिल्याबद्दल जनता महिलानी चद्रशेखरना सांताक्रूझ विमानतळावर घेरावही घातला होता. आता शिवसेनेनेही दलित पँथरच्या ढसाळ गटाशी समझोता केलाय! (कोणाला कोणाचा आधार?)

इंदिरा कॉंग्रेसचेही काही उमेदवार आहेत. परंतु लोक त्यांना चांगलाच 'हात' दाख-वणार हे आताही स्पष्ट आहे. सरकारी कर्मचाऱ्यांची मोठी वसाहत असलेल्या खेर-नगर मतदारसंघातून त्याचे सल्लागार डॉ. एस्. एस् बागळे उभे आहेत. सगाचा त्याना काय फायदा मिळतो हे पहायचे.

प्रचारामध्ये शिवसेनेने भिंती रगविण्यात आघाडी घेतली आहे, तर 'जनता'चा जोर बॅनर्स, पोस्टर्स व पत्रकावर रहाणार असे दिसते. कॉंग्रेसच्या प्रचारात आलेल्या मर-गळीवर सध्या ते उपाय शोधीत असणार. सध्या बडखोरांची समस्या सोडवण्यात मग्न असलेल्या जनता–नेत्यांना पत्रकाराना मुला-खती द्यायलाही वेळ नाही. कॉंग्रेस नेत्यां-जवळ तर सागण्यासारखे फारसे काही नाही. हे वार्तापत्र प्रसिद्ध होईल तेव्हा प्रचाराची रणधुमाळी टिपेला पोहोचली असेल. मधल्या कालावधीत जर रेल्वे-अदाजपत्रक जाहीर झाले तर त्याचेही परिणाम या मुबईच्या निवडणुकीवर दिसतील, हे निश्चित.

—निखिल वागळे

# आमचं सरकार

## उत्तमराव पाटील यांची मुलाखत

माहितगार

" माझं सरकार आलं तर मी ज्याचे वार्षिक उत्पन्न चोवीस हजार किंवा त्याहून अधिक आहे अशांना शेती धारण करता येणार नाही असा कायदाच करून टाकीन !' असं विधानपरिषदेतील विरोधी पक्षाचे व जनता पक्षाचे एक नेते उत्तमराव पाटील यांनी सांगितलं. तेव्हा त्यांना मध्येच अडवीत विचारलं–' माझं सरकार म्हणजे तुमच्या नेतृत्वाखालील सरकार म्हणावयाचं आहे की माझ्या पक्षाचं सरकार असं तुम्हाला म्हणावयाचं आहे ? ' यावर उत्तमरावांनी स्पष्ट शब्दात सांगूनही टाकलं–' त्यात दोन्ही अर्थ अभिप्रेत आहेत ! '

विधानसभेच्या निवडणुकीच्या निमित्ताने जनता पक्षातील पूर्वाश्रमीच्या घटकांमध्ये थोडा भेद जाणवायला लागला. पूर्वाश्रमीच्या घटकांमध्ये असा भेद व्हावा हे योग्य झाले नाही असे उत्तमराव पाटील सांगतात. सर्वांना बरोबर ठेवण्याची भूमिका उत्तमराव आतापासूनच वठवू लागले असून 'समाजवादी व जनसंघ यांनी पक्षाबाहेर पडण्याचा विचार करू नये ', असे त्यांचे स्पष्ट सांगणे आहे.

महाराष्ट्राचा पिंड डावा आहे, पुरोगामी आहे याची जाणीव उत्तमरावांना आहे. काही व्यवसायांचे राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे, जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनापैकी चाळीस टक्के उत्पादन सरकारने ताब्यात घेऊन वितरण करावे, बागायती जमिनीची कमाल मर्यादा धारणा खाली आणली पाहिजे असे विचार उत्तमराव मांडतात. उत्तमराव जनसंघात होते. त्यांचे हे विचार ऐकल्यावर ' तुमचे हे विचार बदलले आहेत की पूर्वीपासूनचे आहेत ? ' अशी विचारणा मी केली. उत्तमरावांनी सांगूनच टाकलं–' परिस्थितीचा माणसावर परिणाम होतो तसाच विचारांवरही. तसं म्हणशील तर पूर्वाश्रमीच्या जनसंघाच्या व माझ्या विचारातही मतभिन्नता आहे ! '

माणूस कोणत्याही धर्माचा असला तरी त्याचे आर्थिक प्रश्न एकच आहेत. वेगवेगळ्या धर्मांचे वेगवेगळे आर्थिक प्रश्न असू शकणार नाहीत. वेगवेगळ्या धर्मीयांच्या सामाजिक समस्या असू शकतील; पण त्या समस्या सोडविण्यासाठी वेगवेगळ्या धर्मीयांच्या धर्माच्या नावाखाली स्वतंत्र संघटना ठेवण्याची आवश्यकता नाही, असे उत्तमराव पाटील यांना वाटते.

उत्तमराव पाटील यांची मुलाखत घेण्यासाठी गेलो तेव्हा त्यांची ही मते ऐकावयास मिळतील असे वाटले नव्हते. मंत्रालयासमोरील उत्तमरावांच्या निवासस्थानावर गेलो. नाटकामध्ये प्रसंगाप्रमाणे रंगमंच बदलला जातो तसे उत्तमरावांच्या दिवाणखान्याचे रूपही रंगमंचाप्रमाणे बदलले असल्याचे दिसून आले. जानेवारीच्या पहिल्या पंधरवड्यामध्ये ज्या दिवाणखान्यात भारतीय बैठका टाकून समन्वय समितीच्या चर्चा होत, त्याच दिवाणखान्यात आता डबल कॉट टाकली होती. उशीच्या बाजूला मफलर पडली होती. उजव्या बाजूला विड्यांचे बंडल आणि डाव्या बाजूला अॅश-ट्रे कॉटवरच होता. बारक्या टीपॉयवर एस्. एम्. जोशी यांच्या नावे आलेली पण न फोडलेली तार होती. त्याचप्रमाणे नानाजी देशमुख यांच्या नावे आलेले रजिस्टर पत्र फोडलेल्या अवस्थेत पडले होते. इतरांच्या नावांवर आलेली पत्रे फोडू नयेत या शिष्टाचारामुळे एसेम् यांची तार फोडली गेली नसावी असे वाटले; परंतु नानाजी देशमुखांच्या नावे आलेले पत्र फोडलेले पाहून शिष्टाचाराचा विचार बाजूला पडला आणि नानाजी देशमुख यांचे पत्र ' आपले ' वाटून ते फोडले व तार दुसऱ्याची म्हणून फोडली नसावी काय, असा तिरकासा विचार मात्र येऊन गेला.

उत्तमरावांचे काही विचार ऐकल्यानंतर या व्यक्तीची जडणघडण वेगळीच आहे, हे जाणवू लागले. उत्तमराव पाटील पारोळा (जिल्हा जळगाव) मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढवणार आहेत. त्यामुळे मतदारसंघातील तयारीची गडबड चालली होती. झेंडे किती आकाराचे आणि किती घ्यावेत याचा हिशोब होऊ लागला. एक एस्टिमेट वाढते होऊ लागले म्हणून ते बाजूला सारले. असे करत करत आमची गाडी मुलाखतीच्या स्टेशनावर एकदाची कशीबशी येऊन पोचली. विमानाची वेळ झाल्यावर दारे बंद करावीत त्याप्रमाणे खोलीचे दार बंद करण्यात आले म्हणूनच तास–दीड तासात फारसा

व्यत्यय आला नाही.

¤

जनता पक्षाच्या स्वरूपापासून उत्तमराव पाटील यांच्या मुलाखतीला सुरुवात झाली.

'जनता पक्ष हा स्थितिप्रिय नसून पददलित आणि गरीब जनतेच्या आशा-आकांक्षांची पूर्ती करण्यासाठी डावीकडे झुकलेला पक्ष आहे. भाकरी आणि स्वातंत्र्य यासाठी जनता पक्षाचा उदय झाला आहे. नागरी-स्वातंत्र्य-सप्तक जनतेस पुन्हा प्राप्त करून दिल्यानंतर भाकरीचा प्रश्न सोडवण्यासाठी जनता पक्ष कटिबद्ध आहे. त्या दृष्टीने पंतप्रधानांनी दहा वर्षांचा कालखंड समोर ठेवला आहे' अशी सुरुवात उत्तमरावांनी केली तेव्हा जनता पक्षाला डावीकडे झुकणारा पक्ष का म्हणावयाचे हा प्रश्न तोंडावर आला होता; पण प्रश्न विचारण्यापूर्वीच उत्तमराव सांगू लागले की, दहा वर्षांच्या कालावधीत बेकारी हटवण्याचा निकराने प्रयत्न केला जाईल. विशेषेकरून ग्रामीण भागातील बेकारीचा प्रश्न सोडविण्यासाठी छोट्या उद्योगावर भर दिला जाईल. शहराकडे धावणारा लोंढा थोपविणे व शहरात पुन्हा झोपडपट्ट्यांचा प्रश्न निर्माण न होणे, हा एकमेव प्रभावी तोडगा ग्रामीण भागातील बेकारी हटविण्याचा होऊ शकतो. त्या दृष्टीने जीवनात वीज व पाणी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करणे अत्यावश्यक आहे पाणीपट्टी व विजेचे दर यांच्या बाबतीत शेतकरी व लघु-उद्योजक यांना परवडतील अशा दरांचा विचार करणे अत्यावश्यक झाले आहे.

**प्रश्न :** डाव्या पक्षाचे स्थूलमानाने काही निकष आहेत. उत्पादनाची साधने व मालाचे वितरण सरकारी मालकीचे असावे, दलाल पद्धतीचे पूर्णपणे उच्चाटन करणे वगैरे गोष्टी डाव्या पक्षाबाबत संभवतात. त्यांचा जनता पक्षात अभाव आहे. तरीही जनता पक्ष डावीकडे झुकणारा कसा ?

'मक्तेदारीचा निकष लावणे म्हणजेच डावीकडे झुकणे असे नव्हे. सरकारची मक्तेदारी ही काही प्रमाणात अवश्य असली तरी सामान्य नागरिकांच्या जीवनात परस्परांच्या सहकार्याने प्रश्न सोडवण्यासाठी वातावरण निर्माण करणे महत्त्वाचे आहे' असे उत्तर उत्तमरावांनी दिले.

## तरुण कार्यकर्त्यांचा भरणा

'जनता पक्ष म्हणजे शेटजी-भटजींचा पक्ष आहे असा हेतुतः गैरसमज कांग्रेसच्या नेत्याकडून केला जात आहे; परंतु वस्तुस्थितीत जनता पक्षाचे स्वरूप पूर्णपणे पालटले आहे. संघटना कांग्रेस, समाजवादी व जनसंघ या महाराष्ट्रातील घटकांचा पक्ष म्हणजेच जनता पक्ष असे स्वरूप राहिले नसून लोकसभा निवडणुकीनंतर हजारो युवक व प्रतिष्ठित नागरिक यांचा जनता पक्षात प्रवेश झाला आहे. इतकेच नव्हे तर कुठल्याही जातीपातीचा विचार न होता आज जनता पक्षाजवळ जेवढ्या तरुण कार्यकर्त्यांचा भरणा आहे तेवढा भरणा महाराष्ट्रातील इतर कोणत्याही राजकीय पक्षाजवळ नाही!' असे सांगून श्री. पाटील म्हणाले, 'लोकसभा निवडणुकीनंतर जिल्हा व तालुकानिहाय शिबिरे जनता पक्षाने घेतली असून या शिबिरात तीनचतुर्थांशपेक्षा जास्त उपस्थिती तरुणांची असावयाची. शिबिरामध्ये सामाजिक दृष्टिकोण देणे, आर्थिक कार्यक्रमाकरिता वैचारिक भूमिका तयार करणे यावर भर दिला जात असे. विधानसभा निवडणुकीनंतर पक्षउभारणीचा व तो अधिक सुसघटित करण्याचा उपक्रम आम्ही त्वरित हातात घेणार आहोत. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून तरुण कार्यकर्त्यांच्या शिबिरावर भर दिला जाईल. जर ही शिबिरे ३-४ दिवसांची घेता आली तर पक्षकार्याच्या दृष्टीने, तसेच सामाजिक परिवर्तनासाठी त्याचा फार मोठा उपयोग होईल.'

**प्रश्न :** 'जनता पक्षामध्ये सामील झालेल्या घटकामध्ये एकजिनसीपणा किती आला आहे ?'

**उत्तमराव :** लोकसभेच्या निवडणुकीनंतर जनता पक्षाने जो जो कार्यक्रम हातात घेतला, काही आंदोलने हाती घेतली त्या सर्वांतून पूर्वाश्रमीच्या घटक पक्षातील घटकांचा भेद जाणवला नाही; परंतु विधानसभेच्या आगामी निवडणुकीच्या वेळी तिकिटांचे वाटप करताना घटक पक्षातील भेद जाणवला हे खरे आहे; परंतु निवडणुका पार पडल्यानंतर पुढील एक-दोन वर्षांच्या काळात हा भेद नाहीसा होईल आणि त्यापुढच्या निवडणुकीच्या वेळी हा भेद अजिबात राहणार नाही. येत्या निवडणुकीच्या वेळी घटक पक्षामध्ये स्पर्धात्मक पूर्वाश्रम आठवला गेला हे योग्य झाले नाही.

**प्रश्न :** जनता पक्षात असलेल्या पक्षाना मानणाऱ्या युवकाच्या संघटना आहेत. उदाहरणार्थ आर्. एस्. एस्.! या संघटना बाहेर असताना जनता पक्षात तरुणांना आणले जाईल की, या अशा संघटनामध्ये तरुण जातील अशी व्यवस्था केली जाईल ?

**उत्तमराव :** घटक पक्षांना जवळ असलेल्या आर्. एस्. एस्. सारख्या संघटनांचे कार्य मर्यादित स्वरूपाचे आहे. त्याचे कार्य खेड्यापाड्यांमध्ये तर फार थोडे आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील काय किंवा शहरी भागातील काय तरुणाना खूप वाव आहे. जनता पक्षाचेच तरुणांना आकर्षण आहे म्हणून ते जनता पक्षाकडे येत आहेत. अशा नवीन आलेल्या तरुणामध्ये जनता पक्षात सामील झालेल्या पूर्वाश्रमीच्या पक्षांबद्दल खास आत्मीयता असण्याचे कारण नाही.

## औद्योगिक प्रश्नासंबंधी उत्तमरावांनी पुढीलप्रमाणे मते मांडली :

सर्व उद्योगाचे राष्ट्रीयीकरण करावे असे जनता पक्षाचे धोरण नाही; परंतु मूलभूत व अवजड उद्योग याचे राष्ट्रीयीकरण आवश्यकच आहे. सर्वसाधारणपणे राष्ट्रीयीकरणाचा लाभ हा या उद्योगाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून आहे. त्यामुळे ज्या धंद्यांचे सध्या राष्ट्रीयीकरण करण्यात आले आहे त्यांची कार्यक्षमता वाढवावी लागेल. त्याचा लाभ समाजास देणे हे जनता पक्षाचे धोरण राहील.

'उद्योगासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत उद्योगांमध्ये सरकारची गुंतवणूक व या गुंतवणुकीचा लाभ कोणाला होतो तर तो खाजगी उद्योगांना! म्हणून खाजगी क्षेत्र काढून टाकून नफ्याचे उद्योग सरकारी क्षेत्रात घेण्यात काय चूक आहे? [नफ्याचे उद्योग म्हणजे प्रामुख्याने जीवनावश्यक वस्तू तयार करणारे कारखाने.]' खुलासा करीत मी विचारले.

'सर्वच क्षेत्रात सरकारचे नियंत्रण असणे योग्य ठरणार नाही,

परंतु खाजगी उद्योगातील व्यवस्थापनावर व त्यांच्या नफेखोरीवर आजपावेतो शासनाने जवळजवळ दुर्लक्ष केले आहे. ही स्थिती बदलली पाहिजे आणि नफ्याचे प्रमाण ठरवून देऊन खाजगी उद्योगांचा लाभ ग्राहकाला मिळेल असे वातावरण जनता पक्ष निर्माण करील. व्यवस्थापनाच्या बाबतीतही प्रत्यक्ष उद्योगपती, उद्योजक, सरकार व कामगार यांच्यामध्ये विचारविनिमय होऊन व्यवस्थापनातील दोष हटविले पाहिजेत त्यायोगे अधिक उत्पादन व नफ्याचे विशिष्ट प्रमाण हे उद्दिष्ट गाठता येईल.' असे उत्तमराव म्हणाले.

उद्योगधंद्याचे संचालनामध्ये कामगारांचा प्रत्यक्ष सहभाग असला पाहिजे. मात्र प्रत्यक्ष व्यवस्थापनात सरकारचा हस्तक्षेप राहता कामा नये यावर पाटील यांनी भर दिला.

'उद्योगांच्या विशेषत: जीवनावश्यक वस्तूचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण केल्यास ग्राहक व कच्चा माल तयार करणाऱ्या उत्पादकाचे शोषण–पिळवणूक थांबणार नाही काय?'

'उद्योगाच्या राष्ट्रीयीकरणाबाबत काय पद्धती अवलंबिली जावी याचा विचार करावा लागेल. मला त्याबाबत एक उपाय सुचतो. योग्य वेळी व योग्य ठिकाणी मी त्याचा पाठपुरावा करीत राहीन तो उपाय असा. कोणत्या धंद्याचे राष्ट्रीयीकरण व्हावे हा निर्णय प्रत्यक्ष सरकारने न घेता त्याकरिता वेगळीच व्यवस्था केली पाहिजे. अर्थतज्ज्ञ, उद्योगपती, कामगार व सरकार यांचे प्रतिनिधी मिळून एक मंडळ निर्माण केले जावे व त्या मंडळाच्या शिफारशीनुसार राष्ट्रीयीकरणाबाबतचा निर्णय घ्यावा.'

उत्तमरावांचा उपाय माझ्यासारख्याला तरी अव्यवहार्य वाटतो. ज्या यंत्रणेत उद्योगपतींचे प्रतिनिधी आहेत ती यंत्रणा एकमताने कोणता धंदा सरकारने हातात घ्यावा हे सुचवील, हे संभवनीय आहे का? कोणताही उद्योगपती कुठल्याही धंद्याच्या राष्ट्रीयीकरणाला विरोध केल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे उद्योगपतींवर असा विश्वास टाकावयाचा म्हटले तर शंभर उंदीर खाणारा बोका शाकाहाराची तरफदारी करील असा विश्वास बाळगण्यासारखे होणार आहे. एक तर राष्ट्रीयीकरण नको असे म्हणावे किंवा हवे असे सांगावे; पण उद्योगपतींना प्रतिनिधित्व असलेली यंत्रणा राष्ट्रीयीकरण टाळणारी यंत्रणाच ठरण्याचा धोका आहे.

'जीवनावश्यक वस्तूच्या उद्योगाचे राष्ट्रीयीकरण केले तर त्याच्या लाभातून सरकारला कल्याणकारी योजनांसाठी पैसा तर उभा करता येईलच; पण कृत्रिम टंचाई करून भरमसाठ किंमती वाढविण्याचा प्रकारही नाहीसा होईल. म्हणून या उद्योगाचे राष्ट्रीयीकरण करावयास नको काय?'

'जीवनावश्यक वस्तूमध्ये मी कापड घेतो व कापडउद्योगाचे राष्ट्रीयीकरण होणे अत्यावश्यक झाले आहे; परंतु कापड-उद्योगात हातमाग व यंत्रमाग यांचाही मोठा हिस्सा आहे. या दोन क्षेत्राचे सरकारीकरण होता कामा नये. यापुढे शहरात एकही कापडगिरणी खाजगी क्षेत्रात उभारली जाता कामा नये! सहकारी क्षेत्रात सूतगिरणी काढावी व आवश्यकता भासल्यास सहकारी क्षेत्रात कापडगिरणी सुरू करावी; पण नवी गिरणी खाजगी क्षेत्रात काढता कामा नये!'

खाजगी क्षेत्रात नवी एकही कापडगिरणी निघता कामा नये, अशी आग्रही भूमिका उत्तमरावांनी मांडली; पण असलेल्या खाजगी गिरण्यांच्या राष्ट्रीयीकरणाबाबत ते काही बोलले नाहीत. नव्या कापडगिरण्या खाजगी क्षेत्रात निघता कामा नयेत असे सांगितल्यानंतर खाद्यतेलाचा प्रश्न निघाला. खाद्यतेले व वनस्पती याचे उत्पादन खाजगी क्षेत्रात आहे आणि सामान्य नागरिकांचा अनुभव तर असा आहे की, ऐनवेळी तेले व वनस्पती याची टंचाई होते किंवा केली जाते. याला उत्पादक आणि विक्रेते–दुकानदार जबाबदार असतात. तेव्हा हे उत्पादन व त्याचे वाटप सरकारी यंत्रणेमार्फत झाले तर हे टाळता येणार नाही का असे विचारले. तेव्हा श्री. पाटील यांनी मार्ग सुचविला.

'तेलाचे गाळप ग्रामीण भागात करावे. ग्रामीण भागात तेलनिर्मितीला उत्तेजन दिले जावे. त्यासाठी खादी ग्रामोद्योगांकडे वळले पाहिजे आणि गावागावात तेलघाण्या सुरू कराव्यात.' असे श्री. पाटील म्हणाले.

'अशा तेलघाण्यामधून गाळलेल्या तेलबियाचे सर्व तेल निघत नाही व पेंडीमध्ये तेलाचा बराच अंश राहतो, हा राष्ट्रीय संपत्तीचा अपव्यय होणार नाही का? त्यापेक्षा तेल-वनस्पतीचे-उत्पादन सरकारी क्षेत्रातच का करू नये?'

'महाराष्ट्रात आता ठिकठिकाणी साल्व्हंट प्लँट्स बसविले आहेत. त्यामधून पेंडीतूनही तेल गाळले जात असल्याने संपत्तीचा अपव्यय होण्याचे कारण नाही. वाटल्यास ग्रामीण भागात हे साल्व्हंट प्लँट्स सरकारी क्षेत्रात उभारावेत.

'जीवनावश्यक वस्तूच्या निर्मिती व वाटपामध्येच ग्राहकाची पिळवणूक तेलबियांप्रमाणे केली जाते. त्यामुळे उत्पादन व वाटप यांवर सरकारी नियंत्रण असणे आवश्यक ठरते! म्हणून वाटप सरकारने आपल्या हातात का घेऊ नये?' मी माझे पालुपद पुन्हा लावले.

'ज्या ठिकाणी जीवनोपयोगी वस्तूचे उत्पादन केले जाते तेथेच त्या उत्पादनाचा किमान चाळीस टक्के भाग हा प्रत्यक्ष सरकारने हाती घ्यावा आणि त्याचे सरकारने वितरण करावे. हे खरे आहे की, राष्ट्रीय आपत्तीचा अपवाद करता व्यापाऱ्यांनी आपली नफेखोरी वृत्ती कधी सोडलेली नाही. तिला आळा घालण्यासाठी दोन प्रकारची वितरणव्यवस्था होऊ शकते. तहसील केंद्रापर्यंत ग्राहक भांडारे व त्याच्या शाखा यांच्यामार्फत वितरण करावे व दुसरी व्यवस्था म्हणजे विविध कार्यकारी सोसायट्यांमार्फत जीवनावश्यक वस्तूचे वाटप.'

व्यापारी सामान्य माणसाची पिळवणूक करतात. त्याला नाडवतात, नफेखोरी वृत्ती व्यापारी सोडीत नाही, हे उत्तमरावांनी मान्य केले; परंतु अशा व्यापाऱ्यांना बाजूला करणारी वाटपव्यवस्था असावी असे त्यांनी सांगितले नाही. ग्राहक भांडारे निर्माण झाली तरी दुकानदार–दलाल यांच्याकडून होणारी पिळवणूक पूर्णपणे थांबण्याची शक्यता नाही. फार तर पिळवणुकीचे प्रमाण काहीसे कमी होईल, एवढे मान्य होण्यासारखे आहे.

### शेती आणि शेतकरी

शेतमालाच्या वाजवी किंमतीचा प्रश्न आला तेव्हा उत्तमरावांनी

त्याची सविस्तर चर्चा केली. त्यांचे हे विचार जनता पक्षातील किती जणाना पेलवतील हा प्रश्नच आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तीस वर्षांच्या काळात उत्पादकाला परवडतील अशा पातळीवर किंमती आणल्या नाहीत. विशेषकरून शेतमजुरांना किमान वेतन देता येईल व ग्रामीण उद्योगधंद्याला चालना देण्यासाठी भांडवलनिर्मिती करता येईल यासाठी शेतमालाला परवडतील अशा किंमती देण्याची नितांत आवश्यकता होती. या किंमती बांधून देण्याचा उपक्रम शास्त्रीय दृष्टीने झाला पाहिजे; पण तो आजपर्यंत झाला नाही.

'शास्त्रीय दृष्टिकोण म्हणजे तुम्हाला नेमके काय अभिप्रेत आहे?'

उद्योगधंद्यात सर्व बाबी विचारात घेतल्या जातात, तसेच शेतीच्या बाबतीत घडले पाहिजे. शेतीसाठी लागणाऱ्या वस्तूंच्या किंमती, शेतमजुराचे वेतन व शिवाय कुटुंबाच्या श्रमाचा मोबदला जमेस धरून शेतमालाच्या किंमती ठरविल्या पाहिजेत!' (शेकापची हीच मागणी आहे) असे उत्तमराव म्हणाले.

'कोरडवाहू जमिनीची कमाल मर्यादा सध्या ५४ एकरांची आहे. ती आणखी कमी करण्यास वाव नाही; पण बागायती शेतीच्या कमाल धारणेची मर्यादा नव्याने निश्चित केली पाहिजे. जर धरण बांधले आणि या धरणामुळे कोरडवाहू शेतीचे रूपांतर बागायतीमध्ये झाले तर मात्र अशा जमिनीची मर्यादा कमी केली पाहिजे. आज अशा रीतीने बागायती झालेल्या जमिनीनासुद्धा कोरडवाहूच मानून कमाल मर्यादा लावली आहे हे आम्ही बदलू!'

जमिनीच्या राष्ट्रीयीकरणाला उत्तमरावानी कडाडून विरोध केलाच; पण सामुदायिक शेतीची कल्पनाही अव्यवहार्य आहे असे सांगितले. जमिनीच्या मालकी हक्काला धक्का लागता कामा नये, तरच शेतमालाचे उत्पादन वाढेल. जपानच्या शेतीचे उदाहरण देऊन ते म्हणाले, 'जपानमध्ये सात एकराची कमाल मर्यादा आहे. गावात तीनशे शेतकरी असतील तर त्यातील एक शेतकरी सर्वांच्या जमिनीचे नमुने गोळा करतो आणि बियाणे संशोधन केंद्रात जातो. कोणत्या जमिनीमध्ये कोणत्या जातीचे भात-पीक चांगले येईल याची तो माहिती घेतो. त्यानंतर खतविषयक संशोधन केंद्राकडे हा

# उत्तमराव

उत्तमराव पाटील हे माणसे गोळा करणारे गृहस्थ आहेत. माणसांचा संग्रह करणे हे खरं त्यांचं व्यसनच आहे. शांत स्वभाव, आग्रही वृत्ती ही त्यांची वैशिष्ट्ये म्हणता येतील. आग्रहीपणा जवळ असूनही ते माणसे तोडून टाकीत नाहीत. उत्तमरावाचा आग्रहीपणा किती असतो? १९६२ च्या निवडणुकीत जनसंघाचा जाहीरनामा तयार करण्यासाठी जम्मूला कार्यकारिणीची बैठक भरली. या बैठकीत उत्तमरावानी भारताला ३००० मैलांचा समुद्रकिनारा आहे, तेव्हा जनसघाच्या जाहीरनाम्यात मत्स्योद्योगाचा समावेश करावा असे सांगितले. कार्यकारिणी मत्स्योद्योगाचा विचार करण्यास तयार नव्हती. 'एवढी मोठी किनारपट्टी असताना तुम्ही मत्स्योद्योगाचा विचारच करणार नाही? मासे खाणारे तुम्ही नसाल म्हणून काय मासे खाणारे व मासे पागणारे यांचा विचारच करावयाचा नाही काय?' अशी विचारणा उत्तमरावांनी केली. जनसंघाच्या जाहीरनाम्यात मत्स्योद्योगाचा समावेश आढळणार नाही; पण 'राज्यानी आपल्या परिस्थितीप्रमाणे विचार करून काही तरतुदी राज्याच्या जाहीरनाम्यात घ्याव्यात' असे कार्यकारिणीने ठरविले. हे जे झाले ते उत्तमरावांच्या आग्रहामुळे झाले आहे. उत्तमराव आग्रही कसे आहेत त्याचे हे एक उदाहरण!

स्वातंत्र्य-चळवळीत उत्तमरावांनी भाग घेतलेला नाही. एम्. ए., एल्‌एल्. बी. झाल्यानंतर उत्तमरावांना विरोधी पक्षात जाऊन काम करावे, विरोधी पक्षाचा एक आदर्श नेता व्हावे असे वाटू लागले. असे वाटत असतानाच उत्तमराव यांचा शेतकरी कामगार पक्षाशी संबंध येऊ लागला. त्या पक्षाची किरकोळ कामे करीत शे. का. पक्षाचे ठरावही ते लिहू लागले. उत्तमरावांनीच त्याची आठवण सांगितली. '१९४८ साली शे. का. पक्षाची अमळथे (जिल्हा धुळे) या गावी बैठक भरली. बैठकीचे काही ठराव आपण तयार करून दिले. तेव्हा नेत्यांनी मला पक्षाचा सभासद हो असे सुचविले. पक्षाचा सभासदच व्हायचे तर प्रादेशिक पक्षाचा सभासद व्हायचे नाही, अखिल भारतीय पक्षाचा सभासद व्हावे असा विचार केला. समाजवादी पक्षाविषयी मला आकर्षण होते; पण काश्मीरच्या प्रश्नावर समाजवादी पक्षाची भूमिका मला मान्य नव्हती. म्हणून मी जनसघाकडे वळलो. त्या वेळी श्यामाप्रसाद मुखर्जी याचा प्रभाव पडला होता,' असे उत्तमरावांनी सांगितले.

उत्तमराव किती शांतपणे काम करतात याचा अनुभव केंद्रीय मंत्री हेमवतीनंदन बहुगुणा यानाही आला. जनता पक्षाच्या निवडणूक समितीची बैठक चालू होती. उमेदवारांची नावे सुचविताना बऱ्याच वेळा असे व्हायचे की, समाजवादी उमेदवारांची नावे कधी राजारामबापू पाटील सुचवीत तर कधी अन्य पूर्वाश्रमीचे कॉंग्रेसनेते सुचवीत, कधी समाजवादी, जनसंघ व इतर पक्षातील चागल्या उमेदवाराची नावे सुचवीत. हे पाहून बहुगुणा उत्तमरावाना म्हणाले, 'यह क्या बात है? आपने कुछ कामही नही किया ऐसा लगता है। आप कुछ बोलते भी नही, आपने पहलेंही नाम तय कर लिया होगा ऐसा लगता है।' पडद्याआड राहून काम कसे करावे हे उत्तमराव पाटील यांना चागले माहीत आहे.

*

शेतकरी जातो. मातीचे हे नमुने, त्याकरिता हे बियाणे आणि या दोन्हीना कोणते खत लागेल हे तो विचारतो. खताची माहिती घेतल्यावर गावातील जमिनीला लागणारे खत गावातच तयार करण्यात येते. जमिनीला आवश्यक असणारे खत तयार करण्यामुळे रोजगारही उपलब्ध होतो. भारतात ही परिस्थिती निर्माण झाली पाहिजे. सब घोडे बारा टक्के या न्यायाने एकाच कारखान्यात देशाच्या सर्व जमिनीकरिता एकाच प्रकारची खते तयार करता कामा नयेत. जपानमध्ये सामुदायिक शेतीचे प्रयत्न यासारखे आहेत. सर्वांनी मिळून जमीन कसावी ही कल्पना तेथे नसते. तसे केले तर उत्पादन घटेल!' जीवनावश्यक वस्तूची निर्मिती, वाटप, शेती, शेतमालाच्या किंमती आदीसंबंधी आपले विचार सांगितल्यानंतर उत्तमरावांनी जनता पक्ष सेवाभावी कार्यकर्त्यांचे मोहोळ असलेला पक्ष राहावा याची दक्षता घेणे कसे आवश्यक आहे, त्याकरिता काय केले पाहिजे याचे विवेचन केले. ते म्हणाले, 'स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कॉंग्रेसमध्ये असलेला सेवाभाव हळूहळू नाहीसा होत जाऊन आज तो पूर्णपणे नाहीसा झाला आहे जनता पक्षाला या प्रक्रियेपासून अलिप्त ठेवण्यासाठी नेत्यांना सतत सतर्क राहावे लागेल सरकार व जनता यांच्यात पुढारीपण हा दुवा होता. दोहोमध्ये आज असलेला पुढारीपणाचा दुवा नाहीसा करून सेवाभावी कार्यकर्त्यांचे मोहोळ, असे स्वरूप जनता पक्षाचे राहिले पाहिजे याची दक्षता नेत्यानी घेतली पाहिजे.

## गुणवत्तेला महत्त्व

'जनता पक्षात परस्परविरोधी विचार मांडणारे कार्यकर्ते व पुढारी असले पाहिजेत. पूर्वाश्रमीचे समाजवादी व जनसंघीय यानी बाहेर पडता कामा नये असे माझे वैयक्तिक मत आहे. परस्परविरोधी विचार मांडणारे गट एका पक्षात असणे सामान्य नागरिकाच्या हिताचे आहे. परस्पर विरोधी विचाराच्या देवाणघेवाणीतून व्यवहारी धोरणे ठरविली जातात. विविध उपक्रम राबविले जातात. पुजीपती व उद्योगपती यांचा प्रत्यक्ष प्रभाव सरकारवर आणि पक्षावर कधीही होता कामा नये कोणत्याच पक्षावर उद्योगपतीचा प्रभाव राहणार नाही अशी परिस्थिती आज निर्माण झाली आहे. मी स्वत: पक्षाच्या धोरणापेक्षाही पक्षाच्या गुणवत्तेला महत्त्व देतो. माझा हा मुद्दा मी अधिक स्पष्ट करतो. कोणत्या धंद्याचे राष्ट्रीयीकरण व्हावे हे ठरविण्यासाठी यत्रणा उभी केल्यावर आर्थिक धोरणाचा प्रश्न हा काहीसा गौण राहील. पक्षाच्या गुणवत्तेला प्राधान्य देणे आवश्यक राहील.'

उत्तमराव पाटील याचे हे सर्व विचार ऐकल्यानंतर मी त्याना विचारले 'उत्तमराव, हे विचार तुम्ही राजकारणात आला तेव्हापासून जोपासलेले आहेत की त्यात अलीकडे काही बदल झाला आहे?'

'विचारांच्या बाबतीत परिस्थितीचा परिणामही होत असतो. परिस्थितीच्या परिणामातून माझे हे विचार बनले आहेत.

## जातिभेद, धार्मिक प्रश्न

जातिभेदाच्या उच्चाटनासंबंधी उत्तमराव मूलभूत स्वरूपाचे विचार मांडतात. मुळे कुठार केल्याशिवाय जातीयवाद जाणार नाही. आणि उत्तमराव मूळे कुठारच करू पाहतात.

'जातीपातीपेक्षा भारतीय संस्कृती अलग अशी चीज आहे. जातीजातीमुळे आपली प्रगती रोखली गेली आहे, ही वस्तुस्थिती आहे. निव्वळ प्रगतीच रोखली असे नव्हे तर आपण मानवतेपासूनही वचित झालो आहो. अस्पृश्यसमाजाचा विचार करता जातिव्यवस्थेमुळे माणुसकीला वचित झालो आहोत. तेव्हा जाती या तुटल्याच पाहिजेत. त्यासाठी वातावरण निर्माण केले पाहिजे. वातावरणनिर्मितीसाठी प्रथम आडनावाची पद्धती बद केली पाहिजे पाटील, देशमुख, कुलकर्णी या आडनावामुळे जाती स्पष्ट होतात. ही पद्धती बदलली व गावाच्या आडनावानेच सर्वजण एकमेकांना ओळखू लागलो तर आडनावामुळे स्पष्ट होणाऱ्या जाती पडद्याआड जातील. माझे आडनाव माझ्या गावाच्या नावावरून उत्तमराव मळगावकर झाले तर माझ्या नावातील 'राव' या शब्दामुळे मी कोणत्या जातीचा आहे हे ओळखले जाईल; पण माझ्या मुलाची नावे विजय, प्रदीप अशांसारखी आधुनिक राहतील. त्यांच्या मुलाची नावेही तशीच राहतील व ती दिनेश मळगावकर अशा पद्धतीची हळूहळू होतील व माझ्या नावातील राव हळूहळू गळून पडेल. मग मळगावकर हा मराठा आहे की आणखी कोणत्या जातीचा आहे हे नावावरून कळणार नाही. हे केवळ हिंदूनीच करावे असे नाही मुसलमानानी हेच करावे हमीद मळगावकर असे नाव त्यांनी घेतले की हमीद हा खान आहे की पठाण आहे हे विचारल्याशिवाय कळणार नाही. जसजसा काळ जाईल तसतसे मुद्दाम कोणी जात विचारणार नाहीत.'

'धर्म ही वैयक्तिक बाब मानली पाहिजे. आर्थिक प्रश्नाबाबत वेगवेगळ्या धर्मांचे वेगवेगळे प्रश्न असणार नाहीत. ख्रिश्चन माणसाचे आर्थिक प्रश्न व पारशी माणसाचे आर्थिक प्रश्न, हिंदू माणसाचे आर्थिक प्रश्न आणि मुसलमान धर्मीयांचे आर्थिक प्रश्न वेगवेगळे असू शकणार नाहीत. आर्थिक प्रश्न सर्व धर्मांचे सारखेच होतील. मात्र कंपनीच्या वारसा हक्कासाठी समान कायदा करता येईल का याचा विचार केला पाहिजे. संपत्तीबाबत समान कायदा केला की वेगवेगळ्या धर्मांचे वेगवेगळे प्रश्न राहणार नाहीत,' असे सांगून उत्तमराव पुढे म्हणतात,

'मग राहतात वेगवेगळ्या धर्मांच्या सामाजिक समस्या; परंतु या समस्या सोडविण्यासाठी वेगवेगळ्या धर्मांच्या नावाखाली त्या त्या धर्मीयांच्या स्वतंत्र संघटना ठेवण्याचीही आवश्यकता नाही.'

## भ्रष्टाचार

'भ्रष्टाचाराचा प्रश्नही गंभीर आहे. भ्रष्टाचार नष्ट करण्यासाठी जिल्हा पातळीवर समिती नेमावी. या समितीचा अध्यक्ष सर्व पक्षानी मान्य केलेली स्वच्छ चारित्र्याची व्यक्ती असावी. एखाद्या पक्षातील कार्यकर्त्याविषयी भ्रष्टाचाराचा आरोप करण्यात आला की, ज्या पक्षातील व्यक्तीविरुद्ध आरोप करण्यात आला आहे, त्या पक्षानेच आरोपाची चौकशी करून महिन्याभरात आपला अहवाल समितीला द्यावा व समितीने त्यावर निर्णय द्यावा. चौकशी ठराविक काळात करण्यात आली नाही तर समितीने स्वत: चौकशी करावी. जर ही व्यक्ती दोषी ठरली तर ती व्यक्ती ज्या पक्षातील आहे त्या पक्षानेच अशा माणसाला पाच वर्षांकरिता निवडणुकीला अपात्र ठरवावे.'

उत्तमराव पाटील यांच्या मुलाखतीच्या वेळी त्यांनी काही प्रश्नांना उत्तरे ज्या पद्धतीने दिली त्यावरून, जनता व त्याच्या मित्रपक्षांना बहुमत मिळाले तर उत्तमराव मुख्यमंत्री होण्याची शक्यता जाणवली होती. उत्तमरावही त्याचा इन्कार करीत नव्हते. मुख्यमंत्रीपद कोणत्या घटकपक्षाकडे जावे हा हिशोब करूनच घटकपक्ष तिकिटासाठी स्पर्धा करत नाहीत ना अशी शंका येऊन गेली. घटकपक्षात तिकिटे मिळण्याबाबत स्पर्धा चालू असल्याचे उत्तमरावांनीच सांगितले होते. त्यामुळे कार्यक्रमाच्या आग्रहाऐवजी मुख्यमंत्रीपदालाच जनता पक्षही अधिक महत्त्व देत आहे का असे वाटू लागले व (कदाचित) भावी मुख्यमंत्र्यांची मुलाखत आपण घेतली असे मनात म्हणतच मी उत्तमरावांचा निरोप घेतला. ☐



# केवळ लाटेवर अवलंबून राहिलेलो नाही. तळापासून संघटनाही बांधल्या जात आहेत.

## पन्नालाल सुराणा

सरचिटणीस, जनता पक्ष

मुलाखत : जगन फडणीस

'शेतकरी कामगार पक्षाला ऐशी जागा देण्याबाबत झालेल्या सर्व वाटाघाटीत उत्तमराव पाटील आणि वसंतराव भागवत हेही सहभागी झाले होते. तसेच निवडणूक समितीलाही सर्व घडामोडींची माहिती वेळोवेळी दिली होती. असे असताना शेतकरी कामगार पक्षाला एस्. एम्. जोशी यांनी एकट्याने ऐशी जागा दिल्या असे कोणी म्हणत असेल तर ते अज्ञानाच्या पोटी तरी असेल किंवा जाणूनबुजून जनता पक्षात दुही निर्माण करण्याच्या हेतूने तरी असेल. एसेम्वर करण्यात येत असलेल्या आरोपांसंबंधी हेच दोन आधार संभवतात. तिसरा आधार संभवतच नाही.' असे परखड उद्गार जनता पक्षाचे सरचिटणीस पन्नालाल सुराणा यांनी शे. का. पक्षाला देऊ केलेल्या जागांसंबंधी प्रथमच गौप्यस्फोट करताना काढले. सुराणा यांनी ही माहिती दिली तेव्हा आम्ही काही पत्रकारांनी उत्तमराव पाटील यांना थोड्या दिवसांपूर्वी एसेम्वरील हल्ल्याबाबत विचारले होते. त्या वेळी उत्तमरावही म्हणाले होते, 'एकट्या एस्. एम्. नी तो निर्णय घेतलेला नाही. वुई आर आलसो पार्टी!' परंतु एस्. एम्. जोशी यांच्यावर टीका होऊ लागली की, काही मंडळी वस्तुस्थिती सांगत नाहीत. ती अंधारात ठेवली की, एसेम्वर हल्ला करणारांना सोयीचे ठरते आणि जनमानसात एसेम्नी केवढी मोठी चूक केली असे चित्र उभे राहाते. शे. का. पक्षाला जागा देण्याच्या प्रश्नावरून 'जनता'चे खासदार सुब्रह्मण्यम् स्वामी यांनी एस्. एम्. जोशी यांच्याविरुद्ध औरंगाबाद येथे बरेच गरळ ओकले होते. 'एसेम्नी आणीबाणीत काय केले?' असेही त्यांनी पत्रकार परिषदेत पत्रकारांनाच विचारले. त्यामुळे पन्नालाल सुराणा यांना जागावाटपाविषयीचा एकंदर प्रकार विचारल्याशिवाय त्यांची मुलाखत पूर्णच होणार नव्हती. शे. का. पक्षाच्या जागांबाबत सुराणा बोलण्यास तयारच नव्हते; पण सुब्रह्मण्यम् स्वामी यांची एसेम्विरोधी वक्तव्ये वगैरे गोष्टी सुराणा यांना दाखवून दिल्या तेव्हा एसेम्वरील धादांत खोट्या आरोपांमुळे सुराणा चिडले. एरव्ही शांत, हळू आवाजात बोलणारे पन्नालाल मोठ्या आवाजात बोलू लागले. ते संतापले म्हणूनच वादग्रस्त झालेल्या निर्णयात कोणाकोणाचा सहभाग होता यावर प्रकाश पडला.

'पूर्वाश्रमीचे सर्वच जनसंघीय मित्र

समाजवाद्यावर टीका करीत आहेत असे नव्हे' अशी सुरुवात करीत सुराणा म्हणाले, 'जनसंघीयातील काहीजण आमच्याविषयी आत्मीयतेने बोलतात. ते जनता पक्षाच्या ध्येयधोरणाशी एकरूप झाले आहेत; परंतु सुब्रह्मण्यम् स्वामींविषयी तुम्ही म्हणता ते मात्र खरे आहे. स्वामी राजकारणात तसे नवे आहेत. छोटया जॉर्ज वॉशिंग्टनने त्याला दिलेली कुऱ्हाड दिसेल त्या झाडावर चालविली तसाच प्रकार स्वामींच्या बाबतीत होत आहे.'

सुराणा सांगत होते, 'शे. का. पक्षाशी झालेल्या सर्व वाटाघाटीत उत्तमराव पाटील, वसंतराव भागवत हेही सहभागी होते. निवडणूक समितीलाही सर्व घडामोडींची माहिती वेळोवेळी दिली होती. असे असताना शे. का. पक्षाला एस्. एम्. जोशी यानी एकटयानेच शब्द दिला असे कोणी म्हणत असेल तर ते अज्ञानापोटी किंवा जाणूनबुजून पक्षात दुही निर्माण करण्याच्या हेतूने असेल.

'आणीबाणीत एस्. एम्. जोशी यांनी काय केले, असे स्वामी विचारतात. एसेम्नी आणीबाणीत काय केले याची माहिती महाराष्ट्राला व देशालाही आहे; परंतु तरीही काही लोकांच्या माहितीसाठी मी सांगतो. एसेम्नी पक्षीय राजकारणापासून स्वतःला काही काळ अलिप्त ठेवले होते; पण बिहार आंदोलन सुरू झाले तेव्हा एसेम्नी बिहार आंदोलनात स्वतःला झोकून दिले. इतकेच नव्हे तर त्या वेळी जयप्रकाश नारायण यांनी असेही म्हटले होते की, माझ्या मागून एस्. एम्. जोशीच चळवळीची सूत्रे चालवितील. बिहार जनसंघर्ष समिति व बिहारी जनतेला जयप्रकाशानी हे सागितले होते.

'आणीबाणी लादली तेव्हापासून एस्. एम्. आणीबाणीच्या विरोधात सतत लढत राहिले आहेत. राष्ट्रीय पातळीवरील जनतंत्र समाज व पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज् या सघटना स्थापन करण्यात त्यांचा वाटा मोठा आहे. अहमदाबाद, दिल्ली, मुबई, मद्रास या ठिकाणी नागरी हक्क परिषदा संघटित करण्यात त्यांनी महत्त्वाची कामगिरी बजाविली होती; पण याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे हुकुमशाहीविरुद्धचा लढा ग्रामीण भागात संघटित केला पाहिजे असा त्याचा दृष्टिकोण असल्याने एस्. एम्. मिळेल त्या वाहनाने महाराष्ट्राच्या खेडयापाडयापर्यंत हिंडले. काही ठिकाणी जुन्या प्रतिष्ठित पुढाऱ्यांनी एसेम्ना आपल्या घरी उतरवून घेण्याचेही नाकारले; पण एसेम्नी सर्व अपमान पचविले आणि लाखो ग्रामीण बंधुभगिनींपर्यंत लोकशाहीचा सदेश पोचविला.'

जनता व त्याच्या मित्र पक्षाच्या समन्वय समितीमध्ये शे. का. पक्षाला ऐंशी जागा देण्याचा निर्णय झाल्यानतर जनता पक्षाने एकतर्फीच निर्णय घेऊन शे. का. पक्षाला ४५–४६ जागा देण्याचा निर्णय घेतला आणि शेकापने जाहीर केलेल्या इतर मतदारसंघात जनता पक्षाचे आपले उमेदवार उभे करण्याचे ठरविले. साहजिकच शे. का. पक्षाने जनतापक्षाबरोबर असलेली मैत्री सपुष्टात आणली व जनता उमेदवाराविरुद्ध आपले उमेदवार उभे करण्याचे शे. का. पक्षाने जाहीर केले. या परिस्थितीचा लाभ कॉंग्रेसला मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे नव्याने निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेताना सुराणा म्हणाले की, 'शे. का. पक्षाने जरी मैत्री संपुष्टात येत आहे असे जाहीर केले असले तरी जनता पक्षाचा प्रयत्न असाच राहील की, जेथे कॉंग्रेसचा पराभव करणे शे. का. पक्षाला अवघड असून जनतापक्षाला तो करणे शक्य आहे, अशाच ठिकाणी जनता पक्ष आपला उमेदवार उभा करील. अशा ठिकाणी जनता पक्षाला शे. का बरोबर मैत्रीपूर्ण लढती द्याव्या लागतील; पण त्याला नाइलाज आहे. जेथे शे. का. पक्षाचा उमेदवार कॉंग्रेसचा पराभव करू शकतो तेथे जनता पक्ष शे. का. प. च्या उमेदवाराला सर्व प्रकारे मदत करणार आहे.

ऐंशी जागांचा शे. का. पक्षाचा आग्रह अवाजवी आहे असे त्या पक्षाला इतर मित्र पक्षानीही सागितले होते; पण शेकापने हट्ट सोडला नाही. पुढे प्रत्यक्ष जागा ठरविताना शेकापजवळ उभे करण्यासाठी उमेदवारच नाहीत हे स्पष्ट झाले. अशा स्थितीमध्ये कॉंग्रेस पक्षाचा पराभव करण्याचा मूळ हेतू सफल होण्याच्या दृष्टीने जनता पक्षाला काही कठोर निर्णय घेणे भाग पडले. कॉंग्रेसचा पराभव करण्याची जबाबदारी प्रामुख्याने जनता पक्षाची आहे असे महाराष्ट्रातील जनमत आहे. वृत्तपत्रानी व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया व जबाबदार राजकीय कार्यकर्ते आणि निरीक्षक यांची मते विचारात घेऊनच जनता पक्षाने शे. का. पक्षाच्या जागाविषयी निर्णय घेतला आहे. शेतकरी कामगार पक्षाचे नेते व कार्यकर्ते जनता पक्षाची भूमिका अजूनही समजावून घेतील अशी आशा पन्नालाल सुराणा करतात.

'शेकापला एसेम् व इतरांनी दिलेला शब्द ते पाळू शकत नाहीत याबद्दल आम्हालाही मनापासून वाईट वाटते; पण महाराष्ट्रात कॉंग्रेसची एकाधिकारशाही संपविण्याची संधी चालून आली असता त्याबाबतचा निर्णय व्यक्तिनिरपेक्ष, समतोल बुद्धीनेच घेणे भाग आहे असे आता सर्वांनी मनोमन मानले आहे!'


'पक्षाचा अध्यक्ष या नात्याने एस्. एम्. जोशी यांचा शब्द पाळला नाही म्हणून एसेम्सारखा माणूस बाजूला झाला तर त्याचे परिणाम पक्षावर होणार नाहीत काय?' असे मी सुराणांना विचारले. कारण मधल्या काही दिवसांत एस्. एम् जोशी यांनी राजीनामा दिला अशा वावडया उडविण्यात आल्या होत्या; परंतु एस् एम्. राजीनामा देतील असे सुराणा यांना वाटत नाही.

'निवडणुकीनतर पक्ष जनतेत संघटित करावयाचा आहे. एस्. एम्. जोशी यांना पक्ष सघटित करण्याचे काम आवडणारे असे आहे. निवडणुकी तोंडावर असताना झालेल्या रस्सीखेचीमुळे मनाला यातना झाल्या तरी सपूर्ण क्रांतीचे उद्दिष्ट जनता पक्षाने डोळयांपुढे ठेवले आहे. त्यासाठी एसेम्सह सर्व क्रियाशील राहतील!' असे पन्नालाल यांना वाटते.


'शेकाप ज्या ठिकाणी निवडणूक जिंकू शकणार नाही अशा ठिकाणी जनता पक्ष आपले उमेदवार उभे करणार आहे; परंतु अशा ठिकाणी मित्रपक्षावर टीका करावयाची नाही आणि कॉंग्रेसचा प्रथम पराभव करावयाचा या सूत्राचा आम्ही विसर पडू देणार नाही!'

कॉंग्रेसचा पराभव करण्याकरिता सर्व ठिकाणी सगळयांनाच एकमेकांच्या मदतीची गरज आहे, हे मान्य करून श्री. सुराणा म्हणाले की, 'यासाठीच ज्या मतदार संघात जनता उमेदवार कॉंग्रेसचा पराभव करू शकेल तेथेच आम्ही आमचे उमेदवार उभे

पृष्ठ १८ वर



# जनतेसाठी जनता सरकार



मार्च १९७७ मध्ये लोकसभेच्या निवडणुका झाल्या. हुकुमशाहीचा शांततेच्या मार्गाने जनतेने पराभव केला.

केंद्रातील सतत ३० वर्षांची कांग्रेस पक्षाची राजवट संपली. जनता पक्षाची राजवट सुरू झाली. अनेक राज्यांतही जनता पक्षाची मंत्रिमंडळे कारभार पाहू लागली. काश्मीर, प. बंगाल, तामीळनाडू या राज्यात बिगर कांग्रेस व बिगर जनता सरकारे आहेत. काही राज्यात कांग्रेसचीही मंत्रिमंडळे आहेत.

यावरून एक गोष्ट स्पष्ट होते. एक विशिष्ट पुढारी सत्तेवर नसेल तर देशाचे कसे होईल ही भीती निराधार ठरली आहे. ज्याला ९० वर्षांची परंपरा आहे आणि अनेक दिवंगत नेत्यांची पुण्याई पाठीशी आहे असा पक्ष सत्तेवर नसेल तर ब्रह्मांड कोसळेल या प्रकारातला फोलपणाही सिद्ध झाला आहे.

पुढारी येतील आणि जातील, पक्ष येतील आणि जातील, भारतीय जनता आपल्या देशाचा कारभार लोकशाही पद्धतीने चालवायला समर्थ आहे हे गेल्या १० महिन्यांच्या अनुभवाने सगळयांना कळून चुकले आहे.

## संघराज्य मजबूत बनले

केंद्रस्थानी असलेले जनता सरकार अनेक राज्यांतल्या बिगर जनता पक्षाच्या सरकाराशी बरोबरीच्या नात्याने व सहिष्णुतेने वागत आहे. १९६७ ते १९६९ या काळात अनेक ठिकाणी सत्तेवर आलेल्या बिगर कॉंग्रेसी मंत्रिमंडळाना कोसळविण्याचा खेळ केंद्रस्थानी असलेल्या कॉंग्रेस पक्षाने केला होता. २–३ राज्यांतील मंत्रिमंडळे व विधानसभा तडकाफडकी विसर्जित केल्या होत्या. त्यामुळे संघराज्य नाममात्र उरले होते. देशात एककेंद्री कारभार चालला होता.

जनता पक्षाच्या केंद्र सरकारने राज्य सरकारांच्या हक्कांचा आदर करून संघराज्याचा पाया मजबूत बनविला आहे. पक्षीय दृष्टिकोन बाजला ठेवून व्यापक जनहिताच्या दृष्टीने सर्व राज्य सरकारांना आवश्यक ते सहकार्य दिले जात आहे. एखाद्या राज्यसरकारचे एखादे कृत्य योग्य वाटले नाही तरी आपले मत त्या सरकारवर लादण्याचा प्रयत्न केंद्र सरकारने चुकूनही केलेला नाही.

## स्वातंत्र्यनिष्ठ मानवतावादी परराष्ट्र धोरण

केंद्रात जनता पक्ष अधिकारावर आला तर आंतरराष्ट्रीय राजकारणात एकांगी धोरण स्वीकारून अमेरिकन सत्ता गटाच्या दावणीला भारत देश बांधला जाईल असा प्रचार कॉंग्रेस व उजव्या कम्युनिस्टांनी चालविला होता तो बिनबुडाचा होता हे आता अनुभवाने सिद्ध झाले आहे.

कुठल्याही सत्ता गटाच्या आहारी न जाता जगातील सर्व देशांशी बरोबरीच्या नात्याने मैत्रीचे व सलोख्याचे संबंध ठेवणे हे आपल्या नव्या सरकारचे परराष्ट्रीय धोरण आहे.

अमेरिका, इंग्लंड व इतर पाश्चात्य राष्ट्रांनी भारतातील लोकशाहीच्या विजयाचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. त्या देशांचे नेते भारताला भेट देऊन जात आहेत.

सोव्हिएट रशियाबरोबर बांगला देश निर्मितीच्या अगोदर झालेला करार दृढ बनविण्याच्या दृष्टीने अनेक करार करण्यात आले. नेत्यांच्या परत भेटी झाल्या. भारतीय लोकशाहीचा गौरव सोव्हिएट रशियानेही केला.

अण्वस्त्र निर्मितीवर बंदी घालण्याच्या करारावर सही करण्याचे भारताने नाकारले. ज्या देशाकडे सध्या अणुशस्त्राचा साठा आहे तो त्यांनी प्रथम नष्ट करावा म्हणजे अण्वस्त्र देशाच्या निर्मितीबंदीच्या करारावर सर्व देश बरोबरीच्या नात्याने सह्या करू शकतील असे भारताचे म्हणणे आहे.

अणुशक्तीचा उपयोग फक्त शांततामय कामासाठीच करावयाचा असे आपले धोरण असल्याचे भारत सरकारने जाहीर केले.

जगभर व विशेषतः आफ्रिका आणि द. अमेरिका खंडात चालू असलेल्या साम्राज्यशाहीविरुद्ध स्वातंत्र्य लढ्याना भारताचा पाठिंबा राहील असे परराष्ट्र मंत्र्यांनी जाहीर केले. द. र्‍होडेशियात मूठभर गोऱ्या लोकांची सत्ता संपुष्टात आणून तेथील स्थानिक जनतेला सत्तेत योग्य वाटा मिळावा यासाठी आवश्यक ती पावले उचलण्याची जबाबदारी इंग्लंडची आहे, असे परराष्ट्र मंत्र्यांनी सांगितले.

अरब देशांशी भारताचे मैत्रीचे संबंध अधिक दृढ झालेले आहेत. पॅलेस्टाइनमध्ये इस्राइलने केलेले आक्रमण मागे घ्यावे अशी मागणी भारत सरकारने केली आहे.

चीन, पाकिस्तान, बांगला देश या शेजारील देशांशी संबंध सुधारले आहेत.

गंगा पाणीवाटपाच्या प्रश्नावर बांगला देशाबरोबर फराक्का धरण करार करण्यात येऊन गेली ३० वर्षे भिजत पडलेला हा प्रश्न सोडविण्यात आला आहे.

नेपाळबरोबरील मैत्रीचे संबंध अधिक दृढ झालेले आहेत. नेपाळने अंतर्गत कारभारात लोकशाहीचा वाढत्या प्रमाणात अंगीकार करावा असे आवाहन जनता पक्षाचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर यांनी केले आहे.

## भाकरी आणि स्वातंत्र्य

जनता पक्षाने लोकसभा निवडणुकीच्या वेळी जनतेला सादर केलेल्या जाहीरनाम्यात म्हटले होते की, सर्वसामान्य माणसाला भाकरी व स्वातंत्र्य दोन्हींची हमी मिळावी या दिशेने पावले उचलली जातील.

जनमताच्या प्रचंड पाठिंब्यामुळे जनता पक्ष केंद्रात सत्तेवर आल्यानंतर त्याने या दिशेने भरीव पावले उचलली आहेत ही आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे.

जून १९७५ मध्ये पुकारलेली आणीबाणी व डिसेंबर १९७१ मध्ये पुकारण्यात आलेली बाह्य आणीबाणी या दोन्ही रद्द करण्यात आल्या.

त्यामुळे भारत संरक्षण कायदा रद्द झाला. त्या कायद्याखाली आणीबाणीत भरण्यात आलेले खटले काढून घेण्यात आले.

हजारो राजबंद्यांची मुक्तता करण्यात आली. १९७२ पासून सुमारे पंधरा हजार नक्षलवाद्यांना आधीच्या सरकारने विनाचौकशी बेमुदत तुरुंगात डांबून ठेवले होते. त्या सर्वांची सुटका करण्यात आली.

घटनेच्या कलम १९ अन्वये सप्त स्वातंत्र्ये उपभोगण्याचा नागरिकांना हक्क आहे हे सरकारने मान्य केले.

आणीबाणीच्या काळात न्यायालयाचे दरवाजे बंद करण्यात आले होते, ते जनता राजवटीत उघडण्यात आले. त्यामुळे राजनच्या वडिलांना केरळ उच्च न्यायालयात हेबिअस कॉर्पस अर्ज करता आला. त्या अर्जाची सुनावणी झाली. राजन या इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्याला आणीबाणीत पोलिसांनी पकडले होते व त्याचा ठावठिकाणा त्याच्या वडिलांना पोलीस सांगत नव्हते. केरळ उच्च न्यायालयाने त्याला न्यायासनासमोर हजर करण्याचा हुकूम सोडला; पण केरळचे मुख्यमंत्री श्री. करुणाकरन् यांनी कबूल करूनही ते राजनला कोर्टासमोर हजर करू शकले नाहीत. कारण पोलिसांनी आणीबाणीतच त्याचा खून केला होता ! हे सत्य उघडकीला आल्यावर श्री. करुणाकरन् यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्याच्यावर व ज्या डी. आय. जी. ने राजनला अटक केली होती त्याच्यावर खटला भरण्यात आला.

कामगार, शेतकरी, शेतमजूर, दलित, आदिवासी, मध्यमवर्गीय यांना सभा, मोर्चा, संप, निदर्शने, हरताळ–आदि मार्गांनी आपल्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेण्याचा अधिकार वापरता येऊ लागला.

आणीबाणीच्या काळात वृत्तपत्रावर जी बंधने घालण्यात आली

होती ती सर्व उठविण्यात आली आणीबाणीत रद्द करण्यात आलेला फिरोज गांधी कायदा परत पास करण्यात येऊन संसद व विधिमंडळाचे प्रतिवृत्त छापण्याबाबत वृत्तपत्रांना पूर्ण संरक्षण देण्यात आले.

आणीबाणीपूर्वी चार वृत्तसंस्था देशात कार्य करीत होत्या. त्यामुळे जनतेला खऱ्या बातम्या समजणे सोपे जात होते. आणीबाणीत सरकारने जबरदस्तीने त्या चार संस्थांचे 'समाचार' या एका वृत्तसंस्थेत एकत्रीकरण केले व बातम्या देण्याच्या स्वातंत्र्यावर अनेक निर्बंध घातले होते.

जनता सरकारने 'समाचार'चे चार वृत्तसंस्थांत विभाजन करायला परवानगी दिली आहे. बातम्या देण्याबाबतचे सर्व निर्बंध काढून घेतले आहेत.

आकाशवाणी व दूरदर्शन यांचा आणीबाणीच्या काळात अतिशय दुरुपयोग करण्यात आला होता. जनता राजवटीने या माध्यमाचा पक्षनिरपेक्ष दृष्टीने वापर करण्याचे स्वातंत्र्य व स्वायत्तता संबंधित अधिकाऱ्यांना दिली आहे. त्यामुळे पंतप्रधानांचे भाषण झाले की, दुसऱ्या दिवशी विरोधी पक्षनेत्याचे भाषण आकाशवाणीवर होऊ शकते.

## चांगले पायंडे

प्रशासनसुधारणा समितीच्या शिफारशीनुसार केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या पंचेचाळीसच्या आत ठेवण्यात आली आहे.

विधिमंडळाच्या सभासदसंख्येच्या एकदशांशापेक्षा अधिक संख्या मंत्र्यांची असू नये हा संकेत उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश आदी सर्व 'जनता' राज्यात पाळण्यात आला.

मंत्र्यांच्या घरासमोरील पोलीसपहारा कमी करण्यात आला. दौऱ्यावर असताना पोलिसांकडून मानवंदना स्वीकारण्याची प्रथा बंद करण्यात आली.

खास विमानाचा वापर न करण्याचा आदर्श पंतप्रधान मोरारजीभाईंनी घालून दिला. त्यामुळे सरकारी खर्चात खूप बचत होऊ लागली आहे मागे इंदिराबाई पंतप्रधान असताना राष्ट्रकुल परिषदेसाठी लंडनला गेल्या. त्या वेळी त्यांचा प्रवासखर्च मोरारजीभाई तशा परिषदेसाठी लंडनला गेले त्या वेळच्या त्यांच्या प्रवासखर्चाच्या चौपट झाला होता.

लोकसभेतील विरोधी पक्षाच्या नेत्याला कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा देण्यात आला. सर्व महत्त्वाच्या प्रश्नांवर विरोधी पक्षनेत्यावरोबर विचारविनिमय केला जातो.

## अत्याचार व भ्रष्टाचारांची चौकशी

आणीबाणीच्या काळात सत्ताधारी व नोकरशहा यांनी सत्तेचा दुरुपयोग करून सर्वसामान्य जनतेवर जे जुलूम व अत्याचार केले त्यांची चौकशी करण्यासाठी शहा आयोगाची नियुक्ती करण्यात आली. जुन्या सत्ताधाऱ्यांवर सूड उगवणे हा त्यामागचा हेतू नाही. तसेच राजकीय कारणास्तव कुणाही जुन्या सत्ताधाऱ्याला अटक करण्यात आलेली नाही. सत्तेचा गैरवापर करून जनतेचा छळ करणारांना कायद्यानुसार कडक शासन झाले पाहिजे या लोकशाही तत्त्वानुसारच या आयोगाची स्थापना करण्यात आली आहे आणि श्रीमती इंदिरा गांधी व त्यांचे सहकारी यांच्यावर प्रचलित कायद्यानुसार खटले भरले जात आहेत.

त्याचप्रमाणे श्री. संजय गांधींनी मारुती मोटारीसाठी आपल्या आईच्या हाती असलेल्या सत्तेचा दुरुपयोग करून जे गैरवाजवी फायदे मिळविले व भ्रष्टाचार केला त्यांची चौकशी करण्यासाठी गुप्ता आयोग, कर्नाटकचे माजी मुख्य मंत्री श्री. देवराज अरस यांच्या भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी ग्रोव्हर आयोग व हरियानाचे माजी मुख्य मंत्री श्री. बन्सीलाल यांनी केलेल्या अत्याचाराच्या चौकशीसाठी जगनमोहन रेड्डी आयोग यांची नियुक्ती करण्यात आली.

## घटना दुरुस्ती व मिसा

आणीबाणीच्या काळात जनतेला अंधारात ठेवून तत्कालीन पंतप्रधानांनी ३८ ते ४२ व्या घटनादुरुस्त्या करून नागरिकांच्या लोकशाही अधिकारांची गळचेपी केली व सत्तेचे जास्तीत जास्त केंद्रीकरण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेला जे लोकशाही स्वरूप दिले होते ते बऱ्याच अंशी बदलून टाकले होते. या सर्व लोकशाही विरोधी घटनादुरुस्त्या व मिसासारखे जुलमी कायदे रद्द करण्याचे आश्वासन जनता पक्षाने जाहीरनाम्यात दिले होते. सध्या लोकसभेत जनता पक्षाला दोनतृतियांशपेक्षा अधिक बहुमत असले तरी राज्यसभेत कॉंग्रेस पक्षाचेच बहुमत आहे. घटनादुरुस्तीच काय, साधे कायदे व अंदाजपत्रक पास करण्यासाठीसुद्धा राज्यसभेत ते पास व्हावे लागतात. विरोधी पक्ष असलेल्या कॉंग्रेसने आपल्या राज्यसभेतील बहुमताचा फायदा घेऊन जनता पक्षाच्या मंत्रिमंडळाच्या कामात अडथळे आणले आहेत. त्यामुळे ३८ ते ४२ व्या घटनादुरुस्त्या रद्द करण्याच्या मार्गात अडचणी निर्माण झाल्या तरी कॉंग्रेसबरोबर सतत संवाद चालू ठेवून जनतापक्षाने काही घटनादुरुस्त्या मंजूर करून घेण्यात यश मिळविले आहे. या संबधात,

–सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय यांचे काढून घेतलेले अधिकार परत बहाल करणे;

–कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांच्या राष्ट्रविरोधी कारवायांना प्रतिबंध करण्याचे संसदेस अधिकार देणारे ३१–ड हे कलम वगळणे.

–राष्ट्रपती राजवटीची मुदत तीन वर्षांऐवजी एक वर्ष करणे ;

–आणीबाणीच्या काळातसुद्धा कलम १९ अनुसार नागरिकांचे हक्क स्थगित करण्याचा राष्ट्रपतीचा अधिकार रद्द करणे;

–प्रतिबंधक स्थानबद्धतेची मुदत ३ महिन्याऐवजी २ महिने करावी व प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या प्रकरणांचा फेरविचार करण्यासाठी सेवानिवृत्त हायकोर्ट न्यायमूर्ती सभासद असलेल्या सल्लागार मंडळाची नियुक्ती आवश्यक करणे या दृष्टीने कलम २२ मध्ये दुरुस्त्या करणे;

–कलम २१ (नागरिकांचे मूलभूत हक्क व न्यायालयाकडे दाद मागण्याचा हक्क) कुठल्याही परिस्थितीत अबाधित राहावे या दृष्टीने कलम ३५८ व ३५९ यात दुरुस्ती करणे;

अशा स्वरूपाच्या तरतुदी असलेले ४३ वे घटनादुरुस्ती विधेयक गेल्या डिसेंबरात संसदेने पास केले आहे.

## सार्वभौम सत्ता जनतेची

काही आर्थिक व सामाजिक परिवर्तनवादी बदल घडवून आणण्याच्या मार्गात राज्यघटनेतील काही तरतुदींमुळे अडचण येत होती. विशेषत: संपत्तीवरील मालकी हक्क. हा राज्यघटनेत मूलभूत हक्क मानला गेल्यामुळे खूप अडचणी आल्या. त्या दूर करण्यासाठी राज्यघटनेच्या मूलभूत हक्कांसकट कुठल्याही तरतुदीमध्ये दुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेला आहे कारण संसद सार्वभौम आहे असे मत पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांनी आग्रहाने मांडले होते, आपल्या पाशवी बहुमताच्या जोरावर त्या पक्षाने घटनेत अनेक मूलभूत बदल केले; पण संपत्तीवरील खाजगी मालकी हक्क हा मूलभूत हक्काच्या यादीतून वगळण्याचे टाळले. याबाबत गोलकनाथ या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असा निकाल दिला की, मूलभूत हक्काच्या यादीत सुद्धा दुरुस्ती करण्याचा संसदेला अधिकार आहे. त्यानंतर केशवानंद भारती या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असा निकाल दिला की, घटनेमध्ये दुरुस्ती करण्याचा संसदेला निर्विवाद अधिकार असला तरी घटनेच्या मूलभूत चौकटीमध्ये दुरुस्ती करण्याचा मात्र अधिकार नाही. सार्वभौमता, लोकशाही, प्रजासत्ताक पद्धती, नागरिकांचे मूलभूत हक्क इत्यादी मूलभूत चौकटीची वैशिष्ट्ये म्हणून सांगण्यात आली

आणीबाणीच्या काळात सत्ताधारी पक्षाने असे मानले की, घटनेत कुठलीही दुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेला आहे व त्याप्रमाणे नागरिकांची लोकशाही स्वातंत्र्ये संकुचित करणे, न्यायालयाचे व राज्यसरकाराचे अधिकार कमी करणे व केंद्र सरकारचे अधिकार वाढविणे अशा स्वरूपाच्या अनेक दुरुस्त्या करून घेतल्या. या दुरुस्त्या हानिकारक आहेत, एवढेच नव्हे तर संसद ही सर्वथा सार्वभौम आहे हें त्या दुरुस्त्या करण्यामागचे तत्त्वही हानिकारक आहे अशी भूमिका जनतापक्षाने लोकसभा निवडणुकीच्या वेळी लोकांसमोर मांडली होती. त्यानुसार जनतापक्षाने आता अशी भूमिका घेतली आहे की, घटनेच्या मूलभूत चौकटीत जर दुरुस्त्या करावयाच्या असतील तर सर्व मतदारांचे सार्वमत घ्यावे. संसदेतील विरोधी पक्षानेही याला संमती दिली असून लवकरच ती घटनादुरुस्ती संसदेत पास केली जाईल.

सार्वमताचे तत्त्व भारतासारख्या ३० कोटी मतदार असलेल्या देशाने स्वीकारणे ही फार मोठी घटना आहे. एकदा निवडून गेलेल्या प्रतिनिधींनी राज्यघटनेशी सुद्धा खेळ खेळायचा हे बरोबर नाही; पण हा धोका संभवतो म्हणून घटनादुरुस्ती करू नये अशी व्यवस्था करणेही बरोबर होणार नाही. म्हणून घटनेची लवचिकता कायम ठेवायची व मूलभूत स्वरूपाचे बदल करण्याचा अधिकार सर्वसामान्य जनतेला द्यायचा असा संपूर्ण लोकशाहीवादी तोडगा जनतापक्षाने काढला आहे. भारतीय जनता समजदार व विवेकी आहे असा जनतापक्षाचा दृढ विश्वास आहे हेही त्यावरून सिद्ध होते.

## कामगारांना न्याय

आणीबाणीच्या काळात सरकारने कामगारांचा बोनसचा हक्क हिरावून घेतला होता. जनतासरकारने आणीबाणीच्या पूर्वीचा बोनस कायदा पुनर्स्थापित केला.

सक्तीची बचत ठेवयोजना कामगार व पगारदारांना जाचक झाली होती ती रद्द करण्यात आली आणि त्या योजनेत साचलेले पैसे ठराविक हप्त्यात परत करण्याची व्यवस्था करण्यात आली.

कामगारांना अधिक नगद पैसा मिळणार होता तो त्यानी स्वेच्छेने बचतरोख्यात गुंतवावा म्हणून त्यांच्यासाठी खास १३ टक्के व्याजाचे व पाच वर्षे मुदतीचे राष्ट्रीय रोखे काढण्यात आले. कामगारांनीही या योजनेला चागला प्रतिसाद दिला.

## गरिबी हटावच्या दिशेने वाटचाल

भारतासमोरील बेकारी व विषमता हे दोन महत्त्वाचे प्रश्न सोडविण्यासाठी आर्थिक व राजकीय विकेंद्रीकरणाची कास धरली पाहिजे आणि विकास योजनेत शेतीला अग्रक्रम देऊन औद्योगीकरणाला नवी ग्रामाभिमुख दिशा दिली पाहिजे असे धोरण जनता पक्षाने स्वीकारले आहे. धोरणाची फेरआखणी करणे व त्यानुसार योजना तयार करून त्याच्या अंमलबजावणीची व्यवस्था करणे हे थोडे वेळ घेणारे काम आहे; पण त्या दिशेने ठोस पावले टाकली जात असून पहिल्या अंदाजपत्रकातही त्याचे प्रतिबिंब उमटले आहे. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठी चाळीस कोटी रुपयांची तरतूद केंद्र सरकारच्या अंदाजपत्रकात करण्यात आली आहे. शेती विकासावरील खर्च चाळीस टक्क्यावरून तीस टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आला आहे. खताच्या किंमती टनामागे रुपये १०० नी कमी करण्यात आल्या असून खतावरील सर्व अबकारी कर येत्या तीन वर्षांत रद्द करण्याचे जाहीर करण्यात आले आहे. हातमाग व यंत्रमागाला लागणाऱ्या सुतावरील अबकारी कर खूपच कमी करण्यात आला आहे.

शेतीविकास व ग्रामसुधारणा हे कार्यक्रम पार पाडण्यासाठी जनतेचा मनापासून सहभाग असला पाहिजे. हे साध्य करण्यासाठी आजच्या पंचायत राज्य संस्थाची पुनर्घटना कशी करावी याबाबत शिफारशी करण्यासाठी अशोक मेहतांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे.

गेल्या दहा महिन्यांत जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने व काही राज्य सरकारानी केलेल्या काही ठळक कामांची नोंद पुढीलप्रमाणे करता येईल.

## महागाई नियंत्रण

* गव्हाच्या आंतरराज्य वाहतुकीवरील निर्बंध उठवून देशभरची वाहतूक खुली करण्यात आली आणि तांदळाच्या ने-आणीवरील विभागीय निर्बंध रद्द (१ ऑक्टोबर) करण्यात आले.

* उदार व विकेंद्रित आयात धोरणांचा अंगीकार करण्यात आला. त्यामुळे साठलेल्या परकीय चलनाने निर्माण झालेल्या चलनवाढीचा ताण कमी झाला.

* १९७६ च्या पहिल्या सहामाहीत १३०१ कोटींनी पैशाचा पुरवठा वाढला होता व त्यामुळे महागाई वाढत होती. पैशाच्या पुरवठ्यामुळे मागणी वाढून भाववाढ झाली होती. १९७७ च्या पहिल्या सहामाहीत हा पैशाचा पुरवठा ९५८ कोटी इतका खाली आणला गेला. त्यामुळे भाववाढ रोखून धरण्यात यश मिळाले.

* ग्रामीण भागातील कार्डधारकांना शहरी भागाइतकीच साखर वाढवून देण्यात आली व भाव रु. २–१५ च ठेवण्यात आला. गणपती, दसरा, दिवाळी या सणांसाठी जादा साखर खुली करून खुल्या बाजारात साखरेचे भाव आटोक्यात आणले.

* निर्यातीमुळे चहाचे भाव वाढू नयेत म्हणून चहावर प्रत्येक किलोमागे ५ रु. निर्यात कर बसविण्यात आला आणि निर्यात रिबेट रद्द केला. ७६–७७ साली चहा २४० दशलक्ष किलो निर्यात झाला होता, यदा तो २२५ द. लक्ष किलो निर्यात करण्याचे लक्ष्य ठरवून देण्यात आले. या उपायांनी ठोक लिलाव होणाऱ्या चहाच्या बाजारात नोव्हेंबर ७७ पर्यंत चहाचे भाव असे उतरले. भाव एका किलोचे.

| | कलकत्ता | | कोचीन | |
|---|---|---|---|---|
| | पत्ती चहा | भुकी | पत्ती चहा | भुकी |
| एप्रिल ७७ | रु. २९–७९ | रु. २१–१९ | रु. ३१–१८ | रु. २०–४९ |
| नोव्हें. ७७ | रु. १४–६२ | रु. ११–३७ | रु. १२–१४ | रु. १२–०१ |

* 'नाफेड' व एन. सी. सी. एफ. या संस्थांना किरकोळ चहाची विक्री १६ रु. ५० पैसे किलो दराने करण्याचे आदेश दिले.

* जनता सरकारच्या दहा महिन्यांच्या कारकीर्दीत रॉकेलच्या उपलब्धतेसबंधी एकही तक्रार नाही.

* देशात टंचाई निर्माण होईल अशा जीवनावश्यक वस्तूंची निर्यात बंद करण्यात आली.

* वनस्पती तुपाचे उत्पादन खंडित होऊ नये म्हणून व खाद्यतेल ग्राहकांना प्रत्यक्ष उपयोगासाठी मिळावे म्हणून खाद्यतेल व तेलबिया यांच्या आयात धोरणात मोठे बदल करण्यात आले. वनस्पती निर्मितीत ७५% ऐवजी ९५% आयात व अन्य तेले वापरण्याचे आदेश दिले. त्यामुळे १ नोव्हेंबरपासून एक किलो वनस्पतीत ७५% आयात तेल, १०% सरकीचे तेल, ५% भाताच्या कोंड्याचे तेल व ५% शुद्ध जवसाचे तेल वापरले जाते. या आदेशामुळे वनस्पती तुपाचे भाव १५८ रु. ( साडेसोळा रुपये किलो ) वरून १४० रुपयांवर आले. सफेद राईच्या तेलाची मोठ्या प्रमाणावर आयात करून सार्वजनिक वाटपाद्वारे ७॥ रु. किलो दराने विक्रीची व्यवस्था करण्यात आली. मोठ्या प्रमाणावर आयात केलेली ८९॥ लक्ष टन खाद्य तेले लवकरात लवकर शुद्ध करून मिळावीत म्हणून देशातर्गत शेंगदाणा तेल शुद्धीकरणास बंदी केली. मोहरीच्या तेलाचा भाव देशात कुठेही १० रु. किलोपेक्षा अधिक होता कामा नये हा केंद्र सरकारचा विक्री आदेश सुप्रीम कोर्टानेही वैध ठरविला. संपूर्ण वर्षाची खाद्यतेलविषयक योजना आखून तिची अंमलबजावणी यदापासून सुरू झाली.

* डाळीची व खाद्य तेलाची साठेबाजी होऊ नये म्हणून घाऊक व किरकोळ दुकानदारांनी जास्तीत जास्त किती साठा ठेवावा याचे निबंध शहराच्या वर्गवारीनुसार जाहीर केले. गरीब वस्तीतील रेशन दुकानातून तूरडाळ ३ रु. २५ पैसे किलो भावाने देण्याची व्यवस्था करण्यात आली.

## रेल्वे

* १९७४ च्या रेल्वेसंपातील कामावरून दूर झालेल्या कामगारांना बिनशर्त कामावर घेण्यात आले.

* आणीबाणीतील मिसाबंदी व अन्य राजकीय कार्यकर्ते यांना परत कामावर घेऊन संपूर्ण वेतन थकबाकी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

* १८५३ मध्ये रेल्वे स्थापन झाल्यापासून गेल्या १२४ वर्षांत चतुर्थ श्रेणीच्या रेल्वे कर्मचाऱ्यांना न मिळालेली 'सिलेक्शन ग्रेड' देण्याचा निर्णय घेण्यात आला. १९७७ मध्ये ५० हजार रेल्वे कर्मचाऱ्यांना ही ग्रेड देण्यात आली. वाफेच्या इंजिनमध्ये काम करणाऱ्या 'बी' ग्रेड फायरमनना बढतीची सवलत २५ वरून ५०% करण्यात आली.

* लाल डगलेवाल्या हमालांची लायसेन्स फी १० रु. वरून ५ रु. केली.

* माजी रेल्वेमंत्र्यांनी स्वतःचे केवळ आदेश देऊन रेल्वे सर्व्हिस कमिशनपुढे चाचणी होऊ न देताच ज्याना नोकऱ्या दिल्या त्या सर्वांना रेल्वे कमिशनपुढे चाचणीसाठी पाठविण्यात आले.

* वयाची ५८ वर्षे पूर्ण केलेल्या कोणाही कर्मचाऱ्याला किंवा अधिकाऱ्यास नोकरीत मुदतवाढ नाही. रेल्वेबोर्डाचे अध्यक्षही यास अपवाद नाहीत

* लोको रनिंग स्टाफशी १० तासांच्या कामाचा केलेला करार इंदिरा सरकारने रद्द केला होता तो पुन्हा मंजूर केला गेला.

* प्रशासन सुधारणा समितीच्या शिफारशीनुसार रेल्वेबोर्डाची पुनर्रचना केली गेली. बोर्ड सदस्यांची सख्या सातवरून तीनवर नेण्यात आली.

* १९७७–७८ सालासाठी रु. ३२.५ कोटीचे शिलकीचे रेल्वे अंदाजपत्रक सादर करण्यात आले. रेल्वेभाडे व मालवाहतुकीचे दर यात वाढ नसलेले दहा वर्षांतील हे पहिलेच अदाजपत्रक होय.

* प्लॅटफार्म तिकिटाचे दर ५० पैसे ऐवजी ३० पैसे झाले.

* आपल्या प्रवासाच्या यापुढील सर्व गाड्यांमध्ये फक्त जनता क्लासच ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दोन नव्या गाड्यांत व्यवस्था करण्यात आली.

* निवृत्त रेल्वेकर्मचाऱ्याना राष्ट्रीयकृत बँकांतून निवृत्तिवेतन देण्याची व्यवस्था करण्यात आली.

* एप्रिल १९७७ पासून रेल्वे कर्मचाऱ्यांनी ऑक्टोबरपर्यंत उत्तम कामगिरी करून गेल्या वर्षातील याच कालावधीतील ८२ कोटी ५० लक्ष रु. अधिक नफा मिळवला. अंदाजपत्रकावरील याच कालावधीतील उत्पन्नापेक्षा हे उत्पन्न ५२ कोटी रुपयांनी अधिक आहे.

* घातपाताचे प्रयत्न होऊ नयेत म्हणून दक्षता घेण्यासाठी १४००० गॅंगमेन व ११००० रेल्वे सुरक्षाअधिकारी यांना रेल्वेवर गस्त घालण्याचे आदेश देण्यात आले.

* ट्रंकरूटवरील १३०० स्टेशन्सपैकी ८२० ट्रंकसर्किटिंग पूर्ण करण्यात आले. सिग्नलिंगमधील या सुधारणेमुळे गाड्यांची गती वाढली.

* कोकण रेल्वे मोजनेवर विचारविनिमय सुरू आहे.

* सोलापूर डिव्हिजन रेल्वे कर्मचारी गेली पाच वर्षे मागणी करीत होते. त्यानुसार सोलापूर डिव्हिजन दक्षिण मध्य रेल्वे भागातून काढून पुन्हा मध्य रेल्वेस जोडण्यात आली.

## नवे औद्योगिक धोरण

* शहराकडून गावाकडे व मोठ्या उद्योगधंद्याकडून छोटया उद्योगधंद्याकडे असे औद्योगिक विकासाचे जनता सरकारचे नवे धोरण २३ डिसेंबर रोजी जाहीर करण्यात आले.

* १९७१ च्या शिरगणतीनुसार पाच लाखांहून अधिक लोकवस्ती असलेल्या शहरात नवा उद्योगधंदा काढण्यास परवाना मिळणार नाही अशी घोषणा करण्यात आली.

* मोठ्या शहरातून मागास विभागात जाऊ इच्छिणाऱ्या विद्यमान उद्योगधंद्यांना अनेक प्रकारे मदत करण्याला आपण तयार आहोत असे केंद्र सरकारने जाहीर केले.

* छोटया उद्योगधंद्यांचे क्षेत्र ५०० हून अधिक उद्योगांसाठी यापुढे राखून ठेवण्यात येईल. हे क्षेत्र आतापर्यंत असे राखून ठेवले होते.

| सन | राखीव उद्योगधंद्याची संख्या |
|---|---|
| १९६८ | ४६ |
| १९६९ | ५१ |
| १९७०–७१ | ७३ |
| १९७३–७४ | ८३ |
| १९७५–७६ | ८६ |
| १९७६ | १०८ |
| १९७७–७८ | १०८ |

* छोटया उद्योगधंद्याच्या क्षेत्रात एक अती छोटा सेक्टर ( टायनी सेक्टर ) यंदा सुरू करण्यात येत आहे. १ लाखापर्यंत भाडवल गुंतवणूक करणारा उद्योग या टायनी क्षेत्रात मोडेल. अशा उद्योगांना राष्ट्रीकृत बॅन्केकडून वीज भाडवल आणि भाडे खरेदी ( हायर परचेस ) तत्वावर यंत्रसामुग्री मिळेल.

* विक्रीकर व अबकारी कर यातून टायनी सेक्टरमधील उद्योग मुक्त राहतील.

* सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंद्यांना अनेक क्षेत्रात विस्तार करता येईल. मक्तेदार भांडवलदारांना नवे उद्योग काढायला बॅन्केकडून कर्ज मिळणार नाहीत.

* थोडक्यात स्वयंरोजगार आणि बेकारी दूर करणे ही दोन उद्दिष्टे डोळयांपुढे ठेवून नवे औद्योगिक धोरण आखले आहे.

## संकीर्ण

* आयकरातून सूट घेण्याची कमालमर्यादा वार्षिक रु. १०,०००/– पर्यंत वाढविण्यात आली.

* राष्ट्रीय पातळीवर पोलीस आयोगाची स्थापना करण्यात आली.

* टपाल व तार खात्यात वार्षिक रु. ५० कोटीची तूट असूनही टपालहशीलात वाढ करण्यात आली नाही.

* हरिजनाकडील जमिनी बळजबरीने ताब्यात घेण्याचा प्रयत्न झाल्यास तो दखलपात्र गुन्हा समजावा असे पत्र पंतप्रधानांनी सर्व मुख्यमंत्र्यांना पाठविले.

* अल्पसंख्यांकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी खास कमिशनची नेमणूक. हे कमिशन अल्पसंख्यांकांच्या संरक्षणासाठी घटनेत नमूद केलेल्या आणि केंद्रीय व राज्य सरकारांच्या कायद्यात समाविष्ट केलेल्या विविध तरतुदीचे मूल्यमापन करील. त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी शिफारस करील. अल्पसंख्यांकांच्या सवलती व हक्क जर हिरावून घेतले जात असतील तर त्यासबंधीच्या तक्रारीत लक्ष घालील. त्यांच्या प्रश्नांचा अभ्यास, संशोधन व विश्लेषण करून निरनिराळ्या कल्याणकारी उपयोजना सुचवील. अल्पसंख्यांकांच्या परिस्थितीबाबत राष्ट्रीय केंद्र म्हणून काम पाहील व या प्रश्नावर केंद्र सरकारला वेळोवेळी अहवाल सादर करील.

* एक हजार व त्यावरील किंमतीच्या नोटांच्या निर्मुद्रीकरणाचा धाडसी निर्णय जनता सरकारने घेऊन बेकायदेशीर अर्थव्यवहाराला आळा घालण्याच्या दृष्टीने मोठे पाऊल उचलले आहे. १९७२ साली वांच्छू समितीने निर्मुद्रीकरणाची शिफारस केली होती. विरोधीपक्षाने तिला पाठिंबाही दिला होता. तथापि त्या वेळचे केंद्रीय अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी ‘ नोटा रद्द करणे शक्य होणार नाही ’ असा अभिप्राय दिला होता. जनता पक्षाने घेतलेल्या या निर्णयामुळे सधन व्यापारी, सट्टेवाले इत्यादीच्या बेकादेशीर आर्थिक व्यवहारांना निश्चितच पायबंद बसणार आहे.

# राज्यातील ‘ जनता ’ राजवटींनी केलेल्या सुधारणा

## उत्तर प्रदेश

—समाजतल्या खालच्या वर्गातल्या एकूण १२ लाख कुटुंबांना घरे बांधण्यासाठी जागा देण्यात आलेली आहे.

—ताब्यात घेतलेल्या जमिनीचा मोबदला ४ हप्त्यांत चुकविण्यात येतो. तसेच प्रथम हप्ता म्हणून एक हजार रुपये रोख दिले जातात.

—सहकारी संस्थांना कमी मुदतीची कर्जे (३ वर्षे) संमत करण्याचे अधिकार दिले असून नैसर्गिक आपत्तीच्या काळात कर्जे वाढविण्याची हमी दिली आहे.

—कमजोर वर्गांना शेती सहकारी संस्थेचे सदस्यत्व मिळविण्यासाठी उधारी देण्यात येते. त्यायोगे ते संस्थेकडून कर्जे मिळवू शकतात.

—अन्नधान्य व अत्यावश्यक वस्तूंच्या विभाजनासाठी जिल्हा पातळीवर, उपविभाग पातळीवर, सल्लागार समित्या, तसेच दक्षता समित्या व पंचायत समित्या स्थापण्यात आलेल्या आहेत.

—तक्रारी व गैरकारभाराची तपासणी करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात आलेली आहे.

—मागासलेल्या जाती, जमाती व इतर अप्रगत वर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्त्यांना संमती देण्याचे व मुदत वाढविण्याचे अधिकार जिल्हा व विभागीय पातळीवरील अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत.

—उपवाहतूक आयुक्तांच्या अधिकाराखाली राज्याचे ४ विभाग करून वाहन–चालकांना परवाने देण्याची सोय करण्यात आलेली आहे.

—सर्व शहरात मिनी बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे.

—बसस्थानकावर प्रवाशांच्या सर्व आवश्यक सोयी करण्यात आल्या आहेत.

—कारभाराची पद्धत आणि व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी नोकरवर्गात समित्या नेमण्यात आल्या आहेत.

## मध्य प्रदेश

—निवडणुकीत दिलेल्या आश्वासनानुसार दरवर्षी २००० गावांमध्ये पाणीपुरवठा करण्याची योजना आखली गेली असून या वर्षात १२०० गावांत ही योजना अंमलात आणली आहे.

—हजारापेक्षा अधिक लोकसख्या असलेल्या गावांमध्ये वीजपुरवठा तसेच रस्तेबांधणीचे काम हाती घेण्यात आले आहे.

—अठरा वर्षांवरील महिलांसाठी प्रौढ शिक्षणवर्ग चालविले जातात व दोन वर्षांत माध्यमिक शिक्षणाची सोय केली जाणार आहे.

—रोजगार विनिमय केंद्रातील कार्यपद्धती सुटसुटीत बनविण्यात आल्या आहेत.

## हरियाना

—शेती विस्तार योजनेच्या अंतर्गत बँकेने सुचविलेल्या सुधारणा सरकारने मान्य केल्या असून विस्तार पद्धतीची पुनर्रचना करण्यात येत आहे.

—कृषि–ज्ञान केंद्रांमार्फत काही प्रगतिशील शेतकऱ्यांतर्फे आणि निवडक केंद्रातर्फे उत्कृष्ट बीजाचे उत्पादन करून ते बीज सर्वत्र सर्वसामान्यांना वाटण्यात येईल.

—केवळ एक वर्षासाठी पात्र असलेल्या स्वस्त धान्याच्या दुकानांचे परवाने तीन वर्षांपर्यंत वाढविले आहेत.

—रोजगार नोंदणीसाठी एक नवीन व्यवस्था अंमलात आणली जात आहे.

—विद्यार्थ्यांना प्रवासासाठी सवलती देण्यात आल्या असून सर्व मार्गावर फिरती यंत्रशाळा स्थापण्यात आली आहे.

—प्रत्येक सार्वजनिक कचेरीत एका जनसंपर्क अधिकाऱ्याची नेमणूक केल्यामुळे सामान्य जनतेच्या तक्रारी दूर होण्यास व मार्गदर्शन मिळण्यास सोपे जाते.

## राजस्थान

—आर्थिक सामाजिक क्षेत्रात निर्णयाचे प्रत्यक्ष फायदे समाजातल्या तळाच्या थरांना मिळाले पाहिजेत या दृष्टीने राजस्थान सरकारने अंत्योदयाच्या सूत्रानुसार धोरणे आखली आहेत.

— सहकारी कर्जव्यवस्था विकेंद्रित करण्यात आली आहे. सहकारी कर्जव्यवहारातील व्यवस्थापनात मूलभूत बदल करण्यात आले आहेत.

— रास्त दराने धान्य विकणाऱ्या दुकानांची पुनर्बांधणी करण्यात आली आहे.

— रोजगार-विनिमय केंद्रे अधिक कार्यक्षम बनविण्यात आली आहेत.

— गेल्या तेरा वर्षांत कॉंग्रेस पक्षाने टाळलेल्या पंचायत निवडणुका घेण्याचे जनता सरकारने जाहीर केले आहे.

— प्रवाशांच्या सुखसोयींसाठी एस. टी. स्टॅंडवर व्यवस्था केली असून जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांना चालकाचा परवाना देण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

## हिमाचल प्रदेश

— शेतकऱ्यांना कर्ज मंजूर करण्यासाठी जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांना अधिकार देण्यात आले आहेत.

— ग्रामीण भागातून येणाऱ्या रुग्णासाठी इस्पितळांतून खास सोयी करण्यात आल्या आहेत.

— पोलीसखाते अधिक कार्यक्षम आणि लोकाभिमुख व्हावे म्हणून सुधारणा करण्यात आल्या आहेत.

## बिहार।

— जमीनवाटपाच्या संदर्भात जी माहिती मिळेल ती सविस्तरपणे (एकर, पाणीपुरवठा, जमिनीचे प्रकार) तालुक्यातील तहसील कचेरीकडे पाठविली जाते. त्यामुळे वाटप सुलभ रीतीने आणि लवकर होत आहे.

— तळच्या रेवेन्यु अधिकाऱ्याला कूळ कायद्याच्या संदर्भातल्या खटल्याचे निवाडे करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

— सहकारी वित्त संस्थाच्या कर्जाचा विशिष्ट भाग मागासवर्गीय समाजासाठी राखून ठेवण्यात आला आहे.

— आता जमिनीच्या क्षेत्रावरच नव्हे तर प्रत्येक पिकासाठी कर्ज देण्यात येते.

— रेशन आणि स्वस्त धान्यांची दुकाने ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात उघडण्यात आली आहेत. त्यासाठी परवाना पद्धतीची सोय करण्यात आली आहे.

— राहत्या ठिकाणापासून २० मैलांच्या परिसरात माध्यमिक आणि प्राथमिक शिक्षकांच्या नेमणुका करण्यात आल्या असून शिक्षकांच्या बदल्या करण्याचे धोरण रद्द करण्यात आले आहे. शिवाय शालांत परीक्षेपर्यंत सर्व शिक्षण मोफत करण्यात आले आहे.

— ग्रामीण भागात रोजगार विनिमय केंद्रे उघडण्यात आली आहेत. मागासवर्गीय आणि स्त्री-अर्जदाराचे नोंदणीकरण व्हावे म्हणून स्वतंत्र नोंदणी विभाग सुरू करण्यात आला आहे,

— कमजोर वर्गांना शेती कर्ज पुरविणाऱ्या सहकारी संस्थेचे सदस्यत्व मिळविण्यासाठी कर्ज दिले जाते. □

करणार आहोत !'

जनता पक्षाकडे उमेदवारी मागणाराची संख्या फार मोठी होती; परंतु तिकिटे मिळाली नाहीत म्हणून पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरुद्ध बडखोरी होण्याचे प्रकार फारसे होणार नाहीत; परंतु कार्यकर्त्यांची नाराजी होईल ती लक्षात घेण्याजोगी असेल याकडे सुराणा यांचे दुर्लक्ष नाही; परंतु काँग्रेसचा पराभव करणे हे उद्दिष्ट महत्त्वाचे आहे याचे भान कार्यकर्ते ठेवतील यावर त्यांचा विश्वास आहे.

निवडणुकीनंतर हितसंबंधी मंडळी पक्ष-संघटनेवर स्वत:चे वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करतील ही शक्यता कमी आहे, असे सुराणा म्हणत असले, तरी ही मंडळी वर्चस्व मिळवण्यासाठी क्रियाशील राहतील, पक्षावर नियंत्रण मिळवण्याकरता लक्ष केंद्रित करतील हा धोका सुराणा नाकारीत नाहीत. पक्ष-संघटनेचे नेतृत्व जुन्या कसलेल्या कार्यकर्त्यांकडे राहिले म्हणजे वैचारिक स्पष्टता ठेवून कार्यक्रमाची जडणघडण करणे शक्य होईल. **त्याकरिता पक्षांतर्गत ध्रुवीकरणाची गरज आहे असे सुराणांना वाटत नाही. पक्षाच्या पुरोगामी धोरणांना विरोध करतील ते बाजूला फेकले जातील असेही सुराणांना वाटते.**

श्री. सुराणा म्हणतात, 'पूर्वाश्रमीचे समाजवादी गट, त्याचप्रमाणे पुरोगामी कार्यक्रमाचे आकर्षण असलेल्या शक्ती जनता पक्षात आहेत. घटक पक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांनी पुरोगामी कार्यक्रम मनापासून स्वीकारला आहे. अर्थात केवळ सत्तेमार्फत पुरोगामी कार्यक्रमाची अंमलबजावणी होईल असे आम्ही कधीच मानलेले नाही काँग्रेसची सत्ता संपविली म्हणजे जनशक्ती संघटित करण्याचे काम सुकर होणार आहे. निवडणुकीनंतर सत्ता राबविण्यासाठी ज्याप्रमाणे काही माणसे गुंततील त्याचप्रमाणे काही प्रमुख कार्यकर्त्यांनी छोटे शेतकरी, शेतमजूर, आदिवासी व दलित यांच्या संघटना बांधण्यासाठी स्वत:ला वाहून घेतले पाहिजे. प्रमुख कार्यकर्त्यांच्या मनाची तशी तयारीही आहे.'

रोटेशनप्रमाणे—म्हणजे पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ—मराठवाडा याकडे पाळीपाळीने—मुख्यमंत्रिपद द्यावे असे सुराणा यांना वाटत नाही. ते म्हणतात, मंत्रिमंडळात प्रादेशिक विभागांना प्रतिनिधित्व दिले पाहिजे. मंत्रिमंडळ बनताना प्रादेशिक समतोल नेहमीच साधला पाहिजे. त्याचप्रमाणे आमदारांच्या संख्येच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक मंत्र्यांची संख्या होता कामा नये. त्याचप्रमाणे मंत्रिमंडळ बनवताना मित्रामध्ये ओढाताण होणार नाही असेही पाहिले पाहिजे; परंतु मंत्रिमंडळ बनवण्यासाठी कायम स्वरूपाचे नियम तयार होता कामा नयेत. कारण असे नियम ठरवणे व त्याची अंमलबजावणी करणे कठीण होईल.

सुराणा यांनी काँग्रेसचा पराभव करण्याची का आवश्यकता आहे याचे धोरणविषयक विवेचन केलेच; परंतु शिक्षण हा विषयही त्यांनी सविस्तरपणे हाताळला. यशवंतराव चव्हाण यांच्या धोरणावर सुराणा यांनी परखड विचार मांडले. 'राजकीय व सामाजिक जीवनात भ्रष्टाचार, दडपेगिरी आणि अकार्यक्षमता वाढण्यासाठी काँग्रेस शासन व विशेषत: यशवंतराव चव्हाण जबाबदार आहेत.' असे सांगून पन्नालाल सुराणा म्हणाले की, ध्येयनिष्ठा व कार्यक्षमता यांच्या कसोटया लावून कार्यकर्त्यांना सत्तेच्या जागा द्यावयाच्या असे न करता आपल्या हुकमतीत राहतील अशी भ्रष्ट व संधिसाधू माणसे यशवंतराव चव्हाण यांनी जवळ केली. सार्वजनिक जीवनात ना. गोखले, टिळक, महात्मा गांधी यांनी मूल्ये जोपासण्याचा प्रयत्न केला होता. ती सर्व मूल्ये यशवंतराव चव्हाण यांनी धुळीला मिळवली. यशवंतरावांच्या आश्रयामुळे सुमार कुवतीची माणसे ठिकठिकाणचे झोटिंगशहा बनले या झोटिंगशहांनी आपल्या खुर्च्या टिकवण्यासाठी जातीयवादाचा आश्रय घेतला आणि गुंडगिरीला उत्तेजन दिले. या सगळ्याचा परिपाक महाराष्ट्राचे राजकीय जीवन नासवण्यात झाला. आज काँग्रेसची चाललेली पडझड आणि अफलातून लोकांचा इंदिरा गांधी काँग्रेसला मिळणारा पाठिंबा, यामुळे महाराष्ट्राच्या राजकीय जीवनाला योग्य वळण लागणे आवश्यक झाले आहे. इथला काँग्रेस पक्ष समर्थ राहिलेला नाही हेही अलीकडच्या घटनावरून स्पष्ट झाले आहे.

'या कारणामुळे वसंतरावदादा पाटील यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस जीवनमरणाचा प्रश्न मानून निवडणुका लढविणार असल्याने भ्रष्टाचारी माणसांना जवळ बाळगणे त्यांना भाग पडत आहे. सत्तेचा आणि सत्तेमुळे जमलेल्या पैशांचा वापर करण्याच्या योजना त्यांनी (काँग्रेसने) आखल्या आहेत. अशा या काँग्रेस पक्षाकडून समाजातील उपेक्षित व दुबळ्या घटकांच्या विकासासाठी सुस्पष्ट कार्यक्रम आखले जातील, ते पार पाडले जातील असे मानायला मुळीच जागा राहिलेली नाही' असे सांगून श्री. सुराणा म्हणाले की, 'महाराष्ट्रातील जनतेच्या मनाचा आता निर्धार झालेला दिसतो की—महाराष्ट्रातील काँग्रेसची एकाधिकारशाही संपवायची आहे. महाराष्ट्रातसुद्धा काँग्रेसचा पराभव होऊ शकतो हे लोकसभा निवडणुकीने दाखवून दिले आहे. गेल्या जूनमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत सर्वत्र काँग्रेसचा पाडाव झाला आहे हेही मराठी मतदारानी पाहिले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातून काँग्रेसची सत्ता आपण संपवू शकतो असा विश्वास मतदारात निर्माण झाला आहे. मतदारांना हे काम करणे सुकर व्हावे अशीच वाटचाल जनता पक्षाने आतापर्यंत केली आहे'

आगामी विधानसभा निवडणुकीचे महत्त्व विषद करताना ते म्हणाले, 'मुख्यत: गेल्या तीस वर्षांतील काँग्रेस राजवटीबद्दलचे जनतेचे मत काय आहे हे या वेळी व्यक्त होणार आहे. महाराष्ट्रात १९६० पासून काँग्रेसचा एकसूत्री कारभार चालू झाला आहे. गुजरातकडे पैशाचा ओघ जातो यासारखी कारणे सांगायला ६० पासून जागा राहिलेली नाही. तसेच स्वत:ला शेतकऱ्यांचे पुत्र म्हणवत सत्तास्थानावर बसले व त्यांना जनतेचा भरघोस पाठिंबाही मिळाला होता. एवढी सर्व अनुकूलता असून काँग्रेस सरकारने महाराष्ट्रापुढचे मुख्य प्रश्न सोडविले नाहीतच, उलट काही नवे प्रश्न निर्माण करून ठेवले. त्याहीपेक्षा वाईट म्हणजे काही अनिष्ट समाजद्रोही प्रवृत्तींना खतपाणी घातले आहे.

'शेती व शिक्षण ही दोन क्षेत्र घेतली तर काँग्रेसी शासनाचे अपयश चटकन् स्पष्ट होईल.' असे सांगून पन्नालाल म्हणाले, १९६० ते ७३ पर्यंत राज्याचे शेतीउत्पादन सतत घसरत गेले आहे. मधूनमधून पडणारा दुष्काळ हे कारण सांगायला ठीक असले तरी त्यामुळे काँग्रेसी सरकारची निष्क्रियता झाकली जात नाही महाराष्ट्रातील दुष्काळाचे १८३५ (अठराशेपस्तीस) पासूनचे इतिवृत्त तयार आहे आणि पावसाच्या अनिश्चिततेला कसे तोंड द्यावे याकरिता अनेक तज्ज्ञांनी अतिशय काळजीपूर्वक अनेकविध उपाय सुचविले आहेत; पण या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन आवश्यक ते निर्णय घ्यायचे व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पुरेशी साधन-सामुग्री उपलब्ध करून सरकारी यंत्रणा गतिशील बनविणे हे काम काँग्रेस नेतृत्वाने कधीच केले नाही. त्यामुळे सिंचनक्षेत्रात गेल्या सतरा वर्षांत दीड टक्काच भर पडली.

प्रादेशिक असमतोलाविषयी बोलताना पन्नालाल यांनी काँग्रेस सरकारवर ठपका ठेवला. आधीच औद्योगिक विकास झालेल्या मुंबई, ठाणे, पुणे या औद्योगिक पट्ट्याकडे गेल्या पंधरा वर्षांत सरकारने भरपूर साधन-सामुग्री पुरविली. नव्या मुंबईसारखी सर्व दृष्टीने हानिकारक ठरणारी योजना हाती घेतली. त्यामुळे दुष्काळाच्या छायेतील मध्य महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ हे प्रदेश उपेक्षित राहिले असे ते म्हणतात.

विदर्भ – मराठवाड्यातील शेत–जमीन सुपीक आहे. तेथे सिंचनाच्या सोयी पुरेशा प्रमाणात उपलब्ध केल्या तर शेती उत्पादन-वाढीलाही गती मिळेल आणि प्रादेशिक असमतोल दूर होऊन त्या भागातील अर्थ-व्यवस्थेला स्वयंप्रेरित गती प्राप्त होईल; पण हे करण्याचे काँग्रेसी शासनाने बुद्धिपुरस्सरपणे टाळल्याने प्रादेशिक कटुता विनाकारणच वाढली आहे. शिवाय जी काही साधनसामुग्री शेतीक्षेत्राकडे वळली ती मूठभर शेतकऱ्यां-कडे केंद्रित झाल्याने मध्यम व छोटा शेत-करी नागवला गेला आहे. त्यामुळे वर्गीय तणाव कमालीचे वाढले आहेत, असे पन्ना-लाल सुराणा सांगतात.

शिक्षणक्षेत्रातील गोंधळाला बाहेरचे कुठलेही कारण संभवत नाही असे सांगत असताना सुराणांनी त्याप्रीत्यर्थ जगातील बाजारातील चलनफुगवटा, तेलाच्या किंमती किंवा बांगला देशचे युद्ध यांची उदाहरणे दिली या गोष्टींचा परिणाम महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्थेवर होण्याचे मुळीच कारण नाही. तरीही शिक्षणक्षेत्रात गोंधळ झाला आहे ३० वर्षांत शिक्षणविषयक ठाम धोरण अंगीकारले गेले नाही. शिक्षणाचे माध्यम असो, की इंग्रजी हा अनिवार्य विषय असावा की असू नये हा प्रश्न असो किंवा कोठारी आयोगाने सुचविलेला १० + २ + ३ चा आकृतिबंध असो, कोणत्याच प्रश्नावर सरकारने स्पष्ट धोरण आखले नाही. नव्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी नुसत्या बिनडोकपणेच नव्हे तर बेमुर्वत-खोरपणे करण्यात आली आहे. विसाव्या शतकात नियोजन हा परवलीचा शब्द झाला आहे; पण नवा आकृतिबंध अंमलात आणा-

## पन्नालाल

१९४२ मध्ये प्रभातफेरीत नऊ वर्षांचा पन्नालाल दाखल झाला. त्याची प्रभातफेरी संपली; पण समाज-वादाच्या दिंडीत तो लगेच सामील झाला. समाजवादाच्या मार्गावरील पन्नालाल सुराणा यांची वाटचाल न थकता आजतागायत सुरू आहे. चळवळ हा सुराणा यांच्या जीवनाचा स्थायीभाव, वयाच्या नवव्या वर्षापासूनच बनला आहे. १९५४ मध्ये जयप्रकाश नारायण यांच्या बिहार आश्रमात ते दाखल झाले. भूदान आंदोलनातही सुराणा सामील झाले होते.

१९६२ साली चिनी आक्रमणानंतरच्या काळापासून पूर्ण वेळ राजकारण! खांद्यावर शबनम पिशवी अडकवून राज्याच्या कोणत्याही कोपऱ्यापर्यंत पोचलेल्या या कार्यकर्त्याजवळ प्रखर निष्ठा आहे. ही निष्ठाच त्यांच्या मनात कधी निराशेला डोकावूच देत नाही. १९६५ साली अन्नधान्य भाववाढ चळवळीत भाग घेतल्याबद्दल भारत संरक्षण कायद्याखाली सुराणा यांना स्थानबद्ध करण्यात आले होते. १९६९ मध्ये राज्याचे त्या वेळचे पुरवठामंत्री तल्यारखान यांच्याविरुद्धच्या आरोपप्रकरणी आवश्यक तेवढा पुरावा देता आला नाही. म्हणून तीन महिन्यांची शिक्षा भोगली. १९७० साली समाजवादी पक्षाने भूमिमुक्ती आंदोलन सुरू केले मंत्री रा. ज. देवतळे यांच्या शेतावर सत्याग्रह केला, म्हणून पुन्हा तुरुंगवास! १९७२ च्या एस्. टी. संपप्रकरणी व १९७४ च्या रेल्वेसंपात पुन्हा तुरुंगवास. आणीबाणीत १६ महिने पोलिसांना गुंगारा देऊन भूमिगत राहिले. पोलिसांच्या हाती लागल्यावर परत तुरुंगाची वाटचाल व अडीच महिने कारावास!

पन्नालाल सुराणा भूमिगत राहिले. पोलिस मागावर असताना त्यांनी पोलिसांना गुंगारा दिलाच; पण ते अगदीच कोठे तरी लपून राहिले नाहीत. मुंबईतील दादरमधील छबिलदास हायस्कूलमध्ये पन्नालाल यांनी 'जुलूस' हे नाटकही पाहिले होते. कोल्हापूरला माझ्या एका मित्राकडे ते 'भूमिगत' राहिले त्या वेळीही मित्राच्या कुटुंबियां-सह एक चित्रपट पाहण्यास गेले.

सुराणा यांच्या राजकीय जीवनाचा ओझरता जरी आढावा घेतला तरी हा माणूस सतत चळवळीच्या अग्रभागी राहिलेला किंवा तुरुंगात 'वास्तव्य' करीत असलेला दिसेल! *

यचा तर त्याचे नियोजन करणे मुळीच अवघड नव्हते. कार्यानुभव यासारखे विषय ८ वीपासून सुरू होतात; पण त्यासाठी पुरेशी साधरसामग्री 'प्रत्येक शाळेत पोचली पाहिजे होती. परंतु यासंबंधीची योजना आखण्यात आली नव्हती. १२ वी उत्तीर्ण व जुन्या एस्. एस्. सीनंतर प्री–प्रोफेशनलची परीक्षा उत्तीर्ण झालेले असे विद्यार्थी एकाच वेळेला वैद्यकीय कॉलेजमध्ये प्रवेश मागणार आहेत, ही साधी गोष्टसुद्धा राज्यकर्त्यांच्या लक्षात आली नव्हती अशा अनेक गोष्टींवर सुराणा यांनी प्रकाश टाकला व सरकारकडे आकृतिबंध अंमलात आणण्याची योजनाच कशी तयार नव्हती हे दाखवून दिले.

इंग्रजी विषय सक्तीचा केला त्यावर आठवड्यातील बारा तास खर्ची पडत आहेत. हे सर्व पाहिले की, अध्यापकाच्या कल्पना मनात ठेवून बेमुर्वतखोरपणे व बेजबाबदारपणे त्याची अमलबजावणी करावयाची असे वर्तन सरकारकडून झाले. त्याचा खेड्यापाड्यातील हजारो विद्यार्थी व शिक्षक यांच्यावर परिणाम होऊन त्यांचा जीव गेला आहे असे सुराणा पोटतिडकेने सांगत होते.

सुराणा पक्षाचे सरचिटणीस आहेत. त्यामुळे संघटना बांधण्याची जबाबदारी त्यांच्यावर मोठ्या प्रमाणावर येते. जनतालाट निर्माण झाली आहे. ती ग्रामीण भागापर्यंत पोचली आहे. या लाटेवर आरूढ झालेल्या पक्षाची ग्रामीण भागात संघटना उभी झालेली नाही असे दृश्य देशभर आहे. महाराष्ट्रातील परिस्थिती जाणून घेण्याकरिता सुराणा यांना विचारले, तेव्हा ते म्हणाले, पक्षसंघटना बांधण्याच्या कामाकडे आमचे दुर्लक्ष नाही. संघटना बांधीत असतानाच आम्ही लहान शेतकरी, आदिवासी, मच्छीमार, विणकर, झोपडपट्टीत राहणारे व कामगार यांचे पक्ष घेऊन त्यांना संघटित करीत आहोत. या सर्व घटकांच्या मागण्यांचे निवेदन जनता व त्याच्या मित्रपक्षाने तयार करून, मोर्चे काढून ते सरकारला दिले. या निवेदनाच्या कार्यक्रमाच्या आधारावर दहा महिन्यांत शेतकरी–शेतमजूर यांचे दोनशे मेळावे घेतले. आदिवासींच्या प्रचंड परिषदा घेतल्या. दलितांच्या प्रश्नांवर अनेक ठिकाणी आंदोलनात्मक कार्यक्रम घेतले. कामगारांना बोनस परत मिळवून दिला. सी. डी. एस्.ची रक्कम दिली. या सर्व गोष्टीमुळे जनता पक्ष खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील गोरगरिबांचा पक्ष बनला आहे. पक्षसंघटना बांधल्या जात असल्यामुळेच सातारा, यवतमाळ, सोलापूर व नगर या काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात काँग्रेसला सुरुंग लावून फोडण्यात आणि जनता पक्षाची संघटना बांधण्यात यश मिळाले आहे.

स्वातंत्र्यपूर्वकाळात स्वातंत्र मिळविणारी काँग्रेस ही एक चळवळ होती. तीत परस्पर विरोधी विचारधारा असलेल्या व्यक्ती–गट होते. त्याचप्रमाणे जनता पक्ष लोकशाही पुन्हा प्रस्थापित करणारे एक साधन झाले व त्या पक्षातही परस्पर विरोधी विचारांचे पक्ष–गट व व्यक्ती सामील झालेल्या आहेत. त्यामुळे काँग्रेस व जनता पक्ष यांचे स्वरूप स्थूलमानाने सारखेच नाही काय? या प्रश्नाला सुराणा यांनी नकारात्मक उत्तर दिले.

समाजातील संधिसाधू माणसे व हितसंबंधित शक्ती सत्ताधाऱ्यांवर दडपणे आणण्याचा प्रयत्न करीत असतातच. हा प्रकार काँग्रेसच्या बाबतीत होऊन गेला आहे, हे पक्षकार्यकर्ते व जनतेला माहिती झाले आहे. जागृत जनमत हा फार मोठा अंकुश जनता पक्षावर असणार आहे. असे सांगून सुराणा म्हणाले, 'दुसरे असे की, तीस वर्षे विरोधी पक्षात काम केलेले कार्यकर्ते आहेत. त्यांना सत्ता राबविण्याच्या मार्गात असणारे धोके चांगले कळलेले आहेत. स्वातंत्र्यपूर्वकाळात जे नेते आंदोलन चालवीत होते त्यांची ध्येयनिष्ठा प्रखर होती, त्याग मोठा होता, चिकाटीही दांडगी होती; पण सत्ता राबविण्याचा अनुभव त्यांना नव्हता. त्याचप्रमाणे त्यांना सत्ता कधी जवळूनही पाहता आली नव्हती. गेली ३० वर्षे ज्यांनी विरोधी पक्षात काम केले आहे त्यांना हरघडी, हरक्षणी सत्ता राबविण्यातील धोके कळत आले आहेत. सहकारी क्षेत्रात जिल्हा परिषदा व नगरपालिका यामध्ये सत्ता राबविण्याचा अनुभव आलेला आहे. त्यामुळे अधिक खबरदारीने जनता पक्षातील लोक वागतील. अर्थात सर्व धोके लक्षात घेऊन नेतृत्वाने सावधपणे वाटचाल केली पाहिजे. ती केली नाही तर पाच वर्षांत जनता पक्षाला सत्तास्थानावरून खाली खेचल्याशिवाय लोक राहणार नाहीत. असे सांगून श्री. सुराणा यांनी जनता पक्षाकडे सत्ता येण्याची लक्षणे असताना काय केले पाहिजे याची जाणीव त्यांना आहे हेच दाखवून दिले आहे असे म्हणावे लागेल.

जनता पक्षात विविध विचारांचे, हितसंबंधाचे घटक पक्ष सामील झाले आहेत, तरी जनता पक्षातर्गत ध्रुवीकरण व्हावे असे सुराणा यांना वाटत नाही. हा मुद्दा पुन्हा स्पष्ट करून सांगताना ते म्हणाले, 'महाराष्ट्रात तरी गेल्या दहा महिन्यांत वैचारिक एकवाक्यता बऱ्याच अंशाने निर्माण झाली आहे. जनता पक्षाची राष्ट्रीय पातळीवरील घटना, उद्दिष्ट, जाहीरनामा, नवे आर्थिक धोरण ही सर्वमान्य झाली आहेत. त्यामुळे त्याला कोणी विरोध करील असे वाटत नाही. जे विरोध करतील ते बाजूला फेकले जातील '

'पक्षसंघटनेची स्थितीअगदी समाधानकारक आहे असे केव्हाच म्हणता येणार नाही; पण सर्व जिल्ह्यात जिल्हा समित्या, तीनचतुर्थांशपेक्षा अधिक तहसीलमध्ये तहसील पातळीवरील समित्या काम करीत असून चार लाख सभासद नोंदविण्यात आले आहेत. ६ विभागीय शिबिरे, विधानसभा मतदारसंघात २०० पेक्षा अधिक शिबिरे भरविली गेली आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांचा परिचय झाला आणि आपली शक्ती कोठे आहे व कमजोरी कोठे आहे हेही कळले आहे. कार्यकर्त्यांना शिबिरातून पक्षाच्या ध्येयधोरणाविषयीची माहिती देऊन प्रशिक्षित करण्यात आले आहे. निवडणुकयंत्रणेचे मंत्र व तंत्र कार्यकर्त्यांना शिकविले आहे. जनशक्तीच्या आधारे निवडणुका लढविण्याचा आमचा आग्रह आहे. त्यामुळे उमेदवारांना वरून पैसा पुरवायचा नाही असे आम्ही ठरविले आहे.' असेही श्री. सुराणा यांनी सांगितले.




# स्वच्छ कार्यक्षम आणि जनताभिमुख शासन

— र. ग. कर्णिक

निवडणुकीनंतर नवे शासन अस्तित्वात येणार.

या स्थित्यंतराचे लाभ जनतेच्या पदरात पडायला हवे असतील तर नोकरशाहीच्या जुन्या स्वरूपातही पुष्कळसा बदल व्हायला हवा.

सरकारी नोकरांचा संप एकतर्फी माघारी घेण्यात आला असला तरी ही संघटित ताकद कमी झालेली नाही.

ही ताकद नवनिर्माण कार्याकडे वळवली गेली तर ? यासाठी हा शोध.

निवडणुकांच्या ऐन तोंडावर घेतला गेलेला.

निमित्त : सरकारी नोकरांच्या संपाचा पन्नासावा दिवस.

कथन आणि संकलन
**विजय परुळकर**

'कर्णिक स्वतःचा मोठेपणा वाढविण्यासाठी, स्वतःचे नेतेपद टिकविण्यासाठी हा संप इतक्या अटीतटीला नेत असण्याची शक्यता ?'

'छे छे छे...तुमचा भलताच काही तरी गैरसमज झालेला दिसतोय–'

संपावर असलेला मुंबईचा सरकारी कर्मचारी माझ्या प्रश्नानं दुखावला गेला. उत्तर देताना जखमेची खूण त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटली. माझ्या मनात सहज एक विचार आला, आज ह्याच्या आवाजात मार्दव आहे, स्वरांमध्ये समजूत घालण्याचा प्रयत्न आहे, वागण्यात विलक्षण सौजन्य आहे. हाच संपकरी इतर वेळी खुर्चीला चिकटलेला सरकारी कर्मचारी ह्या भूमिकेत कसा दिसत असेल ? कसा बोलत असेल ? कसा वागत असेल ? त्याला एक गुर्मी असणार–फायलींच्या ओझ्यानं करकरणाऱ्या टेबलाची, त्या फायलीआड दडलेल्या खुर्चीची, त्या फायलींच्या ढिगाऱ्यातील कुठलीही लाल फितीनं आवळलेली फाईल वरती किंवा खालती सारण्याच्या अधिकाराची. त्याला गुर्मी असणार त्याच्या सहीच्या ताकदीची. नियम, पोटनियम, प्रोसीजर वगैरे अडचणींचं निमित्त सांगून काही काम न करता फुकटचे पैसे खाण्याची सवय जडलेल्या सरकारी कर्मचाऱ्याला मस्ती असणार पर्मनंट नोकरीची, प्रॉव्हिडंट फंडाची आणि पेन्शनीची. आणि अशा ह्या सरकारी कर्मचाऱ्यासमोर सतत उभा असणारा एक कात्रीत सापडलेला, ब्यूरॉक्रसीनं तंग झालेला, दुखावलेल्या चेहऱ्याचा सर्वसामान्य नागरिक.

माझ्या एका साध्या सरळ सवालानं संपावर असलेला मुंबईचा हा सरकारी कर्मचारी जखमी झाला होता. मी मीठ चोळायचं ठरवलं–

'तुमचे हे कर्णिक हट्टी तर दिसतातच; पण त्यांचं मुख्यमंत्र्यांशी काही तरी वैयक्तिक भांडण असावं आणि ते भांडण आणि इतर मतभेद मिटेपर्यंत हा संप मिटणार नाही असा संशय अनेकजण व्यक्त करू लागलेत–हट्टीपणा करून हे कर्णिक तुम्हा सर्वांना शेवटी गोत्यात आणणार अशी कुजबूज आता अनेक ठिकाणी कानी पडते...मराठी आणि इंग्रजी वर्तमानपत्रांचाही तुम्हाला फारसा पाठिंबा दिसत नाही–'कर्णिक वाटाघाटीला तयार नाहीत,' 'कर्णिकांना तडजोड मान्य नाही'–हे सगळं रोज वाचून माझा तरी संशय बळावत चाललाय. बहुतेक इतर सर्व युनियन लीडरांसारखेच तुमचे कर्णिक असणार...आपल्या फायद्यासाठी ताणता येईल तेवढं ताणणार...आणि शेवटी तुमच्या फायद्या-तोट्याची पर्वा न करता 'यशस्वी माघार' घेऊन स्वतःचं व्यक्तिमाहात्म्य वाढवणार...'

माझ्यासमोरचा संपकरी कधी खवळतो ह्याची मी वाट पहात होतो.

पण माझं म्हणणं तो अतिशय शांतपणे ऐकून घेत होता. त्याच्या पोटात जबरदस्त खोड नक्कीच असणार आणि निर्धारानं त्यानं स्वतःवर ताबा ठेवला असणार. मी त्याला डिवचत राहिलो; पण तो खवळेना. पन्नास दिवसांच्या संपानं त्याच्या जीवनात अनेक अडचणी निर्माण झाल्या असणार. दोन महिन्यांचा पगार नाही–त्यामुळे पैशाची टचाई, इतर सर्वसामान्य नागरिकाप्रमाणे त्यालाही त्याच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न भेडसावत असणार, नागरी जीवनास अत्यावश्यक असलेल्या सोयी संपामुळे बंद–त्याचा त्यालादेखील त्रास होत असणार. आपण एका विचित्र चक्रात अडकलो आहोत ह्याची त्याला जाणीव असणार आणि त्यावर माझं हे डिवचणं आणि मीठ चोळण; पण तो शांत होता. इतकंच काय, प्रथम उमटलेली खिन्नता आता त्याच्या चेहऱ्यावर दिसत नव्हती. पन्नास दिवसांच्या संपानं अडचणीत आलेला तो सरकारी कर्मचारी अविचल मनानं माझी बडबड ऐकत होता, त्याच्या डोळ्यात खेद नव्हता, लाचारी नव्हती, उद्धटपणा नव्हता, वखवख नव्हती. डोळ्याला डोळा भिडविण्याचा निर्भय आत्मविश्वास मात्र निश्चित होता. मला जरा आश्चर्य वाटलं. मी बोलणं थांबवताच त्यानं विनंती केली–

'तुम्ही आमच्या कर्णिकांना एकदा भेटाच. सव्वीस जिल्ह्याचे दहा लाख कर्मचारी आज त्यांच्यामागे उभे आहेत...केवळ कर्णिक सांगतात म्हणून पन्नास दिवस हा संप चाललेला नाही–संप आम्ही सर्वांनी चालवलेला आहे...आणि तो चालू असताना आमचं मनोधैर्य यत्किंचितही ढळू न देण्याचं महत्त्वपूर्ण कार्य कर्णिक करत आहेत...तुम्ही एकदा भेटाच कर्णिकांना.'

इतका मोठा संप इतके दिवस चालू ठेवणारा कर्णिक एकदा पहावाच असं ठरवलं. त्याचबरोबर संपाबद्दल संपकऱ्यांची भूमिका समजून घ्यावी–त्यांचं म्हणणं तरी काय आहे? हे सगळं प्रकरण अडलय कुठं? कधी संपणार? संपल्यानंतर काय निष्पत्ती होणार? अनेक प्रश्न. संपादक माजगावकर आणि मी...मुंबईला जाऊन कर्णिकांना भेटण्याचा जोरदार प्रयत्न करायचा, शक्य झाल्यास त्यांच्याबरोबर तासभर चर्चा करायची, अशा हेतूनं त्यांचा शोध घेण्यासाठी सचिवालयात शिरलो. तिथं सर्व सामसूम प्रेसरूम तर ठार रिकामी. तिथून आम्ही निघालो आणि मुंबई मराठी पत्रकार संघाचं ऑफिस गाठलं. टेलिफोनच्या मागे एक तरुण बसला होता. त्यानं सांगितलं–कर्णिक संध्याकाळी पाच वाजता भेटतील. रोज संध्याकाळी येतात. पत्रकारांना भेटतात. आम्हाला तसं भेटायचं नव्हतं. ठाकुरद्वारचा एक पत्ता मिळाला. तिथं एका बारक्या बोळात शिरलो. एका गृहस्थाकडे चौकशी केली–'सरकारी आणि निमसरकारी कर्मचाऱ्यांच्या समन्वय समितीचं किंवा महामंडळाचं कार्यालय कुठं आहे?' ते म्हणाले, 'तसलं काही इथं नाही.' आम्ही गोंधळात. मी प्रश्न केला...'संपवाल्या कर्णिकाचं ऑफिस इथंच कुठं तरी आहे का?'–वृद्ध गृहस्थ मिष्किल हसला–'त्यांचं होय... ते काय इथंच–समोरच्या शाळेत!'

माजगावकर आणि मी संपात बंद पडलेल्या शाळेत शिरलो. एकच वर्ग उघडा होता. आतमधे सात-आठ मंडळी चीर पाडलेल्या डब्यांना लेबलं लावीत बसली होती. संपावरील कर्मचाऱ्यांच्या मदतीसाठी फंड गोळा करण्याचं हे केंद्र असावं. तिथं कळलं की, कर्णिक नुकतेच दौऱ्यावरून परतले आहेत. संध्याकाळी शिवाजीपार्कवर सभा आहे त्यांचं भाषण आहे. तिथं त्याची गाठ निश्चित पडेल.

कर्णिक मुंबईत आहेत हे कळल्यावर मनावरचं प्रेशर बरंच कमी झालं. आता प्रश्न होता त्याची गाठ घेण्याचा. त्यांच्याबरोबर निवांतपणे तासभर तरी बोलण्याची वेळ ठरविण्याचा. संध्याकाळी शिवाजीपार्कच्या सभेत त्याची गाठ घ्यायची आणि मुलाखतीची वेळ ठरवायची......तोपर्यंतचा चार-पाच तासाचा वेळ इतर मंडळीच्या भेटी घेऊन कामाला सुरुवात करायची.

ठाकुरद्वारच्या बोळातील शाळेमधून आम्ही बाहेर पडलो आणि कर्णिकाचा 'टेंपररी केंद्र' गाठला. जुन्या बिल्डिंगमधील तळमजल्यावरची एक अगदी बारीकशी खोली. दोन टेबल, सात-आठ खुर्च्या. एक फोन, दहा-बारा मंडळीचा घोळका...महाराष्ट्रातील सव्वीस जिल्ह्यांमधून दहा लाख सरकारी आणि निमसरकारी कर्मचाऱ्यांचा संप चालू ठेवणारं 'नर्व्ह सेंटर.' एका प्रचंड संपाच, एका शक्तिशाली संघटनेच एक छोटसं ऑफिस–ऑफिस कसलं, साधी खोली, आठ बाय दहाची.

माजगावकरांनी ओळख सांगितली. 'माणूस'ची ओळख सर्वांना लगेच पटली. बोलणी सुरू झाली. प्रथम औपचारिक. वरवरची. 'माणूस'चा इंटरेस्ट काय? माजगावकरांच्याबरोबर आलेला हा प्राणी कोण? अशा सर्व शंका निर्माण होत असताना देखील त्या प्रदर्शित न करता सर्वजण बचावात्मक पद्धतीनं बोलत होते. अशा संभाषणातून काहीच हाती लागण्याची शक्यता नव्हती. माजगावकरांनी काही 'लीडिंग प्रश्न' टाकले आणि वातावरणात मोकळेपणा आला....मंडळी बोलती झाली. पोलीसखात्यामधून ट्रेन्ड झालेल्या क्षीरसागरांच्या सूक्ष्म नजरेला ऑलवेल असल्याची खात्री झाली आणि ते म्हणाले–

'संप अतिशय निर्धारानं चालू आहे. पहिल्या दिवशी होती तशीच स्थिती आजही आहे. पन्नासावा दिवस असूनही कर्मचाऱ्यां-मध्ये कुठेही चलबिचल दिसून येत नाही...हा दुसरा महिना आम्ही पगार हाती न घेता काढतो आहोत...पण अगदी चतुर्थश्रेणीतील कर्मचारी देखील घट्ट आहे ..

'असा संप चालू ठेवायचा म्हणजे खर्चाचा प्रश्न आलाच—कर्मचाऱ्यांना आर्थिक मदत...इतर कार्यक्रमासाठी लागणारा पैसा... हे सर्व तुम्ही कसं चालवता ?'

'सेन्ट्रल ट्रेड युनियन्सचं आम्ही साहाय्य घेतलं आहे. LIC आहे, बँक्स आहेत.. समन्वय समितीतर्फे आम्ही कूपन्स छापली आहेत—दहा रुपये, पाच रुपये, दोन आणि एक रुपया अशा प्रकारची—महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातून हा उपक्रम चालू आहे ..ही कुपनं विकून देणगीच्या स्वरूपात आम्ही निधी गोळा करीत आहोत. कुपन्स विकून ग्रेटर बॉम्बेमध्यं दोन लाखाच्या आसपास निधी गोळा झाला आहे—आणखी होत आहे. शिवाय आम्ही डब्यातून देखील कलेक्शन करीत आहोत. १९७५ साली आम्ही डब्यांचा उपयोग केला तेव्हा जवळजवळ एक लाख रुपये जमा झाले...आता सुद्धा निधी गोळा होत आहे...त्यावरून सर्वसामान्य जनतेनं संपाबद्दल सहानुभूती दाखविली असा निष्कर्ष आम्ही काढल्यास चूक नाही... जनतेचा आम्हास पाठिंबा नसता तर इतका निधी जमा झालाच नसता आणि २४ जानेवारीचा बंद देखील इतका यशस्वी झालाच नसता आणि हा बंद देखील शांततापूर्वक पार पडला. इतर बंदाच्या वेळेस हिंसक प्रकार होतात तसं काही झालं नाही.'

'तुमच्या संपामध्ये शिक्षकांनी सहकार्य केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा फार मोठा आणि बिकट प्रश्न निर्माण झाला आहे विद्यार्थ्यांना दोन महिने मोकाट फिरण्याची सवय लागली आहे... तुम्ही हा संप ज्या संघटित स्वरूपात केला तितक्याच संघटितपणे विद्यार्थ्यांचं नुकसान भरून काढण्यासाठी तुम्ही काही प्रयत्न करणार आहात का ? तशा काही योजना तुम्ही आखल्या आहेत का ?'

'विद्यार्थ्यांचं नुकसान होत आहे हे तर निर्विवादच...पण या संपामुळे आता परीक्षा देखील पुढे ढकलल्या जाणार हे निश्चित—परीक्षाची तारीख ठरविताना संबंधितांना हा विचार करावा लागणार आहे. अभ्यासाचा backlog भरून काढण्यास किती वेळ लागेल; त्याची जाणीव ठेवून शिक्षक निश्चित काम करतील. जबाबदारी टाळणार नाहीत !'

क्षीरसागरांशी बातचीत चालू असताना माझ्या मनात अनेक प्रश्नांनी गर्दी केली. संपाअगोदरची, संपाच्या वेळेची आणि संप संपल्यानंतरची वेगवेगळी भाषा वापरण्याची सवय आमच्या संप-नेत्यांच्या हाडामासात रुजलेली आहे. सर्वसामान्य माणूस ह्या सर्वांचा विचार करून, आठवणीत ठेवून नंतर जबाब विचारण्याइतका प्रगल्भ नाही ह्याची त्यांना खात्री आहे; पण कुणी तरी जेव्हा ती आठवण जागृत करण्याचा प्रयत्न जरूर करील तेव्हा सर्वसामान्य माणूस जबाब विचारण्यासाठी निर्धारानं उभा राहील का ? आज संपनेत्यांनी आपलं संघटनाकौशल्य—संप घडवून आणण्यासाठी—दाखवलं आहे. भारताचं दुर्दैव हेच आहे असहकार किंवा निषेधार्थ कार्यासाठी भारतीय जनता संपूर्ण सहकार्य करते. गांधीजीचा 'सत्याग्रह' आणि आजचा 'सत्याग्रह'—फार फरक आहे. देश-कालवर्तमान ह्या वस्तुस्थितीला धरून त्यात व्हावा तितका बदल घडलेला नाही. गांधीजीचा असहकार हा ब्रिटिश राजवटीला 'निगेटिव्ह' कारणासाठी निषेध. कुठलीही निगेटिव्ह गोष्ट करायला जनता झटकन् तयार होते. पीएम्‌टीची बस जाळू या ! हजार माणसं तयार. घेराओ करू या ! दोन हजार माणसं तयार. संप करू या ! दहा लाख माणसं तयार. खेड्यामध्ये जाऊन विहिरी खणू या !—पाच माणसं मिळणं कठीण ! शहर स्वच्छ ठेवू या !!—एकही सापडणार नाही !!! ...सरकारी आणि निमसरकारी कर्मचाऱ्यांच्या समन्वय समितीनं, महामंडळानं आणि इतर संघटनांनी पन्नास दिवसांचा जबरदस्त लढा दिलेला आहे. हा लढा यशस्वी करण्यासाठी त्यांनी 'संघटित' होण्याचं जे सामर्थ्य दाखविलं आहे त्या संघटित ताकदीचा विधायक कार्यासाठी हे नतर खरोखरच उपयोग करू शकतील का ? 'निगेटिव्ह' गोष्टीसाठी संघटित होणं फारसं कठीण नाही हे तर पन्नास दिवसांच्या संपानं पुन्हा एकदा सिद्ध केलंच आहे—पण 'पॉझिटिव्ह' कार्यासाठी ही संघटित शक्ती तितकीच प्रभावी ठरू शकेल काय ? संघटित शक्तीचा नैतिक दबाव आणून शिक्षकांकडून विद्यार्थ्यांचं संपामुळे झालेलं नुकसान भरून आणण्या-साठी खरोखरीच काही प्रयत्न केले जातील का ? शाळा नियमित चालू असताना देखील आहे तो रोजचा अभ्यास मुलांच्याकडून दिवसाकाठी संपता संपत नाही. दिशाहीन शिक्षणपद्धतीमुळे विद्यार्थी वह्या, पुस्तकं, होमवर्क ह्यानं अगोदरच अभ्यासाबद्दल वैतागलेला असतो. मुलांचं होमवर्क घेताघेता आईबाप मेटाकुटीला येतात—शिकवण्या लावतात...पैसे खर्च करतात आणि काय काय करतात. हे सर्व असं असताना दोन महिन्यांचा बुडालेला, मागे राहिलेला अभ्यास आणि त्यामधून होणारं विद्यार्थ्यांचं नुकसान संप मिटल्या-नंतर शिक्षक कसं काय भरून काढणार ? असे शिक्षक आपल्याकडे आहेत का ? आपल्या शिक्षणपद्धतीत हे जमणार आहे का ? हे प्रश्न साधे नाहीत. मी ह्या विचारात अडकलो असताना क्षीरसागर बोलत होते—

'आता अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे तो SSC परीक्षांचा म्हणजेच दहावीच्या परीक्षाचा... ह्या परीक्षा कदाचित जूनपर्यंत लांबवाव्या लागतील... त्यामुळे कॉलेज प्रवेशाबाबत अनेक अडचणी उपस्थित होतील. विद्यार्थ्यांचं एखादं वर्षदेखील बुडेल; पण विद्या-र्थ्यांचं नुकसान नेहमी संपामुळेच होतं असं म्हणता येणार नाही. धोरणात्मक बदलामुळे मेडिकलच्या विद्यार्थ्यांचं देखील नुकसान झालंच. तर शिक्षक अभ्यास भरून काढण्याची जबाबदारी निश्चित पार पाडतील; पण धोरण मात्र बोर्डानं ठरवायचं आहे.'

क्षीरसागरांचं म्हणणं, 'लॉजिकल' असल्याचा भास होतो; पण फसवं आहे. संपानंतरची भाषा ती हीच. 'धोरण मात्र बोर्डानं ठरवायचं आहे.' इथं क्षीरसागर निश्चित काय सुचवू इच्छितात ? न झालेल्या अभ्यासक्रमावर प्रश्न विचारायचे नाहीत असंच ना ? की दुसरं काही ?—

परिस्थिती अशी आहे की, संपामुळे दोन महिने मोकळा असलेला तरुण विद्यार्थी संप संपल्यानंतर देखील वर्षभर मोकाट फिरण्याची भीती आहे. अशा तरुण विद्यार्थ्याला मार्गदर्शन कोण करणार ?

जॉर्ज ? कर्णिक ?? वसंतदादा ???...

क्षीरसागराशी चर्चा चालू असताना इतर अनेक लोक भेटले. कुणी तळमळ ओकत होता, एखादा विधायक सूचना करत होता, कुणी त्रस्त झाला होता आणि एखाददुसरा गप्प बसून सर्व चर्चा लक्ष देऊन ऐकतदेखील होता. शिवाजीपार्कच्या सभेची वेळ जवळ आली आणि आम्ही मैदान गाठलं

शिवाजीपार्कवर अनेक सभा होतात... तिथं नेहमीच गर्दी असते सभा नसतानादेखील. छत्रपतीच्या पुतळ्याखाली एक अगदी छोटंसं स्टेज उभारलेलं होतं. केस पिंजारलेला एक तथाकथित शाहीर हातातलं डफ बडवत—

घ्या आमचा राम राम
दादा बंद केलं आज काम


—असं काही तरी गात होता. त्याच्या शाहिरीनंतर पांढऱ्याशुभ्र खादीच्या पायजमा—शर्टाला जराही सुरकुती न पडलेला एक तरुण नेता डावा खांदा पुढं काढून नेत्याच्या थाटात सिनेमानटासारखं बोलत होता. दोन अडीच हजार माणसं बसून होती. कर्णिकांचा पत्ता नव्हता. पोवाडे (?) कविता (?) गाणी (?) भाषणं (?)— हे चालू होतं. कर्णिक अजून आले नव्हते. जमलेल्या लोकाच्यात अस्वस्थ चुळबूळ. मधेच राजभवनच्या कर्मचाऱ्यांचा मोर्चा येऊन जमावात मिसळला. त्यानंतर थाळी—मोर्चा आला. बसला. तरुण कार्यकर्ते भाषणं करून दमले, काही जण हातवारे करून दमले, दादांना बांगड्यांचा आहेर — दुधाच्या बाटल्या भरणाऱ्या जवानांची थट्टा — असले हिणकस प्रकार झाले आणि वैताग आला. कर्णिक येण्याअगोदर बोलणाऱ्या किंवा गाणाऱ्या माणसानी जे चालवलं होतं ते पाहून 'कर्णिक तरी ह्याच्यापेक्षा काय वेगळे असणार ?' असं वाटू लागल. सर्व आवरून टॅक्सी पकडावी, पुणे गाठावं, संपाचा विषय डोक्यातून काढून टाकावा आणि शांतपणे पाचव्या क्रिकेट कसोटी सामन्याची कॉमेंटरी ऐकत बसावं हे सर्वात उत्तम—

इतक्यात कर्णिक आले. गर्दीमधून ते कधी स्टेजजवळ आले ते कळलंच नाही. संपनेता भाषणाला येण्याअगोदर 'नॉर्मली' अनेकांची धावपळ होते. चमचे 'आले आले'— 'वाट सोडा' करत स्वत:च गर्दी करीत धक्काबुक्की करतात, पोलीसलोक दंडुके सावरून तयार रहातात, पोलीस—अधिकारी वायरलेसवर संदेश पाठवतो, पत्रकार आणि छायाचित्रकार आपापली आयुधं संभाळून सज्ज होतात आणि हे सर्व झालं आहे ह्याची खात्री पटल्यावरच संपनेता स्टेजजवळ येतो. केस पिंजारलेला, डोळे तारवटलेला-चिडका—तापलेला— असा त्याचा अवतार असतो, त्यामुळे 'कर्णिक येणार' ह्याची मी वाट पाहात असताना कर्णिक आलेले आहेत हे मला कळलंच नाही. माजगावकरांनी स्टेजवर निरोप पाठवला. कर्णिक स्टेज उतरून खाली आले. दुसऱ्या दिवशी दुपारी एकची वेळ मुलाखतीसाठी त्यांनी दिली आणि ते पुन्हा स्टेजवर गेले.

कर्णिक बोलायला उभे राहिले आणि श्रोतृवर्गात शांतता पसरली. अगदी पिन ड्रॉप सायलेन्स म्हणावा अशी शांतता. एव्हाना दहा हजारांच्यावर लोक जमले होते. शांत आणि स्वच्छ आवाजात, कसलेही हातवारे न करता, कर्णिकांनी भाषणाला प्रारंभ केला.

'महाराष्ट्रातील दहा लाख सरकारी आणि निमसरकारी, नगरपालिका, जिल्हा परिषदा याचे कर्मचारी आणि शिक्षक— हा सुवर्णमहोत्सव मोठ्या गौरवात आणि अभिमानानं आज साजरा करीत आहेत. जी घटना तुम्हा—आम्हा कर्मचाऱ्यांना अभिमानास्पद आहे, ती महाराष्ट्र राज्य शासनाला लांच्छनास्पद आहे. दहा लाखांचा संप पन्नास दिवस राज्यशासन बंद. ज्या शासनाच्या व्यवहारावर या राज्यातील सर्व खाजगी आणि सार्वजनिक जीवन अवलंबून आहे. असं राज्यशासन गेले पन्नास दिवस बंद आहे, ह्याची खंत राज्यशासनाला, शासनकर्त्यांना नाही हे ह्या राज्याचं आणि देशाचं दुर्दैव आहे... पंचवीस फेब्रुवारीला निवडणुका निश्चित. आज एक फेब्रुवारी. अजूनही महाराष्ट्रात निवडणुकांच्या सभा होऊ शकत नाहीत. घटना दुर्दैवी आहे. या देशाच्या आणि राज्याच्या भवितव्याच्या दृष्टीनंही. तसं पाहिलं तर आपल्या राज्यात आता लोकशाही लुप्तच झाली आहे. गेले पन्नास दिवस दहा लाख लोक, महाराष्ट्रातील १/८ जनता संपावर आहे. पाच कोटी जनतेचं भवितव्यही त्यात गुतलं आहे, आणि महाराष्ट्र शासन वाटाघाटीचे दरवाजे घट्ट बंद करून बसलं आहे. निवडणुकांचा कार्यक्रम आता निश्चित झाला आहे. २५ फेब्रुवारीला निवडणुका आणि सत्तावीसला मतमोजणी. महाराष्ट्रात या निवडणुका लोकशाही संकेतानुसार व्हाव्या असा आमचा आग्रह आहे, अशी आमची मनस्वी इच्छा आहे. या लोकशाही संकेतांची काळजी फक्त आम्हीच घेऊ शकतो असा आमचा दावा आहे आणि म्हणून संपाचा हा पेचप्रसंग सन्मानाने सुटावा असा आमचा महाराष्ट्र शासनाला आग्रह आहे. We have no stakes in the election, पण निवडणुका कशा घडतील, कशा घडाव्यात याबद्दल शासनाला यत्किंचितही चिंता दिसत नाही. रोजदारीवर नेमलेल्या लोकांकडून निवडणुका पार पाडण्याचा शासनाचा इरादा आहे. शक्याशक्यता हा वेगळा प्रश्न. यासंबधी आपण सर्वांनी एक गोष्ट लक्षात ठेवायची आहे की, हे होऊ तर शकत नाही; पण दुर्दैवान जर अटीतटीनं, अट्टाहासान निवडणुका घेण्याचा प्रयत्न झाला तर, महाराष्ट्रातील सर्व निवडणुका अवैध आणि बेकायदा ठरण्याची शक्यता आहे...'

संपनेता असाही असू शकतो ह्यावर माझा प्रथम विश्वासच बसत नव्हता मुंबईच्या संपकरी, सरकारी कर्मचाऱ्याला जखम करून त्यावर मी मीठ चोळत असता मला दुपारी सांगत होता— 'आमच्या कर्णिकांना तुम्ही एकदा भेटाच'— कर्णिकांना भेटलंच पाहिजे तेव्हाच कर्णिक समजणार. कर्णिकांची आणि जनतेची भेट घालून देण्यात आपल्या महाराष्ट्रातील वार्तावितरणसंस्था उदासीन का राहिल्या कळत नाही. कर्णिक कोण आहेत ? कशासाठी हा संप चालू आहे ? ह्याचं वास्तववादी चित्रण जनतेसमोर ठेवल गेलं असतं तर संप इतके दिवस लांबलाच नसता असा माझा अंदाज. वर्तमानपत्रे, रेडिओ आणि टेलिव्हिजन ही वार्ता वितरणाची मुख्य साधन. एक वेळ असं मानू की रेडिओ आणि टी. व्ही. ह्यांना 'सरकारी धोरण' सांभाळावं लागत असल्यामुळे अनेक गोष्टी सांगायची इच्छा असूनही सांगता येत नाहीत. समजा रेडिओ स्वतंत्र असता— टेलिव्हिजन स्वतंत्र असता— तर संपनेते कर्णिक आणि महाराष्ट्राचे



**सर्वश्री कर्णिक, गोडबोले आणि बाबळे**

मुख्य मंत्री, ह्या दोघांच्यात ' डायलॉग ' निर्माण करून तणाव कमी करणं त्यांना जमलं असतं. किंबहुना अशा प्रकारच्या परिस्थितीत 'छायागीत' वगैरे बाजूला सारून असा 'डायलॉग' व्हावा यासाठी धडपड करणं हे दूरदर्शनसारख्या माध्यमाचं आद्य कर्तव्य ठरायला हवं. चूक दूरदर्शनची नाही. हे करण्याचं स्वातंत्र्य त्यांना नाही हा दुर्दैवाचा भाग आहे. टेलिव्हिजन हे फक्त मनोरंजन आणि उपदेशात्मक वार्तावितरणाचं साधन– थोडंफार लोकशिक्षणाचंही– अशी सर्वसाधारण समजूत– निदान आपल्या इथं तरी आहे. आकाशवाणीबद्दल जितकं कमी बोलावं तितकं बरं. महाराष्ट्रामध्ये सरकारी आणि निमसरकारी अशा दहा लाख कर्मचाऱ्यांचा संप पन्नासावा दिवस साजरा करतो आहे आणि मुंबईच्या दूरदर्शनचा किंवा आकाशवाणीचा एकही प्रतिनिधी तिथं नाही, ह्यातच काय ते समजून घ्यावं. रेडियो आणि टेलिव्हिजन वार्तावितरणाची जबाबदारी अपक्षवृत्तीनं पार पाडीत नसताना सर्वसामान्यांना खरीखोटी परिस्थिती समजावी कशी ? कमीत कमी वृत्तपत्रांकडून तरी तसा प्रयत्न व्हायला हरकत नाही. महाराष्ट्रातील मराठी, गुजराथी, इंग्रजी आणि इतर भाषांतील दैनिकांनी, साप्ताहिकांनी हे कार्य करायला नको ? आणीबाणी उठून वर्ष झालं; पण दैनिकांचे आणि साप्ताहिकांचे संपादक मुख्य मंत्र्यांना आणि शासनाला घाबरून असल्याप्रमाणे का लिहितात ? गेले पन्नास दिवस संपाबद्दल इतकं एकांगी लिखाण का झालं ? सरकारकडून जाहिराती आणि इतर सवलती हव्यात म्हणून ? आरोप नाही पण मनामध्ये हा प्रश्न निर्माण झाला तर ते चूक आहे का ?

दहा लाखांचा संप– पन्नास दिवस– घडवून आणणारा संपनेता– असा हा कर्णिक ! हा कोण आहे ? कसा आहे ? काय बोलतो ? विचारसरणी काय आहे ? कसा दिसतो ? आहे महाराष्ट्रीय माणसाला माहीत ? ही अनास्था कशासाठी ? शहा आयोगाचं रेडिमेड मटेरियल छापायला मिळतंय. तेव्हा इतर काही लिहिण्यात कशाला श्रम वाया घालवा ? कुणी सांगितलंय कर्णिकबद्दल लिहून राज्यकर्त्यांचा रोष ओढवून घेण्याचा नसता उपद्व्याप करा म्हणून ? बोंबलेनात का कर्णिकबद्दल लोक ! आपण थोडंच त्याचं वकीलपत्र घेतलंय ? मिटेल संप मिटायचा तेव्हा. आयोगाचं काम स्थगित आहे, दुसरं काही तरी उथळ लिहू ! इराणचा शहा येतोच आहे. निवडणुकांचं काही तरी सुरू होईलच– तोपर्यंत कदाचित संप मिटेल सुद्धा !

अशी अनास्था काय कामाची ?– लोकजागृती, लोकशिक्षण– चांगले शब्द आहेत; पण हे करायचं कुणी ? Any development, 'positive' or 'negative' needs a 'Supportive' communication for the active participation of the people in the movement. If the communication is heavily negative the result tends to be negative. But it is quite possible to make an apparently negative movement to yield positive results through positive communication.

ज्या संपाचा पन्नासावा वाढदिवस साजरा करण्यासाठी शिवाजीपार्कच्या मैदानावर कर्णिक भाषण करीत होते तो संप महाराष्ट्रभर विखुरलेला असूनसुद्धा सर्वव्यापी आहे आणि त्याची प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष झळ सर्वांनाच पोहचणार आहे. कर्णिक ज्या संघटनेचे सरचिटणीस आहेत, ती संघटना फक्त ज्या व्यक्तींना सरकारी खजिन्यातून पगार किंवा वेतन दिलं जातं, त्यांच्यापुरतीच मर्यादित आहे. त्यामुळे असंघटित कामगारांचा किंवा शेतमजुरांचा प्रश्न ह्या संघटनेच्या कक्षेमध्ये बसत नाही असा त्यांचा दावा आहे. ज्यांच्यासाठी संपाचा हा लढा उभारला, मग तो प्राथमिक शिक्षक असो, माध्यमिक शिक्षक असो, कोतवाल अगर जिल्हापरिषदेचा नोकरवर्ग असो– ह्या

सर्वांचा पगार प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षरीत्या सरकारी खजिन्यातून जातो– पण शेतमजुराची रोजदारी ह्या खजिन्यातून जात नाही. त्यामुळे त्यांचा प्रश्न आमच्या कक्षेत येत नाही !' असं सपकर्त्यांचं म्हणण आहे.

संपामुळे अनेक ठिकाणी असंघटित मजूरवर्गाची रोजंदारी बुडत आहे हे नाकारता येणार नाही. उदाहरणार्थ नागपूर भागातील जंगलखात्याचे अधिकारी सपावर असल्यामुळे लाकूड कापणाऱ्या गिरण्याचा नोकरवर्ग बेकार आहे जगलातील लाकडाची चोरी होत आहे. त्यामुळे जगलाची नासधूस होऊन फार मोठं नुकसान होण्याची भीती आहे. ह्या सर्वव्यापी संपाची झळ तुम्हा–आम्हा मध्यमवर्गीयाना काही काळ सहन करणं शक्य आहे सप आणखी दोन–तीन महिने लांबला तरी मध्यमवर्गीय सामान्य जनतेला फारशी तोशीस पडणार नाही; पण रोजगारीवर पोट भरणाऱ्या असघटित मजुराचे मात्र हाल होणार हे निश्चित. सपकऱ्याच्या संघटना निधी गोळा करून चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्याना जमेल तेव्हढी आर्थिक मदत करीत आहे. स्तुत्य आहे त्यामुळे poverty line च्या आसपास जगणारा सरकारी कर्मचारी काही काळ तग धरू शकतो; पण असंघटित मजूर कशाच्या आधारावर तग धरणार ? त्याच जे आर्थिक नुकसान होतंय त्याची दखल कोण घेणार ?

सपाच हे वादळ मिटल्यानतर सरकारी–निमसरकारी कर्मचारी– जे समन्वय समितीच्या आसऱ्यानं टिकाव धरून राहिले ते–पुन्हा नियमित जीवनक्रम सुरू करू शकतील; पण अशा एखाद्या समितीचा किंवा सघटनेचा आधार नसलेल्याना सपाच्या वादळाचा जो तडाखा बसला आहे त्यांनी कशाच्या आधारावर उभं राहाव ? का असंघटितानी आपलं आपण पाहून घ्याव– जगाव किंवा मराव ! हे सगळ अन्यायाच नाही वाटत ?

सपकऱ्याच्या सघटनेतील एका कार्यकर्त्याच म्हणणं–' असंघटिताबद्दल आमच्या मनात सहानुभूती निश्चित आहे; पण त्याच्यासाठी आम्ही प्रत्यक्ष काही करू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे... एवढा मोठा सप– आज पन्नास दिवस चालतोय. ह्याचं सरकारला आश्चर्य वाटायला नको ? त्यानी नको का विचार करायला ह्या सर्व अडचणीचा ? एकट्या कर्णिकानी सागून असा सप चालेल ? लोकाचे हाल नाही होत ? आज सफाईकामगाराच्या माडीला माडी लावून डबल ग्रॅज्युएट माणूस बसला आहे. ... तीस वर्षांत जे घडू शकल नाही ते ह्या सपातून घडतय ह्याच सरकारला दुःख होतय का ?'

'आमच्या सघटनेत राजकारण नाही !'– एक तरुण कार्यकर्ता सागू लागला–' कुठलाही पुढारी बाहेरचा नाही. आम्ही संघटित असण्याचं हे मुख्य कारण आहे. मी प्रजासोशॅलिस्ट असू शकेन, दुसरा शिवसेनेचा, कुणी जनसघाचा, कुणी कम्युनिस्ट, आणखी कुणी तिसऱ्याच एखाद्या पक्षाचा. आमची व्यक्तिगत मत काही असली तरी या संघटनेत बाहेरचा कुणी ढवळाढवळ करू शकत नाही. आमच्यातलाच मनुष्य आमचा लीडर होऊ शकतो. आज कर्णिक आहेत– उद्या दुसरा कुणी येईल; पण आमच्यातलाच !'

अशा ह्या सघटित सरकारी आणि निमसरकारी कर्मचाऱ्यांच्या संपाचं नेतृत्व करणारे र. ग. कर्णिक ह्याची नोकरीची सुरुवात PWD खात्यापासून झाली कर्णिक मूळचे बडोद्याचे मुंबई विद्यापीठाचे ' सोशियॉलॉजी ' विषयाचे पदवीधर. मुबईमध्ये पूर्वी कार्य करणाऱ्या लोकसेनेचे कार्यकर्ते. लोकसेनेत काम करताना सर्वश्री सुळे, नाशिकचे नगराध्यक्ष गुप्ते ह्या मंडळींच्या सहवासातून त्यांना सघटित कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. १९६२ साली सर्व महाराष्ट्रातून सरकारी कर्मचाऱ्यांच्या संघटना उभ्या करण्याची कल्पना जन्मास आली. तोपर्यंत मुबई आणि सचिवालयापुरत्याच अशा संघटना होत्या सर्व कर्मचाऱ्यांची स्टेटवाईज सघटना नव्हती. तेव्हा दडवते, जे बी कुलकर्णी आणि कर्णिक ह्यानी परिश्रमपूर्वक प्रयत्न करून जून १९६२ ते ऑक्टोबर ह्या दरम्यान ही सघटना उभी केली. श्री. यशवतराव चव्हाणाच्या हस्ते सघटनेच उद्घाटन झालं. ह्या सर्व कार्यात सिंहाचा वाटा कर्णिकांचा !

महाराष्ट्राच्या सव्वीस जिल्ह्यामधून स्वतंत्र सघटना आहेत आणि त्या सव्वीस सघटनाच महामंडळ सचिवालयात आहे कर्णिक तिथं बसतात. सचिवालयातील संघटनेच्या ऑफिसमध्यें कर्णिक आणि त्याचे साहाय्यक श्रीयुत शृगारपुरे असे दोघेच आहेत. इतर स्टाफ नाही. परवडत नाही; पण इतर कार्यकर्ते ऑफिसच्या वेळेनंतर त्यांच्या कामात स्वेच्छेन साहाय्य करतात.

दोन फेब्रुवारीला एक वाजता कर्णिकांनी मुलाखतीसाठी वेळ दिली होती. माजगावकरांनी आणि मी मिळून प्रश्नावली तयार केली श्री. विजय तेंडूलकराना मी आमच्याबरोबर येण्याची विनंती केली. त्यांनीही होकार दिला आणि आम्ही तिघे एकच्या सुमारास मुबई मराठी पत्रकार सघाच्या कार्यालयात दाखल झालो. पाठोपाठ कर्णिकही आले. मुलाखत सुरू झाली.

**प्रश्न :** ' शिवाजीपार्कच्या कालच्या सभेसाठी तुमच्या भाषणावरून किंवा आतापर्यंतच्या वर्तमानपत्रातील लिखाणावरून केंद्राप्रमाणे महागाईभत्ता हीच तुमची मुख्य मागणी आहे असं वाटतं–तसं आहे का ?

**कर्णिक :** ती मागणी हायलाइट झाली आहे एव्हढंच. आमच्या मागण्या तीन आहेत. त्याना समान महत्त्व आहे. आणीबाणीच्या काळात चार हजार लोक अकाली निवृत्त झाले. अकाली म्हणजे ५८ व्या वर्षी निवृत्ति असताना ५० व्या वर्षीच निवृत्ती हा नियम झाला अशा प्रकारे चार–साडेचार हजार लोक निवृत्त करण्यात आले. आम्ही दबाव आणला तेव्हा दोन हजार लोक परत घेतले. अडीच हजार तसेच आहेत. त्याना परत घेतल पाहिजे अशी आमची मागणी आहे.

**प्रश्न :** अकाली निवृत्त झालेल्यांना पुन्हा नोकरीवर घेणे हा प्रश्न आर्थिक प्रश्नाव्यतिरिक्त आहे–त्याबद्दल वाटाघाटीतून मार्ग नाही का सापडणार ?

**कर्णिक :** ' नाही. ह्याला सुद्धा ते आर्थिक प्रश्न असंच समजतात. कारण लोक परत घ्यायचे म्हणजे आर्थिक बोजा आलाच. दुसरा भाग आहे वेतनमडळाने केलेल्या शिफारसीचा. त्या शिफारसीमध्ये काही गभीर स्वरूपाचे अन्याय झाले आहेत. आमच्याकडे प्रथम कर्मचाऱ्यांच्या विविध श्रेणी होत्या. आता फक्त दहा श्रेणीत कर्मचारी व शिक्षकवर्ग याचे गेट केले आहेत. हे वर्गीकरण करीत असता



हीच शक्ती आता नवनिर्माणाकडे ......

आज जो पगार मिळतोय तो देखील कमी होण्याची शक्यता आहे. तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण हे काही नवीन नाही. मागच्या मंडळाकडूनही हे घडले आहे. आहे तो पगार कमी व्हायचा किंवा तसाच रहायचा किंवा पगारवाढ अगदी नॉमिनल व्हायची. हे अन्याय दूर व्हायला पाहिजेत. शैक्षणिक पात्रता हा एकच नियम वेतनश्रेणी ठरविताना त्यांनी विचारात घेतला. बाकी कसला नाही. Different responsibilities आणि workload चा विचार व्हायला हवा. पदांचे मूल्यमापन नाही; पण broadly काही गोष्टींचा जरूर विचार केला पाहिजे. उदाहरणार्थ ग्रामसेवक व क्लार्क ह्यांची एक वेतनश्रेणी हे बरोबर नाही. ग्रामसेवकाला फार विविध जबाबदाऱ्या घ्याव्या लागतात. आम्ही त्यांना धोरणविषयक निर्णय घ्यायला सांगतोय. आपल्या देशात जिथे जिथे कमिशन्स नेमलीत तिथे तिथे हे घडलंय. पुन्हा पुन्हा त्यात दुरुस्त्या कराव्या लागल्यात. आमच्याकडे देखील दहाबारा वर्षांपूर्वी जे बडकस कमिशन बसले होते त्यालाही साडेतीनशे–चारशे ammendments सरकारने केल्या. सरकारला हे सर्व माहीत आहे...

**प्रश्न :** केंद्राप्रमाणे महागाईभत्ता हे तत्त्व मान्य झालं तर संप मिटू शकतो का ?

**कर्णिक :** नुसत्या तत्त्वानं हे प्रश्न सुटत नाहीत. कारण तत्त्व आणि व्यवहार हे दोन्ही १९७३ पर्यंत मान्य होतं...मे १९७३ पर्यंत आम्ही केंद्राच्या दरानेच भत्ता घेत होतो–मात्र नंतर हा संबंध तुटला.

**प्रश्न :** का तुटला ?

**कर्णिक :** खास कारण काहीच नाही. सरकारची पद्धतच अशी ठरली आहे की, आंदोलन झाल्यावरच काही निर्णय घ्यायचे. १९७३ पर्यंत जे घेतले त्याअगोदर सतत काही ना काही आंदोलने घडलीच आहेत...१९६६ मध्ये आम्ही एका दिवसाची सामुदायिक रजा घेतली होती तेव्हा त्याला गती मिळाली; पण तरी १९७० मध्ये पुन्हा संप करावा लागलाच.

**प्रश्न :** १९७३ च्या मे महिन्यापर्यंत तुम्ही केंद्राच्या दरात महागाईभत्ता घेत होता. नंतर तो बंद झाला. असं कसं घडू शकतं ? कारण सरकारने एकदा सुरू केलेली गोष्ट थांबविता येत नाही. मग जे चालू होतं ते बंद कसं पडलं ?

**कर्णिक :** त्याचं असं आहे, सरकार जो भत्ता देत होतं तो भत्ता कमी झाला नाही; पण नंतर केंद्र सरकारनं जो भत्ता वाढविला तो आम्हाला दिला नाही.

**प्रश्न :** तत्त्व व व्यवहाराच्या दृष्टीने जर महागाईभत्त्याचा प्रश्न सुटला नाही तर वाटाघाटीस तुम्ही तयार आहात का ?

**कर्णिक :** त्याच्यासाठीही वाटाघाटी करू; पण ते म्हणतात की, आता there is no basis for discussion or negotiations. आम्ही त्यांना म्हटलं, basis काय याबाबत आपण चर्चा करू. वाटाघाटीसाठी काय मुद्दे घ्यायचे ह्यावर चर्चा करू. समपातळीच्या मुद्द्यावर आम्ही काही तडजोड करायला तयार आहोत. उदाहरणार्थ differed payment असू शकतं, प्रॉव्हिडंड फंडामध्ये असू शकतं. ह्या सर्वांबद्दल आमची आग्रही भूमिका नाही हे आम्ही स्पष्ट केलंय.

**प्रश्न :** ही वेळ संपाला निवडण्याचे विशेष काही कारण ?

**कर्णिक :** आमच्या movement चा स्वाभाविक क्रमिक आविष्कार. आधीही जेव्हा संप केले तेव्हा ते काही निवडणुकीच्या तोंडावर घडले नाहीत. तारखा पाहा–एप्रिल ६६, एप्रिल ७०, एप्रिल ७४–७५ मध्येदेखील. ह्या संपांच्या वेळेस निवडणुका काही तोंडावर

आलेल्या नव्हत्या. तरीही संप झाले ना ? निवडणुका डोळयासमोर ठेवून कुठला लढा आम्ही कधी केला नाही. १९७५ साली सदतीस दिवसाचा सप झाला. त्यातली जी फलनिष्पत्ती होती–ज्या गोष्टी ठरल्या होत्या त्याच्यात पुढं बदल झाला. आणीबाणीत सगळं पुसून साफ झाल. ठरलेल्या गोष्टी बाजूला टाकल्या गेल्या. हा सर्व असतोष रुजलेला होता. आणीबाणी शिथिल झाली आणि फेब्रुवारी १९७७ पासून महाराष्ट्रभर प्रचड प्रमाणावर सभा सुरू झाल्या. नंतर सरकारच्या नेतृत्वात बदल झाला तेव्हा १९७७ च्या मे महिन्यापासून आमच्या पुन्हा गाठीभेटी सुरू झाल्या. ११ ऑगस्टला आम्ही नोटिस दिली...हे जर सुटत नसेल तर आम्हाला संप करावा लागेल, असं आम्ही सरकारला सांगितल. ३१ ऑगस्टच्या पुढे केव्हाही बेमुदत सप सुरू होईल म्हणून सूचना दिली. तरीदेखील २० सप्टेंबरला बेमुदत सपाची नोटिस देऊनही आम्ही फक्त दोन तासाचा संप केला. तेव्हा बेमुदत सप अशक्य नव्हता, पण आमच्यात एकी नाही असा सरकारचा गैरसमज झाला असावा. आमचा असतोष फार मोठा आहे ह्याची सरकारला जाणीव व्हावी म्हणून दोन तासाचा संप केला. एवढी आणीबाणी झाली. असं घडू नये हे कळाव हा हेतू.

**प्रश्न :** निवडणुकाची वेळ वाटाघाटी करण्याच्या दृष्टीन, तडजोडीच्या दृष्टीन सोयीची असते म्हणून सपाची ही वेळ साधली का?

**कर्णिक :** नाही, तस काही गणित नव्हतं.

**तेंडूलकर :** मी म्हणतो, तसं असलं तरी काही चुकलं नाही. मागण्या मिळवणं हा हेतू पूर्ण करण्यासाठी आपली वेळ प्रत्येकजण ठरवीत असतो. त्यात फारसं काही चुकल नाही.

**कर्णिक :** आम्ही हेतुपुरःसर काही केलं नाही. सफाई कामगार पावसाळ्यातच संप करणार...आम्ही तसं काही ठरवलं नव्हत. निवडणुकांचा आम्ही विचार केला नाही हे खरं. आमच्यासबंधीचे जे निर्णय असतात ते सेवाविषयक अटीचे असतील, भत्त्यासबंधीचे असतील. त्या निर्णयांचं स्वरूप शेवटी राजकीयच रहात. आम्ही राजकीय संस्थेचे सेवक आहोत. राजकारणापासून अलिप्त ह्याचा अर्थ काय ? तर पक्षीय राजकारणापासून अलिप्त, परतु राजकीय सस्थेचा सेवक जे करतो ते एका अर्थी राजकीयच समजावं लागेल. कारण त्याचे परिणाम तसे असतात

**प्रश्न :** वेळा जमून आल्या म्हणून शका येते एवढच. कालच्या भाषणात तुम्ही म्हणालात की, तुमच्याशिवाय निवडणुका होऊच शकणार नाहीत.

**कर्णिक :** निवडणुका आमच्याशिवाय होऊ शकत नाहीत असे म्हटले – त्या होऊ नयेत किंवा झाल्या तर त्याला आम्ही अडचणी निर्माण करू असं नव्हे.

**प्रश्न :** तुम्ही म्हणता तसं असेल तर निवडणुका होणारच नाहीत.

**कर्णिक :** पण त्या व्हाव्यात म्हणूनच हे मिटाव असं वाटतं. निवडणुका आमच्याशिवाय होऊ शकत नाहीत असं आम्ही म्हणतो त्याला कारण आहेत. निवडणुकांसाठी जी पूर्वतयारी करायची असते ती नवीन भरती झालेले लोक करू शकणार नाहीत. त्याला काही अनुभवांची आवश्यकता आहे. निवडणुकाच्या बाबतीत प्रोसिजरचं महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यात जर कुठलीही चूक झाली तर ती निवडणूक अवैध ठरविली जाईल. आतापर्यंत उमेदवाराच्या ज्या चुका होतात त्यासंबधात केसेस होतात. आता कदाचित कार्यवाहीच्या सदर्भात चुका होऊ शकतील. आम्ही सरकारला दाखवून दिलय. निवडणुकाचा जो आरंभ झाला तेव्हा मुबईच्या जिल्हाधिकाऱ्यानी जे नोटिफिकेशन केलं त्यामधेच त्याची चूक झाली. अनुभवी कर्मचाऱ्याच्या सहाय्याचा अभाव हेच त्या चुकीमागचं कारण.

**प्रश्न :** आर्मीची मदत घेऊन निवडणुका पार पडतील ?

**कर्णिक :** 'मग त्यात लोकशाही ती काय राहिली ? आणि आर्मीला हे काम करणे कठिण आहे. त्यातील कार्यवाहीचा भाग कठिण आहे. अनुभव हवा, नियमाची माहिती हवी. संप मिटविला तर आम्ही मात्र अहोरात्र खपून तयारी करू. निवडणूक–सकेतास कुठलाही धक्का बसणार नाही ह्याची काळजी घेऊ.

**प्रश्न :** वर्तमानपत्रे तुमच्याविरुद्ध का ?

**कर्णिक :** 'संपादकीय' विरोधात आहेत. संप असला की दोष फक्त कामगाराला दिला जातो...काही बाबतीत सरकारला पण दिला जातो–मालकाना मात्र नाही. ही कदाचित आर्थिक धोरणातील नीतीही असू शकेल.

**तेंडलकर :** संप जेव्हा चालू नसतो तेव्हा तुमच्या इथं काय अॅक्टिव्हिटीज् असतात ?

**कर्णिक :** विविध प्रकारच्या ..पहिली अत्यंत आवश्यक गोष्ट म्हणजे आमच्या सर्व घटकांशी सपर्क साधणं. त्यामुळे त्यासबंधीच्या सतत मीटिंगज् असतात. त्याचबरोबर आजकाल अगदी साध्या स्वरूपाच्या मागण्याचं प्रमाण फार मोठं असल्यामुळ त्या सोडविण्यात सगळेच गुंतून राहिलेले असतात; परतु अक्षरशः वेगवेगळया मागण्या असू शकतात तेव्हा त्याची मांडणी व संकलन हा एक स्वतत्र कार्यक्रम असतो. तिसरी गोष्ट म्हणजे आमचे जे कार्यकर्ते आहेत ह्याचा परस्पेक्टिव्ह वाढवावा या दृष्टीनं आमची शिबिर होतात. यामधे आम्ही वेगवेगळया लोकाची भाषणे योजतो-कारभाराविषयी, आर्थिक समस्यांबाबत. आता आणखीही काही कार्यक्रम आम्ही हाती घेतले आहेत...त्याची जाहिरात केली नाही. कारण जाहिरात झाली की मार खाणे आलेच. आम्ही तीन खेडी दत्तक घतली आहेत. नाशिक जिल्ह्यात सावरगाव हे आदिवासी खेडे, पुण्याला माजरी खुर्द आहे व अकोल्यास सुठाण. आम्ही खेडं दत्तक घेण आणि टाटांनी दत्तक घेणं ह्यात फरक आहे. आर्थिक अडचण आहेच. त्या खेड्याच्या प्रगतीमध्ये आम्ही काही मदत करू शकतो का, ते आम्ही पहातो. उदाहरणार्थ अनेक विभाग काही ना काही योजनेखाली आलेले असतात; पण त्याची माहिती संबंधित ग्रामस्थांना मुळीच नसते आणि असल्यास त्याचे जे अतस्थ राजकारण असते, त्यात कुठे ना कुठे ते अडकलेलं असतं. शासनाच्या कार्यपद्धतीत कागदोपत्री काही गोष्टी अडकून पडलेल्या असतात. या दोन ठिकाणी आम्ही निश्चितच मदत करू शकू आणि त्या मदतीचा उपयोग होईल अशी आमची खात्री झाली. तीन खेडी दत्तक घेण ही नुसती सुरुवात आहे विकास योजना लोकापर्यंत कशा पोचवायच्या त्याबद्दलचा हा आमचा चाचपडण्याचा प्रयत्न आहे; पण हे कार्य करीत रहाव अशी इच्छा आहे. नाशिकचा आमचा अनुभव सागतो–

– आदिवासी खेड्याना सरकारची काही खास मदत असते हे

कित्येकांना माहीत नव्हतं. ते आम्ही शोधून काढलं आणि त्यातून ह्या प्रयत्नाची सुरुवात झाली. सरकारी यंत्रणेतून जिथं विहिरी खोदण्याचं काम व्हायला पाहिजे तिथे ते होतच नव्हतं आम्ही ते सुरू केलं. दुर्दैव असं, की दोनशे फूट खोल जाऊनही आमच्या विहिरीला पाणी मिळालं नाही. मग जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकात जे पैसे होते ते वापरून दुसऱ्या मार्गाने गावाला आम्ही पाणी पुरवून दिले. तिथल्या शेतकरी संघाकरवी सकरित गाई दिल्या. प्रत्यक्ष आम्ही दिल्या नाहीत. पैसा पुरविला जिल्हा परिषदेने, जबाबदारी घेतली शेतकरी संघाने, पैसे बुडणार नाहीत ह्याची खात्री मात्र आम्ही दिली. या सावरगाव खेड्यात ३०० लोकवस्ती आहे. दुधाचा थेंब नव्हता; पण नाशिकपासून १५ मैल दूर असलेल्या ह्या खेड्यामधून आज दररोज शंभर लिटर दूध जाते. पंचवीस कुटुंबांना रोजगार उपलब्ध झाला दुसऱ्या एका योजनेतून शेळ्या पुरविण्यात आल्या. आम्ही फक्त सरकारी यंत्रणेत प्रयत्न करून co-ordination घडवून आणतो आमचा हा एक साधा प्रयत्न. ही काही सामाजिक क्रांती वगैरे म्हणून करीत नाही. ह्या सर्वांतून आमचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. We can do it so let we continue doing it—असं त्यातून झालं.

तेंडूलकर : खेड्यातील लोकांना सोयी प्राप्त होईपर्यंतचे मधले जे 'बॉटलनेक्स' आहेत ते तुमच्या नजरेत आणून दिले तर ते दूर करण्यास काही मदत कराल काय ?

कर्णिक : निश्चितच. वेगवेगळ्या सरकारी खात्यांची मदत घेऊन आम्ही निश्चित मार्ग दाखवू. नुसती माहिती देणं हेदेखील फार मोठं काम आहे.

प्रश्न : विकासकार्यासाठी, निर्मितीसाठी तुमची संघटित शक्ती उभी राहिली तर नोकरशाहीच्या सध्याच्या स्वरूपात बदल घडेल, नाही का ?

वाबळे : तसा आरंभ झालाही आहे. त्यात अडथळे खूप आहेत. संघटनात्मक कार्याचं प्राधान्य लक्षात घ्यावयास हवं. सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया निर्माण करण्याचा आम्ही प्रयत्न चालविला आहे. जयप्रकाशजींनी समग्र क्रांतीची घोषणा पाटण्यामध्ये दिली; पण त्याची चाहूल प्रथम लागली ती महाराष्ट्रातील संप–आंदोलनांनी. समग्र क्रांतीची पहिली वाटचाल दिसेल. इतर ठिकाणी त्यासंबंधात काही घडून आल्याचं आमच्या दृष्टिपथात नाही. संपामध्ये सामील झालेले जे दहा लाख कर्मचारी आहेत त्यांच्या दृष्टिकोनात, त्यांच्या अनुभवात, त्यांच्या निर्धारात अनेक स्वरूपाचा बदल झालेला आहे. २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनानिमित्त सर्व महाराष्ट्रात आमचे ध्वजारोहणाचे स्वतंत्र कार्यक्रम झाले. हजारो लोकांनी भाग घेतला. ध्वजारोहण सफाईकामगारांनी केलं...हे घडलं अगदी अभावितपणे.

तेंडूलकर : गुजरायमधे नवनिर्माण आंदोलन झालं. त्यात विद्यार्थी सामील झाले. उत्स्फूर्तपणे त्यांनी जे केलं त्यात सामाजिक बदल घडविणाऱ्या पण गोष्टी होत्या आणि आंदोलन संपल्यानंतर त्याचे काही परिणाम उरलेच; पण त्याला धरून नंतर काही झालं नाही.

कर्णिक : एक फरक लक्षात घेतला पाहिजे. गुजरायमधले हे आंदोलन इतक्या संघटित स्वरूपाचे नव्हते. विद्यार्थी आंदोलनाला काही मर्यादा असतात. कारण आंदोलन करणारे काही कायम विद्यार्थीदशेतच रहात नाहीत.

प्रश्न : म्हणूनच आमच्या मनात असं येतं की, तुमची आजची जी संघटित शक्ती आहे ती संपापुरती मर्यादित न रहाता संप मिटल्यानंतरसुद्धा त्या शक्तीला काही रूप येणं महत्त्वाचं आहे

संपानंतर काही फरक पडलेला दिसेल असा विश्वास आम्ही बाळगावा का ? संपापूर्वीचा कर्मचारी आणि संपानंतरचा सरकारी कामगार किंवा कर्मचारी ह्यांच्या विचारात, एकूण दृष्टिकोनात काही तरी फरक झालेला आपण दाखवू शकाल का ? हा देश गरिबीतून वर खेचण्याच्या कामी फार मोठं सहकार्य सरकारी कर्मचारी करू शकेल. ही जाणीव तळापर्यंत पोचविणे हे मौलिक स्वरूपाचं कार्य ठरेल. दुसरी कसोटी–या सरकारी यंत्रणेच्या अतिव्यापक स्वरूपामुळे निर्माण झालेले भ्रष्टाचारासारखे जे दोष आहेत ते दूर करण्याचा सतत प्रयत्न करणं–समन्वय समिती हे कार्य हाती घेईल का ? संपानंतर सरकारी कर्मचाऱ्यांत बदल घडला आहे का नाही त्याच्या या दोन कसोट्या ठरतील.

कर्णिक : अशा प्रकारच्या संपामधून कळत–नकळत अनेक गोष्टी घडत असतात. एव्हढ्या मोठ्या संख्येत कर्मचारी इतके दिवस जेव्हा संपाला उभा रहातो तेव्हा जनसामान्यांची सहानुभूती आपल्याला आवश्यक आहे ह्याची त्याला जाणीव होते. त्याच्या दृष्टिकोनात बारीक फरक पडत असतोच. संपानंतर कुठल्याही टेबलावर वा कुठेही असलो तरी नागरिकांच्या बाबतीत यापुढे माझी वर्तणूक कशी ठेवावी लागणार आहे याचे शिक्षण, त्याला आवडो वा न आवडो, अशा मंथनामधून मिळतच असतं. आमची संप-आंदोलनाची भूमिका Social Distributive Justice ह्या तत्त्वावर आधारित आहे. वेतनवाढ आणि महागाईभत्त्यात वाढ मागून आम्ही थाबणार नाही. महागाईभत्त्याची पुन्हा पुन्हा वाढ मागण्याचं मूळ कारण भाववाढ–अनियंत्रित स्वरूपाच्या किंमती हे आहे. त्यासंबंधी उपाययोजना करावी ही आमची मूलभूत मागणी आहे आणि अशा आंदोलनांतूनच त्यावर काही उपाय सापडेल असे आम्हाला वाटते. आर्थिक धोरण आणि सामाजिक दृष्टिकोन यात बदल घडविण्याच्या दृष्टीने अशी आंदोलने महत्त्वाची ठरतात. सध्या एक गैरसमज पसरत आहे की, संघटित कामगार हा अधिक अधिक मिळवीत चालला आहे आणि असंघटिताला मात्र काही मिळत नाही. आम्हाला हे स्वच्छपणे दाखवून द्यायचं आहे की, संघटित कामगार जर पुढे गेला आणि त्याच्या वेतनामधे फरक पडला तर त्यातून असंघटितालादेखील थोडं अधिक मिळतच. संघटित कामगार पुढे गेला नाही तर असंघटितही मागेच राहील आणि असंघटिताची बाजू घेऊन लढा करणारे कुणी भेटणार नाहीत. तो मागेच राहील.

प्रश्न : हे काही पटत नाही. असंघटितांनी संघटित होऊन आपल्या मागण्या मांडणं आवश्यक आहे... हा वेगळा विषय आहे. आमच्या प्रश्नाचा रोख हा नव्हता.

तेंडूलकर : दुसरी एक गोष्ट : खेड्यांमधून विकासाचं काम करणारी जी स्वयंसेवक मंडळी किंवा संस्था आहेत– ग्रामायनसारख्या.

कर्णिक : ग्रामायनबद्दल खूप ऐकलं आहे. अगोदर आम्हालाही कल्पना नव्हती; पण आज जिल्ह्याजिल्ह्यामधून अनेक स्वयंसेवक आणि संस्था स्वयंस्फूर्तीनं पुढे येत आहेत. अगदी तळमळीनं काम

करणारे हे लोक आहेत. आमचा हा जो दत्तक खेड्याचा कार्यक्रम आहे तो खूप पुढं नेण्याचं आमच्या मनात आहे.

**प्रश्न :** सरकारी कर्मचाऱ्यांनी खेडी दत्तक घेण्याच ठरविलं तर ग्रामीण भारताच्या रूपामध्ये आमूलाग्र बदल घडेल. टाटांनी पैसे खर्च करून खेडं दत्तक घेऊन विकास करणं वेगळं आणि शासनाशी पूर्णपणे निगडित असलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या संघटनेन खेडं दत्तक घेणं यात फार मोठा फरक! विकासयोजना थेट लोकांपर्यंत पोहचवून सबंधितांचा मोठा फायदा यातून होऊ शकेल. समन्वय समिती असं काही विधायक कार्य करीत असेल हे अनेकांना माहीत नसावं. संपानंतर समन्वय समितीकडून विधायक कार्याचा जोरदार प्रयत्न केला जाईल अशी अपेक्षा आम्ही करावी काय?

**कर्णिक :** निश्चितच. समन्वय समितीकडून जास्त विधायक स्वरूपाचं कार्य नक्की होईल. ही खळबळ तळापर्यंत नेण्याचा आम्ही नेटानं प्रयत्न करू. केवळ महागाईभत्ता आणि वेतनवाढ एव्हढच करून आम्ही थांबणार नाही. आम्ही सव्वीस जानेवारीला घेतलेली प्रतिज्ञाच याची साक्ष आहे प्रतिज्ञेतील शेवटचे वाक्य असे आहे—

**'स्वच्छ, कार्यक्षम व जनताभिमुख प्रशासनासाठी कायावाचामने झटण्याची मी प्रतिज्ञा करतो.'**

मुलाखत संपली आणि एक नवीन विचार हाती लागल्याच्या समाधानात आम्ही बाहेर पडलो. पन्नास दिवस चाललेला संप पाहण्यासाठी माजगावकरांच्याबरोबर मुंबईला आलो तेव्हा मनामध्ये संपाबद्दल, संपकऱ्यांबद्दल आणि विशेषत: कर्णिकांबद्दल मुळातच तेढ होती. त्यामुळे संपनेते कर्णिक ह्यांच्याबद्दल माझ्या काही पूर्वग्रहदूषित कल्पना झालेल्या होत्या.

शिवाजीपार्कच्या सभेत कर्णिकांचे भाषण ऐकले आणि दृष्टिकोनात नकळत बारिकसा फरक पडला ह्याची गाठ पडली पाहिजे. ह्यांच्याशी मनमोकळी चर्चा झाली पाहिजे असे वाटले. कर्णिकांच्या भाषणानंतर संपकऱ्यांनी प्रचंड मोर्चा काढला. इतका मोठा मोर्चा इतका शिस्तशीर आणि अहिंसक असू शकतो हा एक नवा शोध लागला. पन्नास दिवसाच्या संपामुळे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असूनदेखील हा संपकरी बिथरलेला दिसत नव्हता. एका लोकशाही मार्गाचा शिस्तशीर उपयोग करण्याचा त्याचा निर्धार उघड होता. संपाच्या वेळी इतक्या संघटितपणे आणि शिस्तीने वागणारा कर्मचारी विकासकार्यासाठी ही शक्ती वापरण्याचा मनोमन प्रयत्न करील तर पुन्हा वेतनवाढीसाठी किंवा महागाईभत्त्यासाठी त्याला संप करावा लागणार नाही अशी खात्री पटत होती.

मुंबई मराठी पत्रकारसंघामध्ये कर्णिकांशी तासभर मनमोकळी चर्चा झाली. त्यातून तर काही तरी विलक्षण 'पॉझिटिव्ह' असा विचार हाती लागला. कर्णिकांचं वेगळेपण कशात आहे ते समजलं. 'संपापुरताच' असा हा संपनेता नाही हा वेगळा आहे. विधायक कार्य करण्यासाठी मनस्वी तळमळ असलेला हा नेता आहे.

राज्य सरकारच्या अनेक विकासयोजना असतात. त्या लोकांपर्यंत संपूर्णपणे पोहचत नाहीत हा नेहमीचा अनुभव. अशा विकासयोजना, त्याचे संयोजक–शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ शासनाच्या यंत्रणेद्वारे विकास कार्यक्रम लोकांपर्यंत नेण्याची जबाबदारी असलेले सरकारी कर्मचारी आणि ज्याच्या भल्यासाठी ही सारी धडपड चालू आहे असा सर्वसामान्य माणूस— ह्याच्यामध्ये एक फार मोठी 'दरी' (Gap) आहे. विकासयोजना आखणारे, राबविणारे आणि त्यामधून ज्याचं जीवन विकसित व्हायचं आहे असा माणूस ह्याच्यात विकासोन्मुख किंवा विकासाला सहाय्य करणारा संवाद नाही. हा संवाद घडवून आणणं महत्त्वाच आहे.

इतक्या मोठ्या संपाचं नेतृत्व करणाऱ्या कर्णिकांना ह्या उणीवेची जाणीव आहे नुसती जाणीवच नव्हे तर संप मिटल्यानंतर सरकारी कर्मचाऱ्यांच्या ह्या संघटित शक्तीचा विधायक कार्यासाठी वापर करण्याची त्यांची तयारी आहे, तशा योजना त्यांच्याकडे आहेत. लोकशाही संकेतानुसार महाराष्ट्रातील निवडणुका पार पडाव्यात ह्या तळमळीनं तीन फेब्रुवारीला संप मागे घेण्याची एकतर्फी घोषणा त्यांनी केली. त्यामागे त्यांचा हेतु केवळ 'राजकीय' असण्याची शक्यता कमी आहे.

संप आणि निवडणुका ह्यांची लाट ओसरल्यावर विकास कार्यक्रमासाठी काही विधायक स्वरूपाची मदत हवी असल्यास सचिवालयात आता आणखी एक जागा आहे— समन्वय समितीच्या ऑफिसची. कर्णिक तिथं असतात.

□

---

**माणूस प्रतिनिधींकडून**

**ठाणे ...**
**सोलापूर....**
**नागपूर....**

**खास निवडणूक वार्तापत्रे**
**पुढील अंकी**

---

# अवती - भवती

शरद कृष्णन्

## □ जनसेवेचे बांधून कंकण

निवडणुकीच्या दृष्टीने वातावरण चांगले तापू लागले आहे. तिकिटावरून होणारी राजी–नाराजीची नाटके थंडावली आहेत. व्यक्तिगत आणि पक्षीय पातळीवरील मोर्चेबंदी पूर्ण झाली आहे. राजकीय परिस्थिती गोंधळात टाकणारी असली तरी आपले धोरण, आपला पक्ष निश्चित करून आणि अर्थातच जनसेवेचे कंकण हाती बांधून उमेदवार प्रचारमोहिमेवर निघाले आहेत. हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत प्रचाराचा धुमधडाका उडाला असेल. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी झालेल्या निवडणुकांनंतर विधानसभेच्या निवडणुकांना इतकी धार कधीच आली नव्हती. मतदारांच्या दृष्टीने एकंदर परिस्थिती गोंधळाची असली तरी राजकीय पक्षाचे प्रचारक, कार्यकर्ते, नेते आणि उमेदवार यांची जराही वानवा नाही. महाराष्ट्रापुरते पाहायचे झाले तर २८८ जागांसाठी १७१५ उमेदवार उभे असलेले दिसतात. लहान–मोठे अनेक पक्ष आणि त्यात अपक्षांची भाऊगर्दी अशी परिस्थिती असली की, पूर्वी त्याचा फायदा काँग्रेसला होत असे. आता एकाच मतदारसंघात अनेक उमेदवार असल्याचा जास्तीत जास्त फायदा जनता पक्षाला मिळेल. त्यातही काँग्रेसची एकजूट टिकून राहती तर थोडीफार टक्कर होती; पण काँग्रेस पक्ष चिरला गेल्यावर जनतावाल्यांना शे. का. पक्षासारख्या दोस्तांची मातब्बरी वाटली नाही. केवळ जर–तरच्या भाषेत बोलायचे झाले तर असे निश्चितपणे म्हणता येईल की, काँग्रेस एकसंध राहती तर जनता पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वालाही शे. का. पक्षाला असे आणि इतक्या सहजपणे झिडकारून टाकता आले नसते. इंदिरा काँग्रेस २८८ पैकी २१९ जागा लढवत आहे, याचा जनता पक्षाला जसा फायदा होईल त्याचप्रमाणे मैत्री मोडल्यामुळे समोर उभा असलेला शे. का. पक्षाचा उमेदवार त्याला त्रासदायक ठरू शकेल. चिल्लर पक्ष अथवा रिपब्लिकन पक्षासारख्या एकाच पक्षाचे निरनिराळे गट कुठल्या ना कुठल्या मोठ्या पक्षाच्या आधाराने उभे राहिले असले तरी अनेक मोठे पक्षही एकमेकांसमोर दंड थोपटून उभे राहिले असल्याने मतदार अजूनही काहीशा गोंधळलेल्या परिस्थितीतच आहे. त्यात मतदानाच्या दिवसापर्यंत प्रचार अशा टिपेला पोचतो की, त्याच्या विचारशक्तीला जवळजवळ बधिरत्व येते. तरीही प्रत्यक्ष मतदान करताना जनता पक्षाच्या केंद्रीय शासनाने लोकशाही स्वातंत्र्याबाबत दिलेल्या आश्वासनाची केलेली पूर्तता तो विसरणार नाही. इंदिरा गांधींच्या काँग्रेसला आणीबाणी आणि शहा आयोग तसेच अन्य चौकशी आयोगांच्या कामकाजाचा त्रास झाल्याखेरीज राहणार नाही; पण असल्या आयोगांच्या अहवालात इंदिराजी गुडाळल्या जातील अशा भ्रमात कोणी राहू नये. राजकीय रिंगणात जर त्यांचा सतत पराभव होत राहिला तरच त्यातून काही निष्पन्न होईल. आपणच खऱ्या गोरगरिबांच्या कैवारी आहोत, आपण सत्तेवर असलो तरच अल्पसंख्यांक सुखी राहू शकतात असा पुकारा करत करत त्यांनी एक दौरा तर पूर्ण केलाच आहे; पण त्यांची महाराष्ट्रात अजून एक फेरीही होणार आहे जनता पक्षाविरुद्ध आपली लढाई असल्याची घोषणा इंदिरा काँग्रेसच्या महाराष्ट्र शाखेचे अध्यक्ष नासिकराव तिरपुडे यांनी केली असली तरी प्रत्यक्षामध्ये अधिकृत काँग्रेसला खो देऊन जनता पक्षाला सहाय्य करण्याचीच कृती त्यांच्या हातून घडणार आहे. आपण अल्पसंख्याक आणि दलित यांच्या हिताचे रक्षणकर्ते आहोत, असा केवळ घोषाच इंदिरा काँग्रेसने लावला आहे असे नव्हे, तर जागावाटपाच्या बाबतीतही या गटांना भरपूर झुकते माप दिले आहे. ज्या २१९ जागा या पक्षातर्फे लढवण्यात येत आहेत त्यापैकी १०४ जागा अनुसूचित जाती–जमाती आणि अन्य मागासवर्गीय यांच्यात वाटण्यात आल्या आहेत. मित्रपक्षांसाठी ज्या ४० जागा सोडलेल्या आहेत त्यापैकीही निम्म्या जागा याच गटांकडे दिलेल्या आहेत. बरे, हे केवळ महाराष्ट्रापुरते आहे असे नाही, तर आंध्रमधील इंदिरा काँग्रेसचे सूत्रधार चेन्ना रेड्डी आणि कर्नाटकमध्ये देवराज अरस हेच धोरण अवलंबीत आहेत. या झुकत्या धोरणाचा फायदा इंदिरा काँग्रेसला जरूर मिळेल अल्पसंख्यांक आणि दलित यांच्याबाबतीत अन्य कोणत्याही पक्षाने हे असे झुकते माप या गटांच्या पदरात टाकलेले नाही. अधिकृत काँग्रेस पक्ष ही विधानसभा निवडणूक जिवाच्या आकांताने लढवीत आहे. राज्य कर्मचाऱ्यांचा संप या पक्षाला त्रासदायक ठरणार असला तरी राज्य शासनाची भूमिका मंजूर असलेला जो एक मोठा वर्ग आहे, त्याची सक्रिय सहानुभूती काँग्रेसच्या वाटयाला येईल. निवडणूक काळात सत्तेवर असण्याचे अनेक फायदे असतात. त्याचा पुरेपूर लाभ काँग्रेसला मिळेल. या पक्षाला खरी डोकेदुखी आहे ती इंदिरा काँग्रेसची आणि बाईंनी जातीने केलेल्या दौऱ्याची. अर्ज मागे घेण्याची मुदत टळून गेल्यानंतर फाटाफुटीची प्रक्रिया मंदावली असली तरी ती थांबलेली नाही. शेवटपर्यंत झिरपत राहणारी ही गळती गळणाऱ्या व्यक्तीच्या ताकदीवर–मतांचे लहानमोठे गठ्ठे फिरवू शकत असल्याने ही गळती आणि गळतीच्या चौफेर बातम्या काँग्रेसवाल्यांच्या ‘मोराल’-वर परिणाम करीत राहतील. अधिकृत काँग्रेसच्या दृष्टीने त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणजे शेकाप व जनता युतीला लागलेला सुरुंग. आयत्या वेळी जनता पक्षाने शब्द फिरविल्याने शेकापवाले चिडले असले तरी त्यांची नजर नदीच्या पात्राच्या

पलीकडे लागली असल्याने जनता पक्षाबद्दल अथवा नेत्याबद्दल ते अद्वातद्वा बोलत नाहीत. हा तोल शेवटपर्यंत सांभाळला जावा अशी जनतावाल्यांचीही इच्छा आहे. शेकापबरोबरची आघाडी मोडली असली तरीही जनता पक्षाने शेकापसाठी ३९ जागा सोडल्या आहेत. या एकतर्फी मैत्रीच्या बळावर शेकापवाल्यांची नरमाई टिकून राहील. शेकाप–जनता–कॉंग्रेस यांमधून निवड करायची झाली तर मतदाराचा स्वाभाविक कल जनता पक्षाकडे राहण्याची जास्त शक्यता आहे. शंकरराव चव्हाणांची महाराष्ट्र समाजवादी कॉंग्रेस जनता पक्षाला पूरक ठरेल शिवसेना, काही विशिष्ट जागी उजवे कम्युनिस्ट यांचा त्रास जनता व कॉंग्रेस या दोघानाही होईल. तरंगत्या मतांची सख्या लहान नसते. लोकसभा मतदानाच्या वेळी प्रचार सभा ऐकत असतानाच जागरूक नजरेने आजुबाजूला पाहिले तर मतनिश्चिती झालेली दिसत असे. त्या वेळी यशवंतराव चव्हाणाची पुण्यातील एक सभा मी ऐकली होती. सभेला गर्दीही बऱ्यापैकी होती; पण बहुतेक प्रेक्षक, श्रोते–बघू या तर चव्हाण काय म्हणतात ते, अशा भावनेने सभेला आलेले दिसले. त्यांच्या भाषणाला पूर्वी जसा प्रतिसाद मिळत असे तसा प्रतिसाद मुजिबात मिळत नव्हता. एखाद्या विधानावर उपहासाचे हसे चौफेर उमटत असे. जरा इकडे तिकडे नजर फिरविली तर मतदारानी आपले मत कोणाला द्यायचे हे निश्चित ठरवल्याचे जाणवत होते. या निवडणुकीच्या प्रचार सभा आता रंगू लागल्या आहेत; पण असा मत निश्चित केलेला प्रेक्षक या सभांतून आढळत नाही. अधिकृत कॉंग्रेसचा आणि इंदिराजींचा काहीही सबंध राहिलेला नाही. या वस्तुस्थितीचा नाममात्र लाभ तरी अधिकृत कॉंग्रेसला जरूर मिळेल.

## जे महाराष्ट्रात तेच इतरत्र

विधानसभा निवडणुकीबाबत जे आज महाराष्ट्रात पाहावयास मिळते, त्यामध्ये आणि अशा निवडणुका होत असलेल्या आंध्र आणि कर्नाटक येथील एकंदर परिस्थितीमध्ये फारसा फरक नाही. महाराष्ट्र राज्य विधानसभेचे सभापती जसे अचानक कॉंग्रेस सोडून जनता पक्षाच्या सदरेवर येऊन उभे राहिले. त्याचप्रमाणे आंध्रचे आर्. डी. रेड्डी आपला पक्ष सोडून जनता पक्षाच्या झेंड्याखाली येऊन उभे राहिले आहेत. रंगा रेड्डी, चोक्काराव, लक्ष्मणदास हे मंत्रिगण सत्तेच्याच आकर्षणाने पक्षातर करून जनता पक्षाच्या तिकिटावर निवडणुका लढवीत आहेत. विसर्जित होत असलेल्या आंध्र प्रदेश विधानसभेच्या एकूण २८७ जागा होत्या. जनता पक्ष केंद्रस्थानी सत्तेवर आला त्या वेळी म्हणजे गेल्या मार्चमध्ये त्या सभागृहात जनता पक्षाचे केवळ दहा सदस्य होते. ही संख्या पक्षातराचे लोण सुरू होताच रोज फुगत राहिली आणि आता म्हणजे निवडणुका तोंडावर आल्या असताना तेथे जनता पक्षाचे सत्तर आमदार आहेत. कर्नाटकमध्ये देवराज अरससाहेबांची हकालपट्टी झाली नसती तर आमदारांची घाऊक खरेदी-विक्री झाली असती आणि बंगलोरच्या एका पत्रकाराच्या मते निवडणुकीच्या दिवसापर्यंत सत्तेवर राहण्यासाठी अरस यांना मदत करणारा प्रत्येक आमदार लक्षाधीश झाला असता. एस् निजलिंगप्पा यांनी जनता पक्ष सोडल्याने मोठे आकाश कोसळणार आहे असे नव्हे; पण सत्तेच्या लोभाने सध्या रोजाना होत असलेले पक्षातर आणि पक्षातर करून घेणारांचे होणारे स्वागत, त्यांना नवीन पक्षामध्ये मिळणारी प्रतिष्ठा आणि वर आमदारकीची झूल ही किती उबग आणणारी गोष्ट आहे याची झलक एस्. निजलिंगप्पा यांच्या पक्ष सोडण्याच्या निर्णयामागे दिसून येते. आज तरी आपले सारे लक्ष प्रामुख्याने महाराष्ट्रात आणि फार तर जवळच्या आंध्र आणि कर्नाटकमध्ये केंद्रित झाले आहे; पण हे रुसव्या–फुगव्यांचे नाटक तिकडे दूरवर आसाममध्येही चालू आहे. तेथील जनता पक्षाचे अनेक प्रमुख नेते त्याना देण्यात आलेल्या मतदारसघाबाबत इतके नाराज आहेत की, निवडणूक लढवणे नको असे त्यांना वाटू लागले आहे. विसर्जित होत असलेल्या विधानसभेमधील विरोधी पक्षाचे नेते गौरीशंकर भट्टाचार्य आणखी एक ज्येष्ठ नेते देवेश्वर शर्मा, प्रदेश जनता पक्षाचे चिटणीस विश्वास गोस्वामी या साऱ्यांनी– आपल्याला चुकीचा मतदार सघ दिला म्हणून नाराजी व्यक्त केली आहे. जिथे आपले काम नाही आणि जिथं आपण अपरिचित आहोत अशा जागा आपल्याला दिल्या आहेत अशा त्याच्या तक्रारी आहेत. त्यापैकी तथ्य असलेल्या तक्रारी सोडवल्या गेल्या आहेत असा खुलासा जनता पक्षाने केला आहे. या निवडणुकीमध्ये उमेदवारांची संख्याही प्रचंड मोठी आहे. आंध्र प्रदेशामध्ये २९४ जागांसाठी १५३० उमेदवार उभे आहेत. कर्नाटकामधील २२४ जागांवर हक्क सांगण्यासाठी ११६२ उमेदवार सरसावले आहेत. काही महिन्यांपूर्वी नऊ राज्यांमध्ये निवडणुका झाल्या त्यावेळी असे वाटले होते की, आयत्या वेळी धावपळ करावी लागल्याने हा गोंधळ उसळला आहे; पण नाही. आज परिस्थितीच अशी आहे की, हा गोंधळ हा स्थायीभाव झाला आहे. त्यामुळेच प्रचारसभाना पूर्वी कधीही नव्हते असे असाधारण महत्त्व या निवडणुकाच्या वेळी भासणार आहे. जनता पक्षाकडे तर एकसे एक बढिया वक्ते आहेत. ते केवळ उत्तम वक्ते नाहीत, तर सारा देश अंधकारात असताना स्वत.ची सारी राजकीय कारकीर्द पणाला लावून त्यानी स्वतःला झोकून दिले होते. ते जनतेने पाहिले आहे. त्यांच्या या त्यागाचे तेजोवलय या प्रत्येक वक्त्याभोवती आहे. प्रचार सभातून या तोफा दणाणू लागल्या आहेत. अटलजी, चरणसिंग, मोरारजीभाई, मधु लिमये, चंद्रशेखर, मृणाल गोरे, मोहन धारिया, एस् एम्.... किती नावे सांगणार? या प्रत्येक वक्त्याच्या आवाहनाला एक वेगळाच अर्थ आहे. असे तेज असलेले फर्डे वक्ते अन्य कोणत्याही पक्षाजवळ नाहीत. या गोष्टीचाही– फार मोठा लाभ जनतापक्षाला मिळणार आहे.

MANOOS ( Marathi Weekly ) 1·25 Paise Regd. No. PNC-68

पुण्यातील ' कसबा ' आणि ' शिवाजीनगर '
हे दोन अटीतटीने झुंजवले जाणारे मतदारसंघ . . . .
या दोन्ही ठिकाणी १९५७ नंतर मतदानात सतत घट होत गेली आहे.

उलट मागासलेल्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विदर्भात
मतदानाचे प्रमाण सतत वाढत गेलें आहे.

–निवडणूक कार्यकर्त्यांना उपयुक्त ठरणारी अशी मतदानप्रमाणांची
सर्व ठिकाणांची आकडेवार माहिती पुढील अंकी . . . .

# माणूस

## निवडणूक विशेषांक

क्रमांक तीन

किंमत सव्वा रुपया

४ व ११ फेब्रुवारीचे दोन्ही निवडणूक विशेषांक संपले.
मागणी करू नये.

## या विशेषांकी

बारामती मतदार संघात होणाऱ्या ना. शरद पवार
विरुद्ध ' जनता 'चे श्री. मोरे यांच्या चुरशीच्या निवडणुकीवर आधारित
खास वार्तापत्र

शिरीष सहस्रबुद्धे